# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०६/२०१४

ठराव क्र.०१ :-

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मंत्री, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री लोकनेते श्री. गोपीनाथ मुंडे यांचे अकस्मित निधन दि. ३/०६/२०१४ रोजी झाल्याने मा. मुंडे साहेबांच्या रुपाने महाराष्ट्रातील मोठा आधारस्थंब गळून पडला आहे. सर्व जाती-जमातीच्या तरुणानां आकर्षित करणारा व राजकीय मतभेद विसरुन सर्वांना मदत आणि मार्गदर्शन करणारा व राज्यातील गुंडागीरी व दहशतवाद संपवणारा, जनसामान्यातील नेता दूर गेला आहे. मा. मुंडे साहेब यांच्या जाण्याने बहुजन चळवळीचे नुकसान झाले असून महाराष्ट्रातील महायुतीची साखळीची कडी निखळून पडलेली आहे.

महाराष्ट्रातील सर्व जनतेची आणि शेतकऱ्यांची नाळ जोडणारा नेता हरपला आहे. महाराष्ट्राच्या राजकरणातील एका वादळाचा दुर्देवी अस्थ झाला. यामुळे भाजपाचा कार्यकर्त्यांना हा धक्का पचवणे कठीण जात आहे.

अशा लोकनेत्याला आदरांजली वाहण्याकरीता आपण उभे रहावे. तसेच आज दि. ११/०६/२०१४ रोजीची सभा तहकुब करण्यात येत असून सदर तहकूब सभा दि. २३/०६/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात यावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील**     **अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**या ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. प्रशांत दळवी यांनी खालीलप्रमाणे दुःखवटा सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. नगरसेवक श्री. प्रविण मोरेश्वर पाटील यांचे वडिल कै. मोरेश्वर पाटील यांचे दि. ०२/०६/२०१४ रोजी अल्पशः आजाराने निधन झालेले आहे. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील यांच्या कुटुंबियांच्या दुःखामध्ये ही सभा सहभागी आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोटारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १) गोविंद हेलन जॉर्जी |
| २ | कांगणे यशवंत बगाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ६ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | शेख आसिफ गुलाब | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | |
| ११ | शाह राकेश रतिशचंद्र | ११ | शेख लियाकत ग. | |
| १२ | शरद केशव पाटील | १२ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | खण्डेलवाल सुरेश | |
| १४ | जैन गिता भरत | १४ | नरेश तुकाराम पाटील | |
| १५ | जैन रमेश धरमचंद | १५ | म्हात्रे परशुराम पद्माकर | |
| १६ | डॉ. राजेंद्र जैन | १६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १७ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १८ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | सुजाता रविकांत शिंदे | १९ | भोईर कमलेश यशवंत | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | नरेंद्र एल. मेहता | २० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २१ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २२ | डॉ. नयना मनोज वसानी | २२ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | दिपीका पंकज अरोरा | २४ | बगाजी शर्मिला विन्सन | |
| २५ | मीरादेवी रामलाल यादव | २५ | रकवी सुहास माधवराव | |
| २६ | अनिल बाबुराव भोसले | २६ | झिनत रऊफ कुरेशी | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | २७ | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | |
| २८ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | २८ | पुजारी कांचना शेखर | |
| २९ | संध्या प्रफुल्ल पाटील | २९ | काझी रशीदा जमील | |
| ३० | तारा विनायक घरत | ३० | इनामदार जुबेर | |
| ३१ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३२ | शुभांगी महिन कोटियन | ३२ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३३ | जयमाला किशोर पाटील | ३३ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३४ | संदिप मोहन पाटील | ३४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३५ | परमार अनिता भरत | ३५ | भट दिप्ती शेखर | |
| ३६ | पाटील प्रणाली संदिप | ३६ | विराणी रेखा अनिल | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३९ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४० | ठाकूर अरविंद दत्ताराम | | | |
| ४१ | जाधव मोहन महादेव | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०६/२०१४

## (दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ०१ :- दि. ११/१२/२०१३ व दि. ११/०२/२०१४ (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ०२ :-

दि. ११/१२/२०१३ व दि. ११/०२/२०१४ (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०६/२०१४
## (दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. (०२) :- भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथील तात्पुरत्या ठोक मानधनावरील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणे बाबत.**

**ठराव क्र. (03) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड येथील वैद्यकीय विभागाअंतर्गत भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय नागरीकांच्या सोईसुविधांसाठी आवश्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांसह सुस्थितीत कार्यरत असणे गरजेचे आहे. रुग्णालयासाठी शासन मंजूर पदानुसार १६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

शासन निर्णय क्र. जाबप्र-२००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४, दि. २३/१२/२००२ अन्वये सुचविलेल्या आकृतीबंध शहरी आरोग्य सेवेचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्त लावणे शक्य होणार नाही. Indian Public Health standards नुसार भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ०२ | १५६००-३९,१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारीका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ५२००-२०२०० | १८०० |

सदर पदनिर्मिती करुन सदर पदास मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ ने पदनिर्मिती प्रस्ताव शासनास पाठवुन मान्यता मिळणेबाबत व शासन मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करार तत्वावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे दि. १९/१०/२०११ रोजी शासनास "आय.पी.एच.एस." नुसार आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

मा. महासभा ठराव क्र. ५४, दि. २०/०९/२०११ नुसार भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयात पदनिर्मितीस मंजूरी दिली आहे. भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयात खालील प्रमाणे १६ वैद्यकीय अधिकारी/अधिपरिचारीका यांना मा. स्थायी समिती सभा दि.२८/०८/२०१३, ठराव क्र. ७४ अन्वये सेवेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ०६ महिन्यांसाठी मुदतवाढ आदेश देण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १. | डॉ. विजया प्रभागर अहिरे | वैद्यकीय अधिकारी | १६/०३/२०१४ |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| २. | श्रीम. स्नेहा राणे | अधिपरिचारीका | ०५/१२/२०१३ |
| ३. | श्रीम. स्विडल फर्नांडिस | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ४. | श्रीम. नेहा निलेश वनमाळी | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ५. | श्रीम. अंजली अविनाश यादव | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ६. | श्रीम. वैशाली दिपेश ठाकरे | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ७. | श्रीम. राधिका मनिष चौधरी | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ८. | श्रीम. लिडीया अंतोन करास | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ९. | श्रीम. उज्वला दिनेश सोनावणे | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| १०. | श्रीम. जया नरेश पेडणेकर | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ११. | श्रीम. संघवी विशाल चौधरी | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १२. | श्रीम. लविना स्टीफन डाबरे | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १३. | श्रीम. जेविता परेरा | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १४. | श्रीम. रेखा रमेश कडू | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १५. | श्रीम. सय्यद सकिना चांदबाशा | शस्त्रक्रिया सहाय्यक | २२/०४/२०१४ |
| १६. | श्री. शिवाजी व्यंकटराव वाकोरे | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | २२/०१/२०१४ |

मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ नुसार मंजूरी दिलेल्या वरील पदनिर्मिती प्रस्तावास शासनाकडून आद्याप मंजूरी प्राप्त झालेली नसल्याने ठरावाच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, शस्त्रक्रियागृह सहाय्यक/परिचर ठोक मानधनावर कार्यरत असल्याने वरील प्रमाणे ठोक मानधनावरील मुदत संपल्यानंतर प्रत्येकवेळी मुदत संपल्यानंतर ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन शासनाकडील पदनिमीर्तीचा प्रस्ताव मंजूर होईपर्यंत ही सभा मुदतवाढ देऊन सदर प्रस्तावास मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच २० द.ल.ली. पाणी पुरवठ्याची कामे हाती घेतलेली आहेत. तसेच पाणी पुरवठा योजनेतील कामे सुध्दा हाती घ्यावयाची आहे. त्याकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे पुरेसा अभियंता वर्ग नाही. भुयारी गटार योजना/पाणी पुरवठा कामांचा अनुभव असणारे ०३ अभियंते १) श्री. विलास चव्हाण २) श्री. सुरेन्द्र ठाकरे ३) श्री. किशोर देशमुख महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातून प्रतिनुयुक्तीवर घेण्यात आलेले आहेत. सदर कामे पूर्ण करण्यासाठी त्यांची आवश्यकता लागणार आहे. तरी अभियंत्यांना १ वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी व सदर कार्यपूर्ती न झाल्यास प्रशासन जबाबदार असेल असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्रीम. निलम ढवण**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(६)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०६/२०१४

**प्रकरण क्रमांक (०३) :-** भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चोपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ( ०४ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसलपार्क खाडी किनारी महानगरपालिकेने दशक्रिया या विधी करीता शेड बांधलेली आहे. सदर शेडचे नुतनीकरण करणे कामास महाराष्ट्रं कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथरीटी यांच्याकडून मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी रु. ५६,५४,९८६/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक:- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री रोहिदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

PC3/DK/2014-15/MT -1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०६/२०१४

## (दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्रमांक (०४) :-** केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बसेस खरेदी व जेईएफ ५ अंतर्गत प्रकल्प अहवाल बनविणे अवलोकनार्थ.

**ठराव क्रमांक ( ७५ ) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बस खरेदी करणेकरीता व बस डेपो विकसीत करणे व अत्याधुनिक उपकरणे कार्यान्वयीत करणेकरीता निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. या पात्र निविदाधारकांना महानगरपालिकेने दि. ५/०३/२०१४ रोजी कार्यादेश दिलेले आहेत.

बस खरेदी करण्यापूर्वी प्रशासनाने मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक होते. तसेच सदर विषय हा शहराशी निगडीत असल्याने या सर्व योजनेची व बस चालविण्याचे धोरण निश्चित करणेकामी मा. महासभेची अंतीम मंजुरी घेणे आवश्यक होते. अश्या प्रकारची कोणतीही मंजूरी प्रशासनाकडून घेतलेली नसल्याने सदर अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला विषय नामंजुर करण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :-** नरेंद्र लल मेहता

**अनुमोदक :-** प्रशांत केळुसकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

(8)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०६/२०१४

## (दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ०५ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक मालमत्ता देखभाल, दुरुस्ती करणेकरीता वार्षिक मुदतीच्या निविदा मागविणे व खर्चास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. ०६ :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक, तसेच विकास योजनेतील रस्त्याखालून विविध यंत्रणाच्या केबल्स, पाईप लाईन इ. टाकण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. संबधित यंत्रणाकडून, नविन केबल्स टाकणे, जलवाहिनी टाकणे त्याची दुरुस्ती करणे इत्यादीसाठी आवश्यक परवानगी घेऊन व शुल्क भरून खोदण्यात येतात. सदर दुरुस्ती शुल्कातून बाधित रस्ते दुरुस्ती केले जातात. यासोबत अतीवृष्टीमुळे पडणारे खड्डे देखिल महानगरपालिकेकडे विविध यंत्रणामार्फत रस्ते दुरूस्तीसाठी जमा केलेल्या रक्कमेतून, दुरूस्ती करून घेण्यात येतात.

सन २०१४-१५ या वर्षाकरिता प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्ते देखभाल, दुरुस्ती, पुर्नपृष्ठीकरण करणे, गतिरोधक बसविणे, रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पट्टे मारणे इ. कामासाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकिय/ आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तसेच फुटपाथ / नाले / गटारे या वरील साफसफाई साठी बसविण्यात येणारी लोखंडी/ फायबर/ क्रॉक्रीटची झाकणे, गटारावरील स्लॅब दुरुस्ती, कर्बस्टोन, पेव्हर ब्लॉक, वॉटर टेबल, चेकर्ड लादी दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पातील तरतुदीप्रमाणे वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या असलेल्या मालमत्ता मध्ये मुख्य कार्यालय इमारत, इतर कार्यालयीन इमारती, प्रभाग कार्यालये, समाजमंदीर, बालवाडया, स्मशानभूमी, उद्याने, मैदाने, तळी विहीरी दुरुस्ती, शाळा इमारती, शौचालय दुरुस्ती, नामफलक यांची किरकोळ दुरुस्त्यासाठी देखील वार्षिक दर मागवून कंत्राटदार निश्चित केल्यास सर्व कामे तातडीने आवश्यकतेनुसार करुन घेता येतात. यासाठी सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षात तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत विविध आरक्षणे असून आरक्षणाच्या जागा ताब्यात येत आहेत. ताब्यात आलेल्या जागांना पक्के कुंपणभिंत घालून जागेचे संरक्षण करणे आवश्यक आहे. यासाठी निविदा मागवून दर निश्चित केल्यास आवश्यकतेप्रमाणे जागांना कुंपणभिंती घालता येतील. यासाठी देखील अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. तरी सदर तरतूदीमधुन वरील कामांसाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(९)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०६/२०१४
## (दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ०६ :-** **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्वधर्मिय उत्सवातंर्गत सणांसाठी विविध व्यवस्था करणे कामी खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणेबाबत..**

**ठराव क्र. ०७ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात साजरे होणाऱ्या उत्सव व कार्यक्रमांसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | सणाचे/ उत्सवाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | श्री गणेशोत्सव, माघी/ साखर चौथ गणेश विसर्जन व्यवस्था | ७०.०० लक्ष |
| २ | रमजान ईद/ बकरी ईद | ३.०० लक्ष |
| ३ | कार्तिक पौर्णिमा | ४.०० लक्ष |
| ४ | छट पूजा/ दशमादेवी उत्सव | १०.०० लक्ष |
| ५ | गणगौर उत्सव | ५.०० लक्ष |
| ६ | वेलंकनी उत्सव | ४२.५० लक्ष |
| ७ | नवरात्र विसर्जन | १०.०० लक्ष |
| ८ | गुरूनानक जयंती | ५.०० लक्ष |
| ९ | महावीर जयंती / पर्युषण | ४०.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे रोजी ची व्यवस्था | ३.०० लक्ष |
| ११ | अर्थिक गणना/ पल्स पोलिओ/ जनता दरबार व्यवस्था | ७.०० लक्ष |
| १२ | श्रीगणेशोत्सव, नवरात्र, माघी गणपती, छटपूजा, दशमादेवी उत्सव, साखरचौथ गणपती दरम्यान करावयाच्या अतिरिक्त उपाययोजना | |
| १३ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | ५.०० लक्ष |
| १४ | बाबासाहेब आंबेडकर जयंती | ५.०० लक्ष |
| १५ | महाराणा प्रताप जयंती | ५.०० लक्ष |
| अ | लाकडी तराफे व्यवस्था | १४.०० लक्ष |
| ब | फोर्क लिफ्ट व्यवस्था | ३.०० लक्ष |
| क | हायड्रॉलिक क्रेन व्यवस्था | ३.०० लक्ष |
| ड | बोटीची व्यवस्था | १६.०० लक्ष |

सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाच्या निविदा मागविताना इलेक्ट्रीक सिटी कामाकरीता पी. डब्लूच्या लायसन्सची अट काढून टाकण्यात यावी. त्याचप्रमाणे आवश्यक असल्यास निविदा मागविताना रोजंदारी/ ठेका पध्दतीने काम करीत असलेल्या ठेकेदारास निविदा भरण्यास प्रवेश द्यावा. तसेच इतर आवश्यक नसलेल्या अटी व शर्ती शिथिल कराव्यात. जेणेकरून निविदा भरताना स्पर्धा निर्माण होवून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल असे पाहावे.

उपरोक्त कामाकरीता वरीलप्रमाणे खर्चास व वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास तसेच आवश्यक निधी उपलब्ध करुन घेण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

सदर ठरावात उपसुचना मांडीत आहे की, डोंगरी – तारोडी येथे श्री. धारावी मातेचे पांडवकालीन मंदिर आहे. आगरी कोळी बांधवांची ग्रामदेवता असून त्याठिकाणी दरवर्षी महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असून धारावी मातेचे दर्शन घेण्याकरिता आगरी कोळी व इतर

समाजातील हजारो संख्येने भक्तगण येत असतात. तरी श्री. धारावी माता मंदिर, डोंगरी-तारोडी उत्सवाकरिता दरवर्षी रु. १५ लक्ष इतकी रक्कम अनुदान म्हणुन देण्यात यावी.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. असेन्ला मेंडोन्सा परेरा यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

हनुमान जयंती उत्सवाकरिता व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती करिता देखील अनुदान देण्यांत यावे. तसेच इतर कोणत्याही धर्माची रु. एक लाख, पन्नास हजार रक्कमेची मागणी असेल त्यांना देखील यामध्ये समाविष्ट करण्यात यावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांतर्गत सणांसाठी व्यवस्था करणे कामी खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे गोषवा-यातील मध्ये अ. क्र. २ मध्ये नमूद रमजान ईद / बकरी ईद उत्सवासाठी होणा-या खर्चास रुपये ३ लक्ष नुसार आर्थिक मान्यतेकरीता विषय पटलावर आहे.

त्यामध्ये ईद-ए-मिलाद/मोहरम/बोरी व खोजा समाजाचे सणासाठी तसेच दर्गांचे उरुस विविध व्यवस्था करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरीबाबतचा विषयाचा समावेश करुन विषय पटलावर घेण्यात यावा व या सणांच्या खर्चास रु. ५० लक्ष इतकी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. तसेच निविदा काढताना प्रभागनिहाय निविदा काढण्यात याव्यात जेणेकरुन स्थानिक नागरीकांना सोयीस्कर होईल व प्रशासनामार्फत संबंधीत ठेकेदारावर नियंत्रण ठेवले जाईल, अशी मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन मर्विन डिसा यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर क्रिसमस कार्निवल करिता ४० लक्ष ही रक्कम समाविष्ठ करावी.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. शिल्पा भावसार यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

दशामा देवीसाठी जो खर्च आहे तो पब्लिक सार्वजनिक जास्त असून हा खर्च कमी आहे ते ७ लाख पर्यंत असावा अशी विनंती.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०६/२०१४

(दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये प्रस्ताव)**

**प्रकरण क्र. (०७) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागू केलेल्या भूमीगत गटार योजनेच्याकरातून मुर्धा ते मोर्वा, डोंगरी ते उत्तन, घोडबंदर, चेणा या परिसरातील करदात्यांना सुट देणेबाबत.**

**ठराव क्र. ( ०८ ) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिनीव्हल मिशन अंतर्गत भाईंदर (पूर्व) व भाईंदर (पश्चिम) तसेच मिरारोड या ठिकाणी भूमीगत गटार योजनेचे काम चालू आहे. सदर काम अंतिम टप्प्यात आहे. या योजनेचा लाभ सर्वसाधारणपणे भाईंदर (प.), भाईंदर (पूर्व) येथील नागरीकांना होणार आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १२९ (बब) नुसार मलप्रवाह सुविधा लाभ कर लागू करण्याची तरतुद आहे. उक्त तरतुदीनुसार महानगरपालिकेने दि. १५/०२/२०११ रोजी प्रकरण क्र. १०८, ठराव क्र. ९४ ने मलप्रवाह सुविधा लाभ कर सन २०११-१२ या वर्षापासून कर योग्य मुल्याच्या आठ टक्क्या प्रमाणे महानगरपालिकेतील सर्व मालमत्तांवर आकारण्यास सुरूवात केलेली आहे.

सध्याची योजनेतील लाभार्थ्यांची वस्तुस्थिती पाहता मुर्धा ते मोर्वा, डोंगरी ते उत्तन परिसर, व चेणा घोडबंदर येथील नागरीकांना या योजनेचा लाभ होत नाही. कारण सदर योजना या भागासाठी मनपाने लागू केलेल्या नाही. तरीसुध्दा मुर्धा; डोंगरी, उत्तन या परिसरातील करदात्यांकडून मनपा सदर कर वसूल करीत आहे. ही बाब नैसर्गिक न्यायाला अनुसरुन नाही व एक प्रकारे हा तेथील कर दात्यावर अन्याय होत आहे. स्थानिक करदात्यावर होणारा अन्याय लक्षात घेऊन मा. महापौर महोदया, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा व विधान परिषद सदस्य मा. श्री. मुझफ्फर हुसेन यांनी मा. आयुक्तांकडे लेखी पत्र देऊन सदरचा कर मुर्धा, डोंगरी, उत्तन परिसरातील करदात्यांना कमी करणेकरिता मागणी केलेली आहे. तरी दि. १५/०२/२०११ च्या महासभेमध्ये पारित केलेल्या प्रकरण क्र. १०८ व ठराव क्र. ९४ या ठरावातून मुर्धा, डोंगरी, उत्तन या परिसरातील करदात्यांना १००% सूट देण्यात यावी व सध्या लागू असलेला मलप्रवाह सुविधा लाभ कर वरील गावातील मालमत्तांना सन २०१४-१५ या वर्षापासून आंकारू नये. तसेच मिरा भाईंदर शहरात भुयारी गटार योजना रद्द करण्यात येत आहे. तसेच मालमत्ता करामध्ये या परिसरातील नागरीकांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती कराची आकारणी केली जात आहे. ही शास्ती कराची आकारणी यापुढे कर विभागाने करू नये असा ठराव मांडण्यात येत आहे. गरज भासल्यास सदर ठरावास शासनाकडून मंजुरी घेण्यात यावी.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

अनुसुची 'ड' प्रकरण २ नियम 'ज' अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागु केलेल्या भुमीगत गटार योजनेच्या मलःनिसरण करातुन मुर्धा-डोंगरी-उत्तन या परिसरातील करदात्यांना सुट देणेबाबत प्रस्ताव सदरच्या मा. महासभेमध्ये आहे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये विविध ठिकाणी भुमीगत गटार योजनेचे काम गेल्या दोन वर्षापासुन सुरु असुन ते अंतिम टप्प्यामध्ये आहे. मात्र सुरु असलेले भुमीगत गटार योजनेचा लाभ हा मिरा गावठण, काशी गांव, अग्रवाल कॉम्पलेक्स पासुन ते हर्मिटेज कॉम्पलेक्स या परिसरातील करदाते यांना मिळालेला नाही व योजनेचा लाभ प्रस्तावितही नाही.

तरीसुध्दा या परिसरातील करदात्याकडुन मनपा सदरबाबत कर वसुल करीत आहे व ही बाब नैसर्गिक न्यायाना अनुसरुन नाही.

तरी सदर प्रस्तावामध्ये मिरा गावठण, काशी गांव, अग्रवाल कॉम्पलेक्स पासुन ते हर्मिटेज कॉम्पलेक्स पर्यंतचा परिसर मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागु केलेल्या मलःनिसरण कर वगळण्यात यावा, अशी मी सुचना मुळ ठरावात मांडत आहे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर ठरावात सुचना मांडीत आहे की, खारीगाव, गोडदेव, नवघर बंदर वाडी, तसेच बाळाराम पाटील रोड, नवघर रोड, नवघर फाटक रोड येथे भुयार गटार योजना होणार नसुन तरी त्यांना मलप्रवाह लाभकर रद्द करावी अशी मी सुचना मांडीत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

०१३

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०६/२०१४

## (दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये प्रस्ताव)**

**प्रकरण क्र. ०८ :-** **मिरा-भाईंदर शहराकरीता शासनाने लागु केलेला स्थानिक संस्था कर रद्द करणेबाबत.**

**ठराव क्र. ०९ :-**

महाराष्ट्र शासनाने प्रायोगिक तत्वावर सन २०१०-११ या वर्षामध्ये स्थानिक संस्था कर नव्याने लागू केलेला आहे. शासनाने मुंबई वगळता सर्व शहरामध्ये टप्याटप्याने स्थानिक संस्था कर चालू केला आहे. या कराची वसुलीची पध्दत अत्यंत क्लिष्ट आहे. वसुली पध्दतीमध्ये व्यापाऱ्याने स्वयंम प्रेरित व स्वाय्यत्त निर्धारनाव्दारे कर भरावयाच्या असल्यामुळे व्यापारी कारखानदार यांना अतिशय गैरसोयीचे होत आहे. व हा कर भरण्यास व्यापारी संघटना योग्य प्रतिसाद देत नाही. तसेच शासनाच्या या धोरणाबाबत व्यापारी वर्गात व नागरीकांमध्ये तिव्र नाराजी व असंतोष आहे. हा कर रद्द व्हावा म्हणून शहरातील व्यापारी नेहमीच महानगरपालिकेकडे व शासनाकडे आपला निषेध व्यक्त करुन आंदोलने करीत आहेत. मिरा भाईंदर शहराचे आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा, विधानपरिषद सदस्य श्री. मुझफ्फर हुसैन व मा. महापौर व उपमहापौर महोदया यांनी राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांकडे व शासनाच्या प्रधान सचिवांकडे मिरा भाईंदर शहराचा स्थानिक संस्था कर रद्द करणेकरिता आग्रही मागणी केलेली आहे.

एल.बी.टी. कर लागू होण्यापूर्वी शासनाने उद्योगधंद्यावर व्हॅट कर प्रस्तावित केलेला आहे. या व्हॅट करांमधून सर्व नगरपालिका व महानगरपालिकांना त्यांच्या हिश्यांची एल.बी.टी. कराची रक्कम देण्यात येईल असे आश्वासित केले होते. परंतु शासनाने नव्याने एल.बी.टी. कराची आकारणी करून उद्योजकांवर अतिरिक्त भार टाकलेला आहे. सदर एल.बी.टी. कर रद्द करणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे. संपूर्ण राज्यामध्ये विविध औद्योगिक संस्थांच्या माध्यमातून स्थानिक संस्था कर रद्द करणेबाबत सुरु असलेली चळवळ तसेच मिरा भाईंदर शहराच्या नागरिकांच्या व व्यापाऱ्यांच्या मागणीला प्रतिसाद देत शासन स्तरावर एल.बी.टी. रद्द करण्याच्या कार्यवाहीची वाट न पाहता मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि. १/०७/२०१४ पासून हा कर रद्द करावा. तसेच अर्थसंकल्पात येणारी तुट भरून करण्याकरीता अन्य उत्पन्नाचे मार्ग तयार करावेत असा ठराव ठेवण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हंसुकूमार पांडे** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(०१५)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २३/०६/२०१४
## (दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्रमांक (०९) :-** केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत परिवहन सेवेकरीता बस खरेदी करणे व बस चालविण्याचे धोरण निश्चित करणेबाबत.

**ठराव क्रमांक (१० ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या व शहरामधील नविन होणारी बांधकामे व घर संकुलन विचारात घेता शहरामध्ये परिवहन व्यवस्थेत सुधारणा आणण्याकरीता व नागरीकांना कार्यक्षम परिवहन सेवा देणेकरीता महानगरपालिकेने सन २००९ मध्ये केंद्र शासनाच्या जव्हारलाल नेहरू नागरी पुर्नरोत्थान अभियान योजनेअंतर्गत २५० बसेस खरेदी करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ९ दि. २२/०५/२००९ व मा. महासभा ठराव क्र. ४ दि. १८/०४/२००९ अन्वये मंजुरी दिलेली होती.

त्या अनुशंगाने पहिल्या टप्प्यात सन २०१० मध्ये ५० बसेस खरेदी केल्या होत्या. या ५० बसेस पी.पी.पी. तत्वावर चालविण्यात याव्यात असे धोरण मा. महासभा दि. ११/०२/२०१२ अन्वये ठराव क्र. ५१ प्रमाणे घेण्यांत आले व हा ठेका मे. कॅस्टोल इन्फ्रॉ.प्रा.लि. यांना प्रति कि.मी. रू. १ प्रमाणे रॅायल्टीच्या स्वरूपात देण्यात आलेला आहे. सदर ठेकेदार रॅायल्टीची ठरल्याप्रमाणे रक्कम मनपाकडे जमा करत नाही. व करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग करीत आहे. या ठेकेदारावर मनपा कडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. त्याशिवाय सध्या देत असलेली बस सेवा निकृष्ठ दर्जाची असून सर्व बसेसची अवस्था दयनिय आहे. संदर परिवहन योजनेमध्ये ५० टक्के महानगरपालिकेचा व ५० टक्के ठेकेदाराचा सहभाग असावा असे ठरलेले होते. परंतु मे. कॅस्टोल इन्फ्रॉ.प्रा.लि. या ठेकेदारास ठेका देताना ५० टक्क्याचा सहभाग ठेकेदाराकडून घेतलेला नाही. यामुळे सद्या चालवित असलेला परिवहन ठेका नुकसानीस जात आहे.

या ठेकेदाराच्या विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आलेली होती. त्यामध्ये १ ते १० मुद्ये उपस्थित करून मुद्दे निहाय कार्यवाही करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने परिवहन विभागास दिलेले आहे. परंतु यावर परिवहन विभागाने काय कार्यवाही केली याचा अहवाल देण्यात आलेला नाही.

केंद्र शासनाच्या दि. १६/०८/२०१३ च्या निर्णयानुसार बसेस व आवश्यक साधनसामुग्री खरेदी करण्याचे धोरण निश्चित झालेले आहे. या धोरणाप्रमाणे महानगरपालिकेने मा. स्थायी समिती यांचे ठराव क्र. २९ दि. ७/०२/२०१३ नुसार बस व साधनसामुग्रीची मागणी बाबतचा अहवाल तयार करण्याचे काम मे. अर्बन मास ट्रांन्झीट कंपनी यांना दिले.

केंद्र शासनाने दि.२४/०९/२०१३ च्या सी.एस.एम.सी. बैठकीमध्ये महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रकल्प अहवालाप्रमाणे बस व साधनसामुग्री खरेदी करण्यास निधी मंजुर केला. त्या अनुशंगाने १०० बसेस व साधनसामुग्री खरेदी करण्याच्या निविदा उपक्रमाने घाईघाईने मागविण्यात आलेल्या आहेत. या निवीदा मागवितांना परिवहन उपक्रमाने लोकप्रतिनीधीं बरोबर कोणत्याही प्रकारची चर्चा केलेली नाही.

**(दर प्रती बस)**

| अ.क्र. | बसेसचा प्रकार | बसेसची संख्या | वोल्वा मोटर्स | टाटा मोटर्स | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | 400 mm diesel premium segment AC | १० | १,००,७४,०००/- | -- | १०,०७,४०,०००/- |
| २ | 900 mm diesel standard non AC | ७० | -- | ४०,१०,४४३/- | २८,०७,३१,०१०/- |
| ३ | 650 mm diesel mini non AC | १० | -- | -- | -- |
| ४ | 900 mm diesel midi non AC | १० | -- | २६,११,४८८/- | २,६१,१४,८८०/- |

बसेस खरेदीसाठी करण्यासाठी दि. २७/१२/२०१३ व दि.१३/१२/२०१३ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली होती. यानंतर तांत्रिक दृष्टया पात्र असलेल्या ठेकेदारांना प्रशासनाने दि. ५/०३/२०१४ रोजी कार्यादेश दिलेले आहेत. प्रशासनाने दराबाबत विचारविनिमय निर्णय घेण्यासाठी दि. १४/०२/२०१४ रोजी सदर विषयाचा गोषवारा मा. स्थायी समितीस सादर करण्यात आला होता. गोषवारा सादर केल्यानंतर दि. १७/०२/२०१४ रोजी मा. स्थायी समितीची बैठक घेण्यात आली होती.

वरील घटनाक्रम लक्षात घेता दि. २४/०९/२०१३ ते दि. ५/०२/२०१४ (गोषवारा मध्ये नमूद केल्याप्रमाणे) पर्यंत प्रशासनाकडे वेळ असून सुध्दा लोकप्रतिनिधींना या योजनेची माहीती व बस खरेदीचा तपशील मा. स्थायी समितीच्या सदस्यांना व नगरसेवकांना यांना दिलेली नाही. व परस्पर आपल्या अधिकाऱ्यात सदर निविदा अंतिम करून मंजुर केलेल्या आहेत.

बस खरेदी करत असताना बस खरेदीचे धोरण कसे असावे, बस चालविण्याचे धोरण निश्चित करणे, कोणामार्फत, कोणत्या मार्गांवर बसेस धावणार आहेत, बसेसची देखभाल दुरूस्ती, इंधन वंगण, बस डेपो करीता जागा व अन्य Liability, महानगरपालिकेचे आर्थिक हित काय असावे, महानगरपालिकेने उभारलेली रक्कम कंट्राटदार गुंतवणूकीच्या माध्यमातून महानगरपालिकेस कसा देईल, सदर प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर द्यावयाचा असल्यास रॉयल्टीचा दर व पध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. या सर्व धोरणांची माहीती प्रशासनाने सर्व नगरसेवकांना देणे अपेक्षित आहे. परंतु अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही परिवहन विभागाकडून झालेली नाही.

या उपक्रमामध्ये आपण सादर केलेल्या बस खरेदी निविदेमध्ये १० बसेस वॉल्वो कंपनीच्या असणार आहेत. या १० बसेस कोणत्या मार्गावर चालणार आहेत. या बसेसची देखभाल दुरूस्ती या बसेसवर काम करणारे चालक व वाहक यांच्या कामाच्या मर्यादा कशा असाव्यात, या महागड्या बसेस परिवहन विभाग कुठे उभ्या करणार आहेत, प्रती कि.मी. च्या मागे भाडे किती असावेत इ. चा सविस्तर अहवाल व धोरण परिवहन विभागाने तयार करणे आवश्यक होते. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांची लांबी व रूंदी व सध्याची परिस्थिती पाहता वॉल्वो बसेस चालविणे प्रशासनाच्या मर्यादापलिकडे आहे.

सदर विषय धोरणात्मक असल्याने बसेस खरेदी करणे व धोरण निश्चित करणेकामी मा. महासभेमध्ये चर्चा होऊन निर्णय घेणे अपेक्षित होते. तरी मा. आयुक्त सो., यांनी दिलेले कार्यादेश रद्द करण्यात यावे. व संबंधीत ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे देयक देवू नये.

सदर विषय हा धोरणात्मक असल्याने मा. महासभेपुढे फेरसादर करून त्यावर संखोल चर्चा व्हावी अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच याकामी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, दिलेले कार्यादेश रद्द करण्यात यावे व बस खरेदीचे धोरण निश्चित करणे व खरेदी करणे.

तसेच वस्तुस्थितीचे गांभीर्य वरील हकीगतीचा विचार करता परिवहन उपक्रमाकरीता जीईएफ-५ योजनेअंतर्गत व बस खरेदी करणेकरीता मागविण्यात आलेली निविदा देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत कळुसकर

अनुमोदक :- श्री. राकेश शाह

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

पिठासन अधिकारी

# मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २३/०६/२०१४
(दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये प्रस्ताव)

**प्रकरण क्र. (१०) :- आरोग्य विभागामार्फत सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील साफसफाई, कर्मचारी, मशीन व इतर साहित्यबाबत माहीती उपलब्ध करून देणेबाबत..**

**ठराव क्र. ( ७७ ) :-**

ठेका पध्दती संपूर्ण मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साफसफाई (रस्ता सफाई, गटार सफाई, तसेच उंदीर व मच्छर मारण्याकरिता औषध फवारणी) करण्याचे काम सुरू आहे. परंतु कोणत्याच प्रभागात हे स्पष्ट नाही की, १. प्रत्येक प्रभागात रस्ता सफाई करीता किती कामगार कोणत्या रस्त्यावर व किती वाजेपर्यंत काम करतात याबाबत सदर प्रभागातील रस्त्याचा नकाशा बनवून सविस्तर अहवाल देण्यात यावा. २. प्रत्येक विभागातील असलेली सर्व गटारे ही प्रत्येक महिन्यात पूर्ण साफसफाई करण्याचे नियोजन करावे. याप्रमाणे महिन्याच्या प्रत्येक दिवशी किती सफाई कामगार कुठून ते कुठपर्यंत, किती वाजेपर्यंत गटारावर साफसफाई करत आहेत याबाबत महिन्याच्या आत सर्व गटारे साफ होतील असे नियोजन करून त्याची माहिती त्या त्या प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. ३. प्रभागातील सर्व इमारतींमध्ये एका महिन्यात कमीत कमी एक वेळा उंदीर नियंत्रण योजना राबविण्यात यावी. प्रत्येक दिवशी या उपक्रमात येणाऱ्या इमारतींची व साहित्यांची माहीती सदर प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. ४. प्रभागातील सर्व इमारतींमध्ये एका महीन्यात कमीत कमी एक वेळा मच्छरांकरीता औषध फवारणी करण्यात यावी. प्रत्येक दिवशी या उपक्रमात येणाऱ्या इमारतींची व साहित्यांची माहीती सदर प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. सदर साफसफाई उपक्रमात ठेकेदारांवर कोणकोणत्या प्रकारची दंडात्मक कारवाई केली जाईल याबाबतची सर्व प्रभागातील नगरसेवकांना माहीती नियमीत देण्यात यावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन** **अनुमोदक :- डॉ. नयना वसाणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२३/०६/२०१४.

## ।। ठराव ।।

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची 'ड' मधील प्रकरण २(१) (के) अन्वये प्रस्ताव**

**प्रकरण क्र (७१) :-** आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. ( पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. (७२) :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात, अतिरिक्त २० द.ल.ली. पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत उपलब्ध करुन घेण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. सदर पाणी उपलब्ध करुन पाणी पुरवठयामध्ये सुधारणा होण्यासाठी आवश्यक त्या जलवाहिनी अंथरणे गरजेचे आहे. तसेच पाण्याचा दाब योग्य तो ठेवण्याकरिता काही ठिकाणी जलकुंभ बांधणे आवश्यक आहे. तसेच काही ठिकाणी मुख्य जलवाहिनी अंथरणे सुध्दा आवश्यक आहे. पाणी पुरवठा उपलब्ध झाल्यानंतर पाणी पुरवठा वितरण योग्य होणेकरिता आवश्यक ती खालील कामे हाती घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर २ येथे उंच जलकुंभ बांधणे. | १,१९,४७,३००/- |
| २ | भाईंदर (प.) येथील सुभाष मैदान जलकुंभ ते राई बस स्टॉप पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरवणे व अंथरणे. | १,२८,६४,४००/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) शांती नगर येथे सेक्टर ११ जलकुंभ ते सेक्टर ७ व २ जलकुंभाकरीता ३५० मि.मी. व्यासाची एम.एस.जलवाहिनी पुरवणे व अंथरणे. | ९९,०६,४००/- |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २२६ इंद्रलोक फेज क्र. ०४ मौजे नवघर येथे उंच जलकुंभ बांधणे. | २,३२,७२,९००/- |
| ५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) हटकेश ते कनाकिया जलकुंभापर्यंत ८६४ मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | ५,६२,६३,५००/- |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर येथील जी.सी.सी. क्लब, आकृती व पुनम नगर व गौरव रेसीडेन्सी येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | १,०६,२५,०००/- |
| ७ | मिरा भाईंदर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्तीकरिता वार्षिक मुदतीने पाईप पुरवठा करणे. | १,००,००,०००/- |

तरी वरील कामे अत्यावश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची 'ड' मधील प्रकरण २(१) (के) अन्वये सदर कामे अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार करुन घेण्यास, ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

INNURM/PIP/ALL ENG/Thrav/14

(१२)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २३/०६/२०१४
## (दि. ११/०६/२०१४ ची तहकुब सभा)

**दुःखवटा ठराव १३ :-**

श्री. एकनाथ जगन्नाथ पाटील, नवघर ह्यांचे दुःखद निधन झालेले आहे. म्हणून शोकप्रस्ताव मांडत आहे. त्या सर्वांच्या कुटूबीयांच्या दुःखात ही सभा सहभागी असून त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्री. प्रविण पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(19)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

प्रकरण क्र.१२ :- दि. ११/०२/२०१४ व दि. ०१/०३/२०१४ (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.१५ :-

दि. ११/०२/२०१४ व दि. ०१/०३/२०१४ (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा -भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**प्रकरण क्र. १३ :- मानधनावरील संगणक चालक/लघुलेखक यांच्या मुदतवाढी बाबत.**

**ठराव क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यांत आलेला असून संगणक चालविणेसाठी संगणक चालक व मा. महासभा, स्थायी समिती सभा व अन्य समित्यांची इतिवृत्तांते तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन उपलब्ध उमेदवारांच्या मुलाखती घेऊन दि. २८/०२/२००७ रोजीच्या आदेशान्वये एकुण ८७ संगणक चालक तथा लिपिक व ४ लघुलेखक यांची ठोक मानधनावर पाच महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आली होती. सदरच्या नेमणुकीस मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०३/२००७ ठराव क्र. २०१ अन्वये मंजुरी दिलेली होती. सदरचे ठोक मानधनावरील संगणक चालक व लघुलेखक यांना वेळोवेळी मा. महासभेच्या मान्यतेने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मा. महासभा दि. २१/०९/२०१३ ठराव क्र. ३२ अन्वये दि. ३०/०८/२०१३ रोजी सदरच्या नेमणुकीची मुदत संपत असल्याने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन एक वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. या अनुषंगे सदरच्या नेमणुकीची मुदत दि. ३१/०८/२०१४ रोजी संपत आहे. सद्यस्थितीत मा. महासभा दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा) ठराव क्र. २२ अन्वये संगणक चालक यांना दरमहा रु. ९,५००/- व लघुलेखक यांना रु. १०,५००/- इतके मानधन अदा करण्यात येत आहे. यापुढे संगणक चालक यांना दरमहा रू. ११,५००/- व लघुलेखक यांना रू. १२,५००/- इतके मानधन माहे सप्टेंबर २०१४ पासून अदा करण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

त्याचप्रमाणे संगणक चालकांना दिर्घ सुटीचा लाभ देता येत नाही याकरीता महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.अरजा-२४९६/१४/सेवा-९, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. १ मार्च १९९० या शासन निर्णयाप्रमाणे दरमहा २ १/२ दिवस याप्रमाणे अर्जित रजा देण्यात यावी. याबाबत प्रशासनाने महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ परिशिष्ट.२ अ.क्र. ३१ अन्वये श्रेणी -३ तांत्रिक सेवा, पदनाम - **"माहिती नोंदणीकार"** या पदाच्या पद निर्मितीच्या मंजुरीसाठी नविन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

महानगरपालिका आस्थापनेवर सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, अतिक्रमण व अनधिकृत नियंत्रण विभागात ठेका पध्दतीने एकुण ०८ कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांचे मासिक ठोक वेतन रक्कम रु. २०,००० इतके आहे. सदर कार्यरत कंत्राटी पध्दतीवरील कनिष्ठ अभियंता यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | नाव | कार्यरत विभाग | नियुक्ती दिनांक | कंत्राटाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. शेळके विकास रामचंद्र | पाणी पुरवठा विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| २. | श्री. चौधरी रशिकांत दामा | पाणी पुरवठा विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ३. | श्री. महाजन संदीप प्रकाश | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ४. | श्री. पाटील कुंदन काळूराम | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ५. | श्री. करंजकर लकेश अर्जून | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ६. | श्री. नलावडे अतिश दिनेश | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | श्री. शेख इम्तीयाज फैज . अहमद | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ८. | श्री. चौधरी तुषार मोहन | सार्व. बांधकाम विभाग | दि.१६/१२/२०१३ | ११ महिने |

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध तांत्रिक विभागातील कामकाजाचे स्वरुप, कामाचा वाढता व्याप पाहता तसेच विविध योजना कार्यरत असल्याने वरील कंत्राटी पध्दतीवरील कनिष्ठ अभियंता यांना १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मंजूरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- सौ. निलम ढवण**

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

मानधनावरील संगणक चालक व लघुलेखक यांच्या मुदतवाढी व पगारवाढीप्रमाणेच ठेकेदारामार्फत इतरही एल.बी.टी., बांधकाम विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या २३ मुलांना ठोक मानधनाप्रमाणे पालिकेमध्ये सामावून घेणे व पगारवाढ देणे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | अशोक तिवारी | **निरंक** |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | पाटील वंदना मंगेश | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | लियाकत ग. शेख | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | खण्डेलवाल सुरेश | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | नरेश तुकाराम पाटील | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | शबनम लियाकत शेख | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | अनिता जयवंत पाटील | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | वंदना रामदास चक्रे | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | भोईर कमलेश यशवंत | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद | २१ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | |
| २२ | शाह सिमा कमलेश | २२ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | पाटील सुनिता कैलास | |
| २६ | अरोरा दिपीका पंकज | २६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | रकवी सुहास माधवराव | |
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | |
| ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | पुजारी कांचना शेखर | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | काझी रशीदा जमील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | तारा विनायक घरक | ३३ | इनामदार जुबेर | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३७ | परमार अनिता भरत | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३८ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ४१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४२ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.१९/०७/२०१४

**प्रकरण क्र. १५ :-** **मौजे गोडदेव, स.क्र. ९७(५२)/२,३ या जागेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेबावत.**

ठराव क्र. १७ :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

आ.क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाचे विकास योजनेप्रमाणे एकूण क्षेत्र ४६७०० चौ.मी. असून यापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र ३०५३३.६० चौ.मी. आहे.

सदरच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे गोडदेव, स.क्र. ५२ (जुना), ९७ (नविन), हि.क्र. २ व ३ मे. ओम साई इंडस्ट्रीयल इस्टेट असलेली जागा आ.क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाने बाधीत होत आहे.

सदरच्या आरक्षणामधून २ एक्कर (८००० चौ.मी.) जागा आगरी समाज उन्नती संस्था यांना भाडेतत्वावर देणेसाठी विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेस मा. महासभेने मंजूरी दिलेली असून यासाठी अंतिम मंजूरी मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला होता. सदरचा प्रस्ताव शासनाने दि.३०/०१/२०१४ चे निर्णयानुसार नामंजूर केलेला आहे.

सदरच्या विषयांकित जागेमध्ये श्री.भिमराव चव्हाण यांनी औदयोगिक गाळयाचे अनधिकृत बांधकाम केल्यामुळे त्यांना दि.१२/११/२००१ व दि.१९/०१/०२ रोजी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सदरच्या नोटीसी विरुद्ध मा.न्यायालयात दावा क्र.१५६५/२००१ दाखल करुन स्थगिती आदेश प्राप्त केले होते. त्यानंतर मा.न्यायालयाने सदरचा दावा दि.२४/०९/२००७ रोजी फेटाळलेला आहे.

त्यानंतरही विकासकाने सदरच्या गाळयाचे बांधकाम तोडुन न टाकता त्याचा वापर सुरु ठेवलेला असल्यामुळे संबंधित गाळेधारकास व विकासकास दि.११/०३/२०१३ रोजी गाळयामधील सामान काढुन गाळे रिकामे करणेबाबत नोटीस देण्यात येवुन तोंडी सुचनाही देण्यात आलेल्या होत्या.

त्यानंतर पोलिस बंदोबस्त घेवुन दि.१२/०३/२०१३ रोजी सदरच्या अनधिकृत गाळयावर महानगरपालिकेमार्फत तोडक कारवाई सुरु करित असतांना त्याठिकाणच्या जमावाने महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियत्रंण विभागाच्या पथकावर दगडफेक करण्यात आली आहे.

मे. ओम साई इंडस्ट्रीयल इस्टेट गाळेधारक यांनी मा. उच्च न्यायालयांत याचिका क्र. २६५९/२०१३ दाखल केली होती. सदर याचिका गाळेधारकांनी दि.०८/०५/२०१३ रोजी स्वतःहून मागे घेतली आहे. सदर गाळ्याचे बांधकाम तोडण्यासाठी मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश नाहीत.

ओम साई इंडस्ट्रीयलमधील गाळेधारकाने शासनाने डिसेंबर २०१३ मध्ये विनंती अर्ज सादर केला होता. या अनुषंगाने दि.०२/०१/२०१४ रोजी मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग यांचेकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने इतिवृत्त प्राप्त असून शासनाने खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

सबब मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जागा ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार व मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत भूसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन करण्याकरिता व सदर भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्याबाबत शिफारससह प्रस्ताव मा. महासभेसमोर सादर करण्यात आलेला आहे.

मौजे घोडबंदर स.क्र.८/१ब, १क ही जागा स्पेशल इंडस्ट्रीयल झोन येत आहे. मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१२-१३, दि.०६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह भूखंड प्रकार बी च्या मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेने बांधकाम परवानगी देण्याअगोदर पोच रस्ता आहे किंवा नाही याबाबत चौकशी करणे गरजेचे होते. परंतु तसे न करता नियमाचे उल्लंघन करून परवानगी देण्यात आलेली आहे. तरी अशी अवैध्यरित्या देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात यावी. तसेच सदर दिलेली परवानगी दि.०६/१०/२०१२ रोजी दिली असून नियमानुसार दि.०५/१०/२०१३ रोजी परवानगी कालबाह्य झालेली असल्याने अशीच रद्द होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील हद्दीतील इतर रस्ते विकसित करताना मोठ्या प्रमाणात रस्त्यात असलेले दुकाने,गाळे,इंडस्ट्रीयल इस्टेट तुटणार आहेत. त्यामुळे सदर लोकांचे पुर्नवर्सन करणे गरजेचे आहे. (**सदर मौजे घोडबंदर स.क्र.८/१ब, १क ही जागा स्पेशल इंडस्ट्रीयल झोन असल्याने सदर जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकसीत करण्याचा नियमानुसार सर्वप्रथम अधिकार महानगरपालिकेचा आहे. व तद्नंतर नकारल्यास विकासकाने करावयाचा आहे.**) परंतु महानगरपालिकेला पुर्नवर्सनाची अत्यंत निकड असल्याने सदर आरक्षणात आरक्षण विकसीत केल्यास पुर्नवर्सन करणे सोपे जाईल. तसेच रिअकॉमेडिशन करण्यासाठी भविष्यात गाळे, इंडस्ट्रीयल गाळे महानगरपालिकेला लागणार आहेत.

सदर आरक्षणातील जागेचे भुसंपादन त्वरीत करण्यात यावे व आरक्षणातील जागेचा भुसंपादनासाठी लागणाऱ्या आर्थिक व प्रशासकिय खर्चास मान्यता देण्यात येत आहे. व सदर जागेत दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी व सदर आरक्षण महानगरपालिकेने विकसीत करावे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :-** **अनुमोदक :-**

Ashvin Shamji Kasodariya

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**प्रकरण क्र. (१४ ) :-** मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर स.क्र.८/१ब, १क या जागेपैकी १८.०० मी. रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भूसंपान करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत..

**ठराव क्र. (१६) :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेल्या भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदरच्या विकास योजनेमध्ये एकुण १९ महसूली गावांचा समावेश आहे.

सदरच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१२-१३, दि.०६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह भूखंड प्रकार बी च्या मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर मंजूर रेखांकनामधील १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता, स.क्र. २०४/११, ८/१ब व ८/१क या जागेमधून जात असून स.क्र. २०४/११ या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे. तथापी स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेतील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले नाही.

स.क्र.८/१ब व ८/१क या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले नसल्यामुळे स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१ व २०४/१० या जागेसाठी जाणेकरिता रस्ता उपलब्ध होत नसल्यामुळे सदर जागेचे विकासक श्री. धर्मेंद्र जयंतीलाल शहा यांनी महानगरपालिकेने केलेल्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे विकास योजना रस्त्याचे बांधकाम करणेस महानगरपालिकेस आदेशित करावे म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७४१९/२०१३ दाखल केलेली आहे.

सदर याचिकेमधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामधील परिशिष्ठ क्र. ८ व ९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे (१) परस्पर वाटाघाटी, (२) विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे जागा हस्तांतरित करणेबाबत संबंधित जागा मालकास सुनावणीसाठी वारंवार बोलावण्यात आले असता, संबंधित जागा मालक सुनावणीसाठी / वाटाघाटीसाठी समक्ष हजर राहिलेले नाहीत. तसेच त्यांनी सदरच्या जागेसाठी विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेसाठीचाही प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केलेला नाही.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे व जागामालकांनी परस्पर वाटाघाटीस व विकास हक्क प्रमाणपत्रान्वये जागा हस्तांतरीत करणेस प्रतिसाद दिलेला नसल्यामुळे मौजे घोडबंदर, स.क्र.८/१ब व ८/१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत अंदाजित क्षेत्र ६८०.०० चौ.मी. साठी भूसंपादन करणेसाठीचा आगाऊ प्रस्ताव महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/७९३/२०१४-१५, दि.२१/०६/२०१४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

"सदरचा अर्ज मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे पाठविण्यात यावा. तद्नंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकेने अर्जदाराच्या विनंतीच्या योग्ययोग्यतेची तपासणी करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव सादर केल्यास शासन त्याविषयी गुणवत्तेनुसार उचित निर्णय घेईल".

मंजूर विकास योजनेत खेळाचे मैदानासाठी आरक्षण असल्यास, अशा आरक्षणाच्या जागेतील फेरबदलाचे प्रारुप सादर करु नयेत, असे शासनाचे निर्देश आहेत.

सदरचे गाळेधारक बऱ्याच प्रमाणात शहराचे रहिवासी आहेत. त्यांचा व्यवसाय शहराच्या नागरिकांकरिता रोजगाराचे स्त्रोत आहे. तरी वस्तुस्थिती पाहता व शासनाकडिल प्राप्त इतिवृत्तांताच्या अनुषंगाने प्रशासनाने सदरचे प्रकरण सहानुभुतिपूर्वक निर्णयासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये तांत्रिक बाबी तपासून आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस प्रस्ताव शासनास सादर करणेस मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका ह्यांना योग्य निर्णयाकरिता प्राधिकृत करत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. सुजाता रविकांत शिंदे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

आझाद नगर हा सर्व्हे क्र. ९७ पुरताच मर्यादित नसून यात अनेक सर्व्हे नं. येतात. महानगरपालिकेने दि. १६/११/२००५ रोजी स्वर्हेअर श्री. राणे यांना सर्व्हेक्षण केले असता आरक्षण क्र. १२२ मध्ये ४६,७०० चौ. मीटर पैकी २३२१० चौ. मीटर क्षेत्रावर झोपड्या, घरे, गॅरेज, औद्योगिक गाळे यांनी व्याप्त झाले आहे. महानगरपालिकेने दि. १९/०६/२००७ रोजी जा.क्र.मनपा/नर/१०१३ या पत्रात स्पष्ट केले आहे. सदरचे अतिक्रमण सन १९९५ पूर्वीचे असलेले प्रथम दर्शनिय मान्य केले आहे. तसेच कोकण विभाग नगररचना आणि मुल्य निर्धारण विभागाने आरक्षण क्रमांक १२२ बगीचा व सामाजिक वनीकरण क्षेत्रफळ कमी करणेबाबत कलम ३७ ची कार्यवाही करण्यासाठी शासनाने मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे. याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेने कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही किंवा सदर झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत पात्रता ठरवून फोटोपास योजना घेतली नाही.

माझे मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब यांना तसेच पूर्ण सभागृहाला पक्षपात न करता आरक्षण क्र. १२२ ह्याच्या व्याप्ती कमी करावी किंवा झोपडपट्टी पुर्नवसन योजनेचा शासन निर्णय झो.पू.यो. १०९७ प्रकरण क्र. ४५१५/झो.पु.सु. अंमलात आणावित.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

२०

# मिरा -भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**प्रकरण क्र. १६ :-** **भाईंदर (प.) डोंगरी येथे उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून कोपरकडे जाणारा रस्ता तयार करणेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र. १८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र. २ येथे उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून डोंगरी दत्त मंदिराकडे कोपरपाडा येथे छोटी वसाहत असून सदर वसाहतीकडे जाण्यासाठी रहदारीस अत्यंत अडचणींचे व जिकरीचे होत आहे.

सदरचा रस्ता विकास आराखड्यात १८.०० मी. रूंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. परंतु सद्यस्थितीत सदर रस्त्याचे ३.०० मी. रूंदी. पर्यंत डांबरीकरणासह बांधकाम केल्यास कोपरा येथे राहणाऱ्या नागरीकांना रहदारीस सोयीचे होऊन रस्त्याचा प्रश्न मार्गी लागू शकतो. या कामाकरीता बांधकाम विभागाने रू.१,५०,९७,१००/- रकमेच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याकरीता विषय सादर केलेले आहे.

सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षात "नविन रस्ते बांधकाम" या लेखाशिर्षात तरतुद उपलब्ध आहे.

येथे नमूद करण्यात येते की, उत्तन विभागातील रहिवाश्यांवर महानगरपालिका शास्ती कराची आकारणी, मलप्रवाह सुविधा लाभ कराची आकारणी करत आहे. सदर दोनही कराबाबत ठराव करूनही प्रशासनाकडून अंतिम निर्णय घेतला जात नाही. त्याचप्रमाणे उत्तन विभागात असलेला घनकचरा प्रकल्पापासून या विभागातील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीत सदर रस्त्याचे काम पूर्ण करणेकरीता पुढील कार्यवाही करावी.

सदर रस्त्यामधील जागा ही सी.आर.झेड. बाधीत आहे. सदर जागेचा पूर्ण ताबा महानगरपालिकेकडे आलेला नाही. यामुळे महानगरपालिकेस या रस्त्याचे काम पूर्ण करण्यास अडचण निर्माण होणार आहे. याकरीता प्रशासनाने त्वरीत या रस्त्याची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घ्यावी व सी.आर.झेड.बाबत शासनाची मंजुरी घेवून उपरोक्त रस्त्याचे काम हाती घ्यावे. जेणेकरून तेथील नागरीकांची फसवणूक होणार नाही.

नमुद पुर्तता करुन निविदा मागविण्यात यावी तोपर्यंत निविदा काढू नये किंवा अर्थसंकल्पातून तरतुद कमी करु नये. तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा -भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**प्रकरण क्र. १७ :-** **भाईंदर (पश्चिम) स्पॅन हाईट्स ते मिरा हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता तयार करणे कामाच्या खर्चास प्रशासकिय व मार्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र. १९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पश्चिम) भागात उन्नत मार्गा लगत स्पॅन हाईट्स ते मिरा हॉस्पीटल पर्यंतचा १८.०० मीटर रूंदीचा विकास योजनेतील रस्ता विकसीत करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने रू. ७१,५७,१००/- खर्च अपेक्षित धरून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत शिफरस केलेली आहे. येथे नमूद करण्यात येते की, सदर रस्ता ज्या ठिकाणी करावयाचा आहे तेथे नविन इमारतींची कामे सुरू असून या रस्त्यावर रिलायन्स कंपनीचे व एम.टी.एन.एल. कंपनीचे नविन केबल टाकणे, केबल शिफ्ट करणे, पिण्यांच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे इ. कामाकरीता रस्ता खोदाई करावी लागणार आहे. तसेच विकासकांच्या नविन घरसंकुलनाची कामे चालू असल्याने येणाऱ्या जड वाहनांची वाहतुक चालू राहणार आहे. या ठिकाणी रस्ता करणे संयुक्तीत होणार नाही. त्यामुळे तेथील रस्त्यांचे काम विकसकांकडून करून घेण्यात यावे व सदर रस्ता बांधकामाचा विषय फेटाळण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | पाटील वंदना मंगेश | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | डिमेलो बर्नेट अल्बर्ट | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | खण्डेलवाल सुरेश | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | नरेश तुकाराम पाटील | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | शबनम लियाकत शेख | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | अनिता जयवंत पाटील | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद | २१ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २२ | शाह सिमा कमलेश | २२ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | पाटील सुनिता कैलास | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | वेतासकर राजेश शंकर | |
| २६ | अरोरा दिपीका पंकज | २६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | रकवी सुहास माधवराव | |
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | |
| ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | पुजारी कांचना शेखर | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | काझी रशीदा जमील | |
| ३३ | तारा विनायक घरक | ३३ | इनामदार जुबेर | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३७ | परमार अनिता भरत | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३८ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ४१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४२ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

ठराव बहुमताने मंजुर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(३०)

# मिरा -भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**प्रकरण क्र. १८ :- वैद्यकिय विभागाकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरिता आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. २० :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाकरिता सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पिय अंदाज पत्रकानुसार खालील बाबींसाठी ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

१) औषध खरेदासाठी रू. १,००,००,०००/-

२) लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरीअल, खरेदी/वार्षिक देखभाल करार यासाठी रू. १,००,००,०००/-

३) विविध लस खरेदीसाठी रू. ५०,००,०००/-

वरील अ. क्र. १,२,३ मधील औषधे, लस व साहीत्य खरेदीचे निविदा मागविण्यापूर्वी खालील अटीशर्तींचे पालन करून मा. स्थायी समिती समोर सदर साहीत्याची यादी ठेवण्यात यावी.

१. औषधे खरेदी करताना कंपनीचे नाव व Quantity यादी सादर करावी.

२. लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरीअल खरेदी करताना Product Specification व Quantity द्यावी.

३. विविध लस खरेदी करताना कंपनीचे नावे व आवश्यक Quantity द्यावी.

४. Quantity नमूद करावी व इतर माहीती नमूद करावी.

याप्रमाणे अटीशर्तीची अंमलबजावणी करून साहीत्य खरेदी करण्यास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त कामी ठरावाची वाट न पाहता त्वरीत अंमलबजावणी करण्यास व निविदा काढण्यास ही सभा मंजुरी देत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना व कंत्राटी तत्वावरील कामगारांना महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र व रूग्णालयमध्ये सर्व तपासण्या व उपचार मोफत देण्यात यावे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**प्रकरण क्र. १९ :-** **भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामाच्या सुधारित खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र. २१ :-**

भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामी दिलेला गोषवारा पहाता सदर सबवेचे काम पूर्ण होऊन वाहनांना सदर सबवे सुरु होणे हे गरजेचे आहे. तरी सदर सबवे बांधणे कामी सुधारीत अंदाजपत्रक रु. ५८,०८,५५,५९१/- खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर काम हे सबवेच्या मुळ कामाचे ठेकेदार मे. घई कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून करुन घेण्यात यावे.

भाईंदर पूर्व व पश्चिम दोन्ही बाजूस सबवेचे पोहच रस्ते व त्या अनुषंगिक सर्व कामे करणे करिता मे. राईट्स लि. यांना सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून गोषवाऱ्यात नमूद इतर आवश्यक अडथळे हटविणे इ. कामे करण्यास येणाऱ्या खर्चास, रेल्वे प्रशासनाचे आवश्यक चार्जेस व फी भरण्यास तसेच पोहच रस्त्याचे रु. २३,११,९६,८७७/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर काम हे मे. राईट्स लि. यांच्या देखरेखीखाली करण्यात यावे व पोहच रस्त्याच्या कामाची निविदा मागविण्यात यावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्रीम. सुमन कोठारी**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**प्रकरण क्र. २० :-** **मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते कार्पोरेशन बँक पर्यंत तसेच एन.एच. स्कुल ते टाऊन पार्क रत्याचे डाव्या बाजूस नाला बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.**

**ठराव क्र. २२ :-**

मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते कार्पोरेशन बँक पर्यंतचे गटार अरुंद असून त्यामधून नयानगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी पावसाचे पाणी साचते. तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओत्सवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड पर्यंतचे गटार अरुंद असून योग्य तो उतार नाही. तसेच त्यावरील स्लॅब बऱ्याच ठिकाणी तुटलेला आहे. त्यामुळे या गटारामधून पार्श्वनगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा हात नाही. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

| अ.क्र. | कामाचे नावव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ज्युपिटर इमारत ते कॉर्पोरेशन बँकपर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओत्सवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड २ पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ८७,६९,४००/- |

वरील कामाच्या अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**महापौर**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**प्रकरण क्र. २१ :-** महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्यांकरीता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानरगपालिका क्षेत्र मुंबई महानगरालगत असुन शहराची लोकसंख्या वेगाने वाढत असुन विकास झपाट्याने होत आहे. शहरात मुलभूत नागरी सोयी सुविधा पुरविणे, शहराचा सर्वांगीण विकास करणे, शहराच्या हिताच्या दृष्टीने शहरात नवनविन योजना, प्रकल्प राबविणे याबाबत इतर शहरात जावून तेथील विकास कामांबाबत व योजनांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्य, अधिकारी / कर्मचारी यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्याचे निश्चित करण्यात येत आहे.

महानगरपालिका अंदाजपत्रक २०१४-१५ मध्ये मा. नगरसेवक प्रशिक्षण / प्रवासभत्ता या लेखाशिर्षाखाली रक्कम रु. ४० लक्ष इतकी तरतुद आहे. तरी उपरोक्त लेखाशिर्षामधुन या दौऱ्याकरीता अंदाजे अपेक्षित रक्कम रु. २५,००,०००/- इतक्या खर्चास हि सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

महानगरपालिकेच्या जाहिराती ई टेंडरींगद्वारे देण्यात येतात. तथापी ई टेंडरींग करीता Digital Signature असावी लागते. अशाप्रकारे सन्मा. सदस्यांकरिता दौरा आयोजित करण्याचे काम कधीतरी होत असल्याने संबंधित ट्रॅव्हल एजन्सीकडे Digital Signature नसतात. करिता या दौऱ्याकरिता वृत्तपत्रात जाहिरात देऊन निवीदा मागविण्यात याव्यात. दौऱ्याकरीता नगरसचिव विभागाने आवश्यक मंजूऱ्या प्राप्त करुन घ्याव्यात. तसेच या दौऱ्याकरिता ट्रॅव्हल्स एजन्सी नेमणेस व आवश्यक बाबींची पुर्तता करणेस, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची “ड” मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये प्राप्त अधिकारात मा. आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

सुचक :-          अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यांत आला

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा -भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये प्रस्ताव)**

**प्रकरण क्र. २२ :-** **सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ११/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. भाईंदर (प.) टेम्बा हॉस्पीटलास "हजरत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती रेहमतुल्लाह अलैही (ख्वाजा गरीब नवाज) हॉस्पीटल" असे नामकरण करणेबाबत.**

**ठराव क्र. २४ :-**

भाईंदर (प.) टेंबा येथे हॉस्पीटल इमारतीचे बांधकाम बंद झालेले आहे. तसेच सदर हॉस्पीटल इमारतीस यापुर्वीच मा. महासभा दि. १९/११/२००८ ठराव क्र. ६३ अन्वये "भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल" असे नामकरण झालेले असल्याने "भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल" हे नाव कायम ठेवण्यात यावे असा ठराव मांडी आहे. तसेच भाईंदर पश्चिमेकडील महापालिका शाळेच्यासमोर सौ. प्रेमा शंकर चित्राव शिक्षण संकुल हे नाव द्यावे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | पाटील वंदना विकास | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरीधर | ९ | खण्डेलवाल सुरेश | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | नरेश तुकाराम पाटील | |
| ११ | शाह राकेश रतिशचंद्र | ११ | अनिता जयवंत पाटील | |
| १२ | शरद केशव पाटील | १२ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १४ | जैन गिता भरत | १४ | वंदना रामदास चक्रे | |
| १५ | जैन रमेश धरमचंद | १५ | सुमबंड महरूनीसा हारूनरशीद | |
| १६ | डॉ. राजेंद्र जैन | १६ | रविंद्र भिमदेव माळी | |
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १७ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १८ | सुजाता रविकांत शिंदे | १८ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १९ | मेहता नरेंद्र लालचंद | १९ | पाटील सुनिता कैलास | |
| २० | शाह सिमा कमलेश | २० | वेतोसकर राजेश शंकर | |
| २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २१ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २२ | डॉ. नयना मनोज वसानी | २२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| २४ | अरोरा दिपीका पंकज | २४ | पुजारी कांचना शेखर | |
| २५ | मीरादेवी रामलाल यादव | २५ | काझी रशीदा जमील | |
| २६ | अनिल बाबुराव भोसले | २६ | इनामदार जुबेर | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | २७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २८ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | २८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | २९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | ३० | सामंत प्रमोद जयराम | |
| ३१ | तारा विनायक घरत | ३१ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३३ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| ३४ | जयमाला किशोर पाटील | | | |
| ३५ | परमार अनिता भरत | | | |
| ३६ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३९ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४० | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४१ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४२ | भोईर भावना राजू | | | |
| ४३ | भोईर राजू यशवंत | | | |

ठराव बहुमताने मंजुर.

महापौर
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा -भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**दि. १९/०७/२०१४ च्या मा. महासभेमध्ये "ज" खालील प्रस्ताव.**

**प्रकरण क्र. २३ :- सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ व सुधारीत अर्थसंकल्पास मंजुरी देणेबाबत.**

**ठराव क्र. :-** २५

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा २०१३-१४ सुधारीत व २०१४-१५ च्या मुळ अर्थसंकल्पास मा. स्थायी समिती सभा दि. २६/०२/२०१४ प्रकरण क्र. १७३, ठराव क्र.१६० ने मंजुरी दिलेली आहे. अर्थसंकल्पातील माहे जानेवारी २०१४ ते मार्च २०१४ अखेरचा त्रैमासिक जमाखर्च तसेच माहे एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ अखेरचा जमाखर्चाचे अवलोकन केले असता सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाच्या अंदाजपत्रकात अंदाजे आरंभीची शिल्लक व सन २०१३-१४ मधील अंदाजीत प्रत्यक्ष शिल्लक यातील फरक रू.४४.६६ कोटी इतका आहे. ही रक्कम सुधारीत अर्थसंकल्पात प्रारंभीच्या शिल्लकेत वाढविण्यात यावी. या वाढविलेल्या रकमेस मा. स्थायी समिती सभा दि. २४/०६/२०१४ प्रकरण क्र. २० ठराव क्र. २० ने मंजुरी मिळालेली असून शिल्लक रकमेचे अंदाजपत्रकीय विभागणी लेखाशिर्ष निहाय विभागणी करण्यात आलेली आहे.

तरी दोन्ही शिल्लक रकमेतील फरकासह सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ व सुधारीत अर्थसंकल्पास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | पाटील वंदना विकास | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | खण्डेलवाल सुरेश | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरीधर | ९ | नरेश तुकाराम पाटील | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | अनिता जयवंत पाटील | |
| ११ | शाह राकेश रतिशचंद्र | ११ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १२ | शरद केशव पाटील | १२ | वंदना रामदास चक्रे | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | भोईर कमलेश यशवंत | |
| १४ | जैन गिता भरत | १४ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | |
| १५ | जैन रमेश धरमचंद | १५ | रविंद्र भिमदेव माळी | |
| १६ | डॉ. राजेंद्र जैन | १६ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १७ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १८ | सुजाता रविकांत शिंदे | १८ | पाटील सुनिता कैलास | |
| १९ | मेहता नरेंद्र लालचंद | १९ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २० | शाह सिमा कमलेश | २० | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २१ | झिनत रऊफ कुरेशी | |
| २२ | डॉ. नयना मनोज वसानी | २२ | मोहम्मद फरिद सिध्दीक कुरेशी | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | काझी रशीदा जमील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | अरोरा दिपीका पंकज | २४ | इनामदार जुबेर | |
| २५ | मीरादेवी रामलाल यादव | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | अनिल बाबुराव भोसले | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | २७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २८ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | २८ | सामंत प्रमोद जयराम | |
| २९ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३१ | तारा विनायक घरत | | | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३३ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| ३४ | जयमाला किशोर पाटील | | | |
| ३५ | परमार अनिता भरत | | | |
| ३६ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३९ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४० | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४१ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४२ | भोईर भावना राजू | | | |
| ४३ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४४ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | | | |
| ४५ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |

ठराव बहुमताने मंजूर.

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.१९/०७/२०१४

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची 'ड' मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये प्रस्ताव)

**प्रकरण क्र. २४ :- विकास कामांना मंजूरी देणे.**

ठराव क्र. :- २६

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) व मिरारोड (पूर्व) भागात मोठ्या प्रमाणावर नविन इमारतीची कामे सुरू असून विकासकाकडून मोठ्या प्रमाणात विकास कर जमा झाला आहे. इमारती मध्ये रहीवाशी राहावयास आलेले असून त्यांना चालण्यासाठी रस्ते, सांडपाण्यासाठी गटाराची व्यवस्था नाही. सुधारीत अर्थसंकल्पाव्दारे सदर कामे करण्यासाठी तरतुद उपलब्ध करण्यात येत असून त्यामधून कामे करण्याची आवश्यकता असून त्यांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| .क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) गोल्डननेस्ट रसत्यावरील खोडीयार धाम, इंद्रलोक येथील रमेश अपार्टमेंट व क्रिष्णा पालखी परीसरातील गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. १,१४,२६,४५०/- |
| २ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पिटल रोड, मेडतीया नगर, पर्लडायमंड, दुर्गा रेसीडेन्सी ते राम वाटीका, रामदेव पार्क येथील रोझवुड टॉवर येथील गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ८५,१६,१००/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) कनकिया येथील अंकुर इमारत, सुंदर सागर, प्रथमेश हेरीटेज, शालोम गार्डन, इडन रोझ व महापौर निवास समोरील रस्ता परीसरातील गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. १,१०,३८,२००/- |
| ४ | हटकेश येथील एस.के.स्टोन रस्ता, पुनम गार्डन, आकृती इमारत परीसरातील गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ८९,७६,६००/- |
| ५ | भाईंदर (पूर्व) कनकिया येथील शिवार गार्डन ते सरदार पटेल व आर.बी.के. शाळेसमोरील रस्त्यालगत गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ८०,५४,२००/- |
| ६ | हटकेश येथील आकृती गार्डेनिया, गंगासदन व ॲकोर्ड क्रिस्टल येथील रस्ता तयार करणे | रु. ७३,९७,२५०/- |
| ७ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पिटल रस्ता आ.क्र. २३९ ते २४४ व भवानी मेडीकल ते सरोगी अपार्टमेंट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु. ९७,५३,२००/- |
| ८ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेज ४ ते खाडीसमांतर रस्ता व दिपक हॉस्पिटल रोडवरील दुर्गा रेसीडेन्सी ते खाडीसमांतर रस्ता पर्यंत रस्ते तयार करणे. | रु. १,७३,२१,०५०/- |
| ९ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेज ६ येथील आ.क्र. २३० लगत गटार बांधणे व रस्ता तयार करणे. | रु. १,१९,३९,२५०/- |
| १० | भाईंदर (पूर्व) कनकिया येथील तिवारी कॉलेज ते ओस्तवाल आर्चिड (आ.क्र. २४८ लगत) पर्यंतचा डी.पी. रस्ता तयार करणे. | रु. १,४४,७४,३००/- |
| ११ | भाईंदर (पूर्व) कनकिया येथील एच.डी.एफ.सी. बँक ते साई पॅलेस व विनय हार्मिटेज समोरील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु. ७१,२१,५५०/- |

| | | |
|---|---|---|
| १२ | हटकेश येथील एस.के.स्टोन, पुनम गार्डन ते रितु पॅराडाईज पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु. ७३,२५,६००/- |
| १३ | हटकेश काशिगाव येथील विनय नगर ते राज मंदिर कॉम्प्लेक्स पर्यंत रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु. २,२०,६७,३५०/- |
| १४ | काशिगाव येथील झंकार कंपनी ते पुजा पार्क व सिल्व्हर सरीता येथील रस्त्यालगत गटारे बांधणे व उर्वरीत रस्ता तयार करणे. | रु. १,३७,७०,२५०/- |
| १५ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्ता मुकुंद पॅलेस ते चाळघर ते कनकिया तिवारी कॉलेज व लक्ष्मी पार्क पर्यंत रस्त्याच्या मध्यभागात आर.सी.सी. डीव्हायडर बनविणे | रु. १,५३,६४,०००/- |
| १६ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्ता ते कनकिया रस्ता जोडणारा ३०.०० मी. डी.पी. रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. (तिवारी कॉलेज समोर) | रु. ७,००,५०,६००/- |
| १७ | हटकेश येथील श्री. अॅव्हेन्यू ते वेस्टर्न हॉटेल, (स.क्र. ९० ते १३२, घोडबंदर) पर्यंतचा रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु. ५,८१,५८,०००/- |
| १८ | कनकिया येथील जांगिड एनक्लेव्ह ते मेरीगोल्ड रस्त्यापर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु. २,०३,४३,४००/- |
| १९ | कनकिया येथील मेरी गोल्ड १ व २ पासून मंगलनगर पर्यंत रस्ता तयार करणे व उर्वरीत ठिकाणी गटारे बांधणे. | रु. २,२०,७९,६५०/- |
| २० | कनकिया येथील वासुदेव कॉम्प्लेक्स रस्त्यावरील स्वर्णा इमारत ते मंगलनगर कडे जाणारा रस्ता तयार करणे व गटारे बांधणे.. | रु. ३,०५,११,४००/- |
| २१ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पिटल रस्त्यावरील दुर्गा रेसीडेन्सी ते ३० मी. डी.पी. रस्ता पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजूस गटार बांधणे. | रु. १,५४,९९,९००/- |
| २२ | भाईंदर (पूर्व) रामदेव पार्क रस्ता श्वेता रेसीडेन्सी ते कनकिया पाण्याची टाकी, आ.क्र.२५५ पर्यंत रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु. २,२१,२१,७५०/- |
| २३ | भाईंदर (पूर्व) नवघर एस.एन. कॉलेज समोरील नाल्यावर स्लॅब टाकणे. | रु. ९७,५०,०००/- |
| २४ | मिरारोड (पूर्व) पेणकरपाडा सुकाळ तलावाचे संरक्षण भिंत बांधणे, दुरूस्ती व सुशोभिकरण करणे | रु. ४८,८२,३००/- |
| २५ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १० मधील ओम पुष्पक ते मणिभद्र इमारती पर्यंत नाल्याची पुर्नबांधणी करणे | रु. ४०,२५,५५५/- |
| २६ | मोर्वा गांव येथील सुर्यदेव तलाव विकसित करणे | रु. १,६७,२९,७५०/- |
| २७ | भाईंदर (पूर्व) वेंकटेश्वर गार्डन कुंपण भिंत बांधून नूतनीकरण करणे | रु. २५,००,०००/- |
| २८ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १६ मधील महेश अपार्टमेंट ते हेमा कुंज इमारती पर्यंत रस्ता पूर्नःपृष्ठीकरण करणे | रु. ७,१३,३१०/- |
| २९ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १४ व १६ मधील शोभना अपार्टमेंअ ते रायगड बिल्डींग पर्यंतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे | रु. १०,५६,२४५/- |
| ३० | प्रभाग क्र. ४६ मधील काशी मोरे कंपनी ते फिल्म स्ट्यूडीयो पर्यंत नाला बांधणे | रु. ८,२८,६२,६००/- |
| ३१ | प्रभाग क्र. ४६ मधील लिबर्टी तबेला ते विशाल डेरी पर्यंत मोठा नाला बनविणे | रु. ४,०७,६५,०००/- |
| ३२ | मिरारोड (पूर्व) एस.के. स्टोन रस्त्यावरील शितल नर्सरी ते देना बँक पर्यंत आर.सी.सी. नाला बांधून स्लॅब टाकणे | रु. २,४५,००,०००/- |
| ३३ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. ७ मधील इमारत क्र. डी/१४ ते डी/२२, | रु. २८,५२,२००/- |

| | | |
|---|---|---|
| | डी/६ ते बी/२७ तसेच बी/२६ ते इमारत क्र. अे/१ ते टेलिफोन बुथ पर्यंत आर.सी.सी. नाला बांधून स्लॅब टाकणे | |
| ३४ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. ५ मधील मैदानात पाण्याची टाकी, पंपरुम, पाथवे बांधणे, संरक्षण भिंतीवर ग्रील बसविणे व रंगकाम करणे | रु. २५,००,०००/- |
| ३५ | पेणकरपाडा खोडीयार नगर ते पेणकरपाडा स्मशानभूमी पर्यंतचा रस्ता खडीकरण करून डांबरीकरण करणे | रु. २५,६२,४००/- |
| ३६ | पेणकरपाडा बॉम्बे बॉटल कंपनी ते तबेला पर्यंत नाला बनविणे | रु. ३१,३०,५००/- |
| ३७ | मिरारोड (पूर्व) एम.आय.डी.सी. अंतर्गत रस्ते खडीकरण करून डांबरीकरण करणे | रु. ४८,००,०००/- |
| ३८ | मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. ४१ मधील म्हाडा वसाहत मधील रस्ते व गटारे बनविणे | रु. २८,९७,३००/- |
| ३९ | भाईंदर (पूर्व) होली क्रॉस शाळेजवळ समाज मंदिर बांधणे | रु. २५,००,०००/- |
| ४० | भाईंदर (पूर्व) कल्पतरू ते सुप्रिया पार्क, साईबाबा नगर येथे सी.सी. रस्ता तयार करणे. | रु. ३०,०३,०००/- |
| ४१ | हटकेश येथील यू. एस. ओसवाल शाळा ते आकृतीकडे जाणारा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. ६०,६५,६००/- |
| ४२ | मिरा गावठाण बाप्पा सिताराम मंदिर ते दिल्ली दरबार पर्यंत नाला बनविणे | रु. ३,४९,०५,८००/- |
| ४३ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ गॅस गोडावून ते हनूमान मंदिर पर्यंत गटार बांधणे. | रु. ३१,५०,०००/- |
| ४४ | भाईंदर (प.) आरक्षण क्र. १३२ ते मिरा हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता तयार करणे | रु. ६७,१४,९००/- |

वरील कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामासाठी लागणारी जास्तीची रक्कम अर्थसंकल्पातील शिल्लक राहणाऱ्या रक्कमेमधून पुर्न विनियोजन करून उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच अर्थसंकल्पातील तरतुदी प्रमाणे टप्प्याटप्प्याने निविदा मागवाव्यात. नाल्याची कामे सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान अभियान मध्ये समाविष्ठ करून त्या योजनेतून करण्यात यावीत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. प्रभाकर म्हात्रे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | **निरंक** |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | पाटील वंदना विकास | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | खण्डेलवाल सुरेश | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरीधर | ९ | नरेश तुकाराम पाटील | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | अनिता जयवंत पाटील | |
| ११ | शाह राकेश रतिशचंद्र | ११ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १२ | शरद केशव पाटील | १२ | वंदना रामदास चक्रे | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | भोईर कमलेश यशवंत | |
| १४ | जैन गिता भरत | १४ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | |
| १५ | जैन रमेश धरमचंद | १५ | रविंद्र भिमदेव माळी | |
| १६ | डॉ. राजेंद्र जैन | १६ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १७ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १८ | सुजाता रविकांत शिंदे | १८ | पाटील सुनिता कैलास | |
| १९ | मेहता नरेंद्र लालचंद | १९ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २० | शाह सिमा कमलेश | २० | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २१ | झिनत रऊफ कुरेशी | |
| २२ | डॉ. नयना मनोज वसानी | २२ | मोहम्मद फरिद सिध्दीक कुरेशी | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | काझी रशीदा जमील | |
| २४ | अरोरा दिपीका पंकज | २४ | इनामदार जुबेर | |
| २५ | मीरादेवी रामलाल यादव | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | अनिल बाबुराव भोसले | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | २७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २८ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | २८ | सामंत प्रमोद जयराम | |
| २९ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | २९ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | ३० | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | |
| ३१ | तारा विनायक घरत | | | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३३ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| ३४ | जयमाला किशोर पाटील | | | |
| ३५ | परमार अनिता भरत | | | |
| ३६ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३९ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४० | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४१ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४२ | भोईर भावना राजू | | | |
| ४३ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४४ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | | | |
| ४५ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |

ठराव बहुमताने मंजुर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

(५२)

## मा.महासभा दि.१९/०७/२०१४.

**प्रकरण क्र.(२५) :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये लावण्यात येणा-या जाहिरातींचे सुधारित दर ठरविणे बाबत**

ठराव क्र.- (२८)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ आणि ३९२ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम -२००३ अन्वये जाहिराती व आकाशचिन्ह इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगे मिरा भाईंदर क्षेत्रातील जाहिरातीच्या (विविध भागात होर्डिंग्ज (आकाशचिन्ह), कमानी, व्यापारी आस्थापनेवरील जाहिराती, दुकानांवरील जाहिरात फलक व अन्य प्रकारच्या जाहिराती) वाढ होण्याच्या दृष्टीने मा.स्थायी समिती ठराव क्र.४३, दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३५,दि.१९/०३/२००८ अन्वये जाहिरात फी चे दरपत्रकास मंजुरी देण्यात आली होती. यानंतर जाहिरातीचे दर वाढविण्यात आलेले नाहीत. याकरीता मा. स्थायी समिती सभा दि. ११-७-२०१४ प्र.क्र. २८ ठराव क्र. २८ जाहिरात प्रकरण मध्ये दरवाढीस मंजूरी दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | जाहिरातींचे प्रकार | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| | | प्रति चौ.फुट प्रति महिना |
| १ | दिव्याचे खांबावरील फलक (किऑस्क) प्रदर्शित दर्शनी आकार | रु.६०/- (~~Back to Back~~) |
| २ | आकाशचिन्ह (होर्डिंग्ज) मनपा जागेत निविदा प्रक्रियाद्वारे | रु.४०/- |
| ३ | आकाशचिन्ह (होर्डिंग्ज) व्यक्तिगत / खाजगी संस्था यांना मनपा जागेत किंवा सार्वजनिक रस्तालगत | रु.६०/- |
| ४ | खाजगी जागा / इमारत जाहिरात इ. ठिकाणावरील आकाशचिन्ह (होर्डिंग्ज) | रु.३०/- |
| ५ | कमानी (कायम स्वरुपी मनपाच्या जागेत) दिशादर्शक बंधनकारक आहे | रु.६०/- |
| ६ | कॅन्टीलिव्हर पोल (प्रकाशित होर्डिंग्ज) मनपाच्या जागेत किंवा रस्तालगत | रु.६०/- |
| ७ | प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहीरात फलक (होर्डिंग्ज) | रु.४०/- |

१. वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २०% जादा फी आकारण्यात येईल.

२. फक्त खाजगी जागेतील होर्डिंग्ज यांना जाहिरात फी च्या २०% कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.

३. महानगरपालिकेने निविदा न मागवता ज्या होर्डीग्जला परवानगी दिलेली आहे. त्या सर्व होर्डिंग्जची परवानगी रद्द करुन विभागाने त्याबाबतच्या नविन निविदा प्रसिध्द कराव्यात. वरील नविन दर प्रमाणे पैसे ३१/७/१४ ·

४. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमामधील सर्व बस तसेच बस थांबे याबाबतच्या निविदा जाहिरात विभागामार्फत मागविण्यात याव्यात.

५. जाहीरात ठेकेदारांबरोबर होणारे सर्व करारनामे मा. स्थायी समिती समोर सादर करावेत. मा. करारनाम्यांनी मा. स्थायी समितीची मंजूरी घेतल्यानंतर संबंधित विभागाने करारनामे अंतिम करावे. (48)

६. मिरा-भाईंदर महानगरपालिका व मे. रिलायन्स इन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि. यांचे बरोबर विद्युत पोलवरील किऑस्क याबाबत केलेला करारनामा रद्द करण्यात यावा व दोन विद्युत पोलच्या मधील जागेत नव्याने जाहीरात पोल उभारुन त्यावर जाहीरात करण्याच्या निविदा मागविण्यात याव्यात. या पोलच्या उभारणी करीता येणारा खर्च निविदाधारक/ठेकेदार यांनी करावयाचा आहे.

७. ज्या होर्डिंग्ज कॅन्टीलिव्हर/कमानी यांचा प्रथम कालावधी संपला/संपत असेल अशा सर्व जाहीरात माध्यमांना मुदतवाढ न देता त्याबाबतच्या नविन निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात.

८ पूर्व परवानगीविना दिशा दर्शविणारा जाहिरात होर्डिंग करारनामा रद्द करावे.

वरीलप्रमाणे तक्त्यात दर्शविलेल्या जाहिरात फी चे दरास या ठरावाच्या दिनांका नंतर भविष्यात सर्व प्रकारच्या जाहिरात माध्यमांना परवानगी (मनपाच्या अथवा खाजगी जागा इमारती फिरत्या जाहीराती इ. देण्यात येत असताना सदर ठरावातील दराप्रमाणे जाहिरात फी आकारण्यात यावी अशी मान्यता ही सभा देत आहे. नवीन दर 1/8/2014 पासून आकारण्यात यावेत असा ठराव मांडत आहे.

सुचक :- अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा -भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२०१४

**दि. १९/०७/२०१४ च्या मा. महासभेमध्ये "ज" खालील प्रस्ताव.**

**प्रकरण क्र. २६ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील झोपडपट्टीमधील नागरिकांना मुलभुत सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.**

ठराव क्र. (२८) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टया, चाळीमध्ये राहणा-या रहिवाश्यांना पालिका प्रशासनाकडून मुलभूत सेवा दिल्या जात नसून, प्रशासनाकडून अशा वस्त्यांकडे मुलभुत सेवेबाबत दुर्लक्षित व निष्काळजीपणा होत आहे. या नागरिकांना मुलभुत सेवा देणेकरीता पुढीलप्रमाणे ठराव सर्वानुमते मांडण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये जे अनधिकृत बांधकाम केली जात आहे. अशा बांधकामांवर महानगरपालिका शास्तीसह कर आकारणी करीत आहे. त्याचप्रमाणे ज्या नागरीकांनी झोपड्या/ चाळी यांचे अनधिकृत बांधकाम केलेले आहे अशा घरांना मालमत्ता कराची आकारणी करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या *अंतर्गत अनधिकृत बांधकामांवर आकारण्यात येणारी शास्ती कराची आकारणी* झोपडपट्टीधारकांवर करावी.

झोपडपट्टी/चाळ अशा वस्त्यांमध्ये प्रत्येक नागरिकाला नळ कनेक्शन महानगरपालिकेस देणे शक्य होणार नाही. याकरिता पाणीपुरवठा विभागाने ज्या ठिकाणी अशा वस्त्या आहेत त्यांचे सर्व्हेक्षण करून त्यांना कमीत कमी पिण्याच्या पाण्याकरीता ग्रुप कनेक्शन किंवा सार्वजनिक नळ कनेक्शन (Stand Post) मंजुर करावे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी झोपडपट्या व चाळींचे बांधकाम झालेले आहे अशा ठिकाणच्या मालमत्तांचे हस्तांतरण करणे करीता त्यांच्यामध्ये झालले खरेदी विक्रिचे करारनामे/प्रतिज्ञापत्रे ग्राह्य धरून मालमत्तांचे हस्तांतरण करण्यात यावे. व महानगरपालिकेने नियमानुसार ठरविलेली फी घ्यावी.

झोपडपट्टया व चाळीमध्ये वीज कनेक्शन देणेकरीता बांधकाम विभागाने त्यांना नाहरकत प्रमाणपत्र द्यावे.

झोपडपट्टया व चाळीमधील नागरीकांकरीता महानगरपालिकेने प्राथमिक आरोग्य केंद्र/रूग्णालय सुरू करून वैद्यकिय सेवा सुविधा उपलब्ध करून दयाव्यात.

झोपडपट्टया व चाळीमधील नागरीकांकरीता ज्या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था नाही अशा ठिकाणी सुलभ *शौचालयाची व्यवस्था करावी. याकरीता बांधकाम विभागाने सुलभ शौचालय बांधण्याकरीता* प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करावेत. तसेच ज्या ठिकाणी सुलभ शौचालये नादुरूस्त आहेत अशा ठिकाणाची सुलभ शौचालयांची तातडीने दुरूस्ती करून घ्यावी.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध झोपडपट्टी वसाहती मध्ये तेथील नागरीकांना रस्ते व स्ट्रीट लाईटची व्यवस्था करीत आलेले आहेत. याकामी महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात निधी खर्च करीत असते. उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने त्यांच्या मुळ समस्या सोडविण्यास मदत होत असल्याने या ठरावात सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. गिता जैन     अनुमोदक :- श्री. अनिल भोसले**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | पाटील वंदना विकास | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरीधर | ९ | भोईर कमलेश यशवंत | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | |
| ११ | शाह राकेश रतिशचंद्र | ११ | रविंद्र भिमदेव माळी | |
| १२ | शरद केशव पाटील | १२ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १४ | जैन गिता भरत | १४ | पाटील सुनिता कैलास | |
| १५ | जैन रमेश धरमचंद | १५ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १६ | डॉ. राजेंद्र जैन | १६ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १७ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १८ | सुजाता रविकांत शिंदे | १८ | मोहम्मद फरिद सिध्दीक कुरेशी | |
| १९ | मेहता नरेंद्र लालचंद | १९ | काझी रशीदा जमील | |
| २० | शाह सिमा कमलेश | २० | इनामदार जुबेर | |
| २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २२ | डॉ. नयना मनोज वसानी | २२ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २४ | अरोरा दिपीका पंकज | २४ | सामंत प्रमोद जयराम | |
| २५ | मीरादेवी रामलाल यादव | २५ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २६ | अनिल बाबुराव भोसले | २६ | पुजारी कांचना शेखर | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २८ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| २९ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३१ | तारा विनायक घरत | | | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३३ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| ३४ | जयमाला किशोर पाटील | | | |
| ३५ | परमार अनिता भरत | | | |
| ३६ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३९ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४० | जाधव मोहन महादेव | | | |
| ४१ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |

**ठराव बहुमताने मंजुर.**

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. १९/०७/२०१४

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण दोन (के) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्रमांक.( २७ ) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरारोड) उन्नत मार्ग, पादचारी पुल (Pedestrians Grade Separators/ Subway Project) बांधणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

ठराव क्रमांक ( २८ )

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ काशिमिरा नाका ते वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा विकास योजनेतील ४५.०० मीटर रूंदीचा रस्ता असून शहरात येण्या-जाण्यासाठी सदर एकमेव प्रमुख रस्ता आहे. सदर रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड ताण असून सकाळ-संध्याकाळच्या वेळेस वाहतूकीचा खोळंबा होत असतो. सदर रस्त्यावर सात ठिकाणी सिग्नल आहेत. वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ येथे पोहोचण्यासाठी रहदारीच्या वेळेस २५ ते ४० मिनिटे वेळ लागतो.

सदर रस्त्यावर खालील ठिकाणी उन्नत पुल/ भुयारी मार्ग तसेच पादचारी पुल बांधण्याची आवश्यकता असून मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मे. मोनार्च सर्व्हेअर्स ॲन्ड इंजिनिअर्स कन्सल्टंट प्रा. लि. यांची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित काम |
|---|---|---|
| १) | वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) | पादचारी पुल |
| २) | दिपक हॉस्पीटल समोरील चौक | उन्नत मार्ग |
| ३) | टाऊन पार्क समोरील चौक | उन्नत मार्ग |
| ४) | कनकिया चौक (मॅक्डोनल्ड जवळ) | उन्नत मार्ग |
| ५) | श्रीकांत जिचकर चौक (एस.के. स्टोन) | उन्नत मार्ग |
| ६) | सिल्व्हर पार्क चौक | उन्नत मार्ग |
| ७) | हटकेश उद्योगनगर चौक | उन्नत मार्ग |
| ८) | प्लेझंट पार्क चौक | उन्नत मार्ग |
| ९) | काशिमिरा नाका (छत्रपती शिवाजी महाराज पुतळया पाठीमागे) | पादचारी पुल |

प्रस्तावित कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून हाती घेणेबाबत पाठपूरावा करण्यात येत आहे, तथापी सदर कामे ही महानगरपालिकांतर्गत येणारी स्थानिक स्वरुपाची कामे असल्याने सदर कामे प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणार नाहीत असे धोरण निश्चित झाल्याचे त्यांनी कळविलेले आहे.

(५७)

शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने वरील प्रस्तावित ठिकाणी पादचारी पुल व उन्नत मार्ग बांधणे आवश्यक आहे. सदर कामासाठी रु. ३९.३२ कोटी एवढा खर्च अपेक्षित असून त्यापैकी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) येथील पादचारी पुलासाठी शासनाकडून विशेष अनुदान म्हणून उपलब्ध झालेले आहे. तरी सदर कामाची रक्कम वगळून उर्वरीत ३७.८२ कोटी रक्कमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामासाठी तातडीने निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात. तसेच अर्थसंकल्पात चालू वर्षात लागणारा आवश्यक निधी पुर्नविनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(५८)

# मिरा -भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/११/२०१४

## अभिनंदनाचा ठराव

ठराव क्र. ३०

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणूकामध्ये भारतीय जनता पार्टीने मित्र पक्षांच्या सहाय्याने सर्वाधिक १२२ जागा जिंकलेल्या आहेत. तसेच मा. श्री. नरेंद्र मोदी व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री. अमित शहा यांच्या मार्गदर्शाने महाराष्ट्रामध्ये प्रथमच भारतीय जनता पार्टीचे सरकार मा.देवेंद्र फाडवणीस, मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन हे सभागृह करीत आहे. तसेच आपल्या महानगरपालिकेतील सन्मा. नगरसेवक, विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता हे १४५ विधानसभा मतदार संघातून ३३ हजार मताधिक्क्याने भारतीय जनता पार्टीमधून निवडून आल्याबद्दल हे सभागृह त्यांचे अभिनंदन करीत आहे. श्री. नरेंद्र एल. मेहता यांना या राजकिय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देण्यात येत आहे.

तसेच विद्यमान आमदार श्री. प्रताप सरनाईक हे पुनःश्च १४६ ओवळा-माजीवडा, विधानसभाम मतदार संघातून निवडून आल्याने त्याचप्रमाणे बहुजन विकास आघाडीचे लोकनेते मा. श्री.हितेंद्र ठाकूर निवडून आल्याने त्यांचे देखील हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

सुचक :- शरद पाटील

अनुमोदक :- सुमन कोठारी

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १५-११-२०१४

## अभिनंदनाचा ठराव

ठराव क्र० ३१

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणूकांमध्ये शिवसेना पक्षप्रमुख मा. श्री. उध्दवजी ठाकरे साहेब यांच्या मार्गदर्शाने महाराष्ट्रात शिवसेना पक्षाने स्वबळावर स्वतःचे ६३ आमदार निवडणू आणलेले आहेत. त्याबद्दल त्यांच हार्दीक अभिनंदन हे सभागृह करीत आहे. तसेच ठाणे जिल्हयाचे संपर्क प्रमुख मा. आमदार श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांची विधानसभेचे विरोधी पक्षनेते पदी नियुक्ती झाल्याबद्दल तसेच विद्यमान आमदार श्री. प्रतापजी सरनाईक हे पुनःश्च १४६ ओवळा-माजीवडा विधान सभा मतदार संघातुन निवडून आल्याने त्यांना त्यांच्या राजकीय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

तसेच आपल्या महानगरपालिकेतील सन्मानीय नगरसेवक, विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता हे १४५ मिरा-भाईदर विधानसभा मतदार संघातुन भारतीय जनता पार्टी तसेच मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर हे बहुजन विकास आघाडी मधुन निवडून आल्याबद्दल हे सभागृह त्यांचे अभिनंदन करीत आहे. तसेच त्यांच्या राजकीय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देवून त्यांचेही अभिनंदन करीत आहेत.

सुचक : श्री० प्रशांत दळवी

अनुमोदन : श्री० निलम ढवण

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/११/२०१४

**अभिनंदन ठराव क्र.३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मधले नगरसेवक आज ह्या शहराचे आमदार निवडून आलेले आहेत. त्यांना काँग्रेस पक्षाच्या वतीने मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. त्यांनी राज्यशासनाकडून ह्या शहरासाठी लाभदायक योजना आणाव्यात. ह्या शहराचे हितामध्ये त्यांनी चांगले काम करावे, विकासाच्या दृष्टीने त्यांनी चांगले काम करावे. ह्या शहराच्या विकासासाठी चांगली चळवळ चालवावी. माझा विश्वास आहे ते करतीलच. त्यांना मी माझ्या पक्षाच्या वतीने शुभेच्छा देतो व ते आमदार झाल्याबद्दल मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. अशरफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

(51)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/११/२०१४

**प्रकरण क्र. २८ :-** दि. ११/०६/२०१४, दि. २३/०६/२०१४ (दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. 33 :-**

दि. ११/०६/२०१४ व दि. २३/०६/२०१४ (दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** **अनुमोदक :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १५/११/२०१४

**प्रकरण क्र. २९ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाया निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे १) श्रीम. अनिता जयवंत पाटील २) श्री. राजु यशवंत भोईर ३) श्री. मुन्नासिंग ४) श्री. रोहिदास शंकर पाटील ५) श्री. शरद केशव पाटील ६) श्रीम. मिरादेवी रामलाल यादव ७) श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी ८) श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम

**ठराव क्र. ३४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदस्यांपैकी निम्मे आठ सदस्य माहे नोव्हेंबर २०१४ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना भारतीय जनता पार्टी ३, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ३, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस १ व शिवसेना १ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची नेमणूक दोन वर्षाकरीता करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंडोंसा | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| २. | श्री. मुन्ना सिंग | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ३. | श्री. नरेश पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४. | श्री. प्रशांत केळूसकर | भारतीय जनता पार्टी |
| ५. | सौ. नयना वसाणी | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्री. मोहन जाधव | भारतीय जनता पार्टी |
| ७. | श्री. सुहास रकवी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ८. | श्री. जयंतीलाल पाटील | शिवसेना |

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/११/२०१४

**प्रकरण क्र. ३० :-** प्रकरण क्र. ३०, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ३५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरवता येईल अशा रितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे कलम ३०(७) मध्ये आहे. त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे. व उपरोक्त कलमांन्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याप्रमाणे १५ सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळा प्रमाणे तौलानिक संख्या नुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- शरद पाटील**

**पक्ष/आघाडी यांच्यामार्फत वृक्षप्राधिकरण समितीवर देण्यात आलेली सदस्यांची नावे**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | सौ. मिरादेवी रामलाल यादव | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्रीम. डिम्पल मेहता | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्री. सिंग मदन उदितनारायण | भारतीय जनता पार्टी |
| ४. | श्री. जैन दिनेश तेजराज | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. शर्मा सुनिला सत्येंद्र | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ७. | श्री. सुरेश खंडेलवाल | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ८. | डॉ. आसिफ गुलाब शेख | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ९. | सौ. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १०. | श्री. राजू यशवंत भोईर | बहुजन विकास आघाडी |
| ११. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | शिवसेना |
| १२. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | शिवसेना |
| १३. | श्रीम. विराणी रेखा अनिल | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १४. | श्रीम. पिसाळ मनिषा नामदेव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १५. | श्री. प्रमोद जयराम सावंत | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १५/११/२०१४

**प्रकरण क्र. ३१ :-** महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे.

**ठराव क्र. ३६:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व ३१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करण्याची तरतुद आहे. मनपा मध्ये महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची गठीत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे कलम ३०(७) अन्वये समितीमध्ये रचना करता येते. त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे. व उपरोक्त कलमांन्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याप्रमाणे १५ सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळा प्रमाणे तौलानिक संख्या नुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- शरद पाटील**

**पक्ष/आघाडी यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर देण्यात आलेली सदस्यांची नावे**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | सौ. वर्षा गिरधर भानुशाली | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्रीम. भगवतीबेन रावल | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्रीम. सुजाता रविकांत शिंदे | भारतीय जनता पार्टी |
| ४. | श्रीम. सिमा कमलेश शहा | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | भारतीय जनता पार्टी |
| ६. | सौ. भावना राजु भोईर | बहुजन विकास आघाडी |
| ७. | श्रीम. शुभांगी महिन कोटीयन | शिवसेना |
| ८. | श्रीम. अनिता भरत परमार | शिवसेना |
| ९. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १०. | श्रीम. भट्ट दिप्ती शेखर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ११. | सौ. शर्मिला विन्सन बगाजी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १२. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १३. | श्रीम. शिल्पा कमलेश भावसार | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १४. | श्रीम. सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १५. | श्रीम. सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १५/११/२०१४

**सभा तहकुबी ठराव क्र. ३७ :-**

आजची सभा २५ नोव्हेंबर सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदन :- सौ. सुमन कोठारी**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(५८)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/११/२०१४

## ( दि. १५/११/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ३२ :-** **महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान प्रदान केल्याबद्दल मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी व ठोक मानधनावरील कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण कालावधीत कर्मचारी संघटनाकडुन, सन्मा.पदाधिकारी यांच्याकडुन सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४ दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

गोषवाऱ्यास अनुसरुन सन-२०१३ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र.४६, दि. १९/१०/२०१३ अन्वये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु. १,९६,१७,५००/- एवढे सानुग्रह अनुदान रक्कम मंजूर करण्यात येऊन, त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले होते.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी /कर्मचारी | प्रदान केलेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम रुपये | अनुदानापोटी झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४५२ | ११,०००/- | १,५९,७२,०००/- |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ११,०००/- | २१,२३,०००/- |
| ३ | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७७ | ८,५००/- | ६,५४,५००/- |
| ४ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ५,०००/- | २५,०००/- |
| ५ | आर.सी.एच. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | २९ | ८,५००/- | २,४६,५००/- |
| ६ | क्षयरोग, कुष्टरोग नियंत्रण कर्मचारी | ३३ | ५,०००/- | १,६५,०००/- |
| ७ | लिंक वर्कर | १२७ | २,०००/- | २,५४,०००/- |
| ८ | सुवर्ण जयंती योजना (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,५००/- | ९०००/- |
| ९ | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १७ | ८,५००/- | १,४४,५००/- |
| १० | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०६ | ४,०००/- | २४,०००/- |
| | **एकुण** | **१९४१** | | **१,९६,१७,५००/-** |

(५७)

चालू वर्षासाठी सन्मा. पदाधिकारी व कामगार संघटना यांनी महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी व ठोक मानधनावरील कर्मचारी यांना सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली होती. याअनुषंगाने महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१४ रोजी सहा महिन्यांपेक्षा अधिक सेवा झालेल्या कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी मंजूर रक्कमेप्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत प्रस्ताव निर्णयास्तव सादर केलेला होता.

राज्यातील विधानसभा निवडणूक आचारसंहिता नजीकच्याकाळात लागून दिवाळीपर्यंत आचारसंहितेचा कालावधी संपणार असल्याची शक्यता असल्याने, याप्रकरणी दिवाळीपूर्वी मा. महासभेत धोरणात्मक निर्णय होणे शक्य नव्हते. त्यामुळे मा.महापौर यांनी सर्व अधिकारी, पदाधिकारी व सर्व पक्षीय गटनेते यांची बैठक दि.०३/०९/२०१४ रोजी आयोजित केलेली होती. सदर बैठकीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानाच्या रक्कमेत रु.१०००/- ने वाढ करावी व दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानाचे वाटप करावे असा एकमताने निर्णय घेण्यात आला. याअनुषंगे सदर सभेच्या प्रस्तावानुसार महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे मा.महासभेची कार्योत्तर मंजूरीच्या अधीन राहून दिवाळीपूर्वी वाटप केलेले आहे.

***<u>महानगपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता :-</u>***

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी /कर्मचारी | प्रदान केलेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम रुपये | अनुदानापोटी झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४७२ | १२,०००/- | १,७४,१५,०००/- |
| २ | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७४ | ९,५००/- | ६,८५,५८४/- |
| ३ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ६,०००/- | ३०,०००/- |
| ४ | आर.सी.एच. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०३ | ९,५००/- | २८,५००/- |
| ५ | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३३ | ६,०००/- | १,९८,०००/- |
| ६ | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२६ | ३,०००/- | ३,७८,०००/- |
| ७ | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ५,५००/- | ११,०००/- |
| ८ | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १७ | ९,५००/- | १,५०,४१७/- |
| ९ | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०६ | ५,०००/- | २८,७५०/- |
| १० | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील) | १८ | ५,५००/- | ६५,५४७/- |
| ११ | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील) | ०७ | ९,५००/- | ४४,३३१/- |
| | **एकुण** | **१७६३** | | **१,९०,३५,१२९/-** |

***<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्ग करीता:-</u>***

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१३ मध्ये मंजूर केलेली सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सन २०१४मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना अनुदानापोटी होणारा खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९१ | १२,०००/- | २२,९२,०००/- |

वरीलप्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना व ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांना यावर्षी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदानाकरीता रु.१,९०,३५,१२९/- इतका खर्च झालेला आहे. आणि यावर्षीच्या अंदाजपत्राकात रक्कम रु.२.०० कोटी इतकी तरतुद आहे. ज्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे राहून गेले आहे अशा कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देण्यात येत आहे.

तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी यावर्षी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदानाकरीता रक्कम रु. २२,९२,०००/- इतका खर्च झालेला आहे. आणि यावर्षीच्या अंदाजपत्राकात रक्कम रु.२५.०० लक्ष इतकी तरतुद आहे.

तरी वरीलप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सन २०१४ मध्ये दिवाळी निमित्त प्रदान केलेल्या सानुग्रह अनुदान वाटपाच्या खर्चास ही सभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/११/२०१४
## ( दि. १५/११/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ३३ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या खालील मालमत्ता असून सदर मालमत्ता विविध कार्यक्रमा निमित्त भाड्याने देण्यात येतात. सदर मालमत्ताचे भाडे यापूर्वी मा. महासभा दि. ३०/१२/२०११, ठराव क्र. ८७ व मा. महासभा दि. २०/०३/२०१३ ठराव क्र. ६८ अन्वये ठरविण्यात आलेले आहे. तथापी सदर ठरविलेले भाडे हे अत्यल्प असून सदर मालमत्तांची देखभाल व दुरूस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्ताचे भाडे वाढविण्याची आवश्यकता आहे. मालमत्ता भाडे प्रस्तावित करण्याबाबतचा गोषवारा अ.क्र.१ ते अ.क्र.१० अन्वये सद्याचे प्रति दिन दर व प्रस्तावित प्रति दिन दर गोषवाऱ्या मार्फत दिलेले आहे. यामध्ये महानगरपालिकेच्या इतर मालमत्ता असतील तर त्याही समाविष्ट करण्यात याव्यात.

प्रस्तावित केलेले मालमत्तेचे नविन भाड्याचे दर या विषयावर अभ्यास करणे आवश्यक असल्याने तसेच दिलेल्या दराचे बोजा नागरीकांना जास्तीचा वाटू नये याकरीता प्रस्तावित भाडे संबंधी सर्व गटनेत्यांची प्रथम चर्चा होवून हा विषय पुन्हा फेरसादर करण्यात यावा. तसेच या भाडे प्रस्तावाकरीता संबंधीत विभागाने चर्चा करणेकरीता बैठक बोलवावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | निरंक |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | सय्यद नुरजहाँ नजर हुसैन | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | भानुशाली वर्षा गिरीधर | ४ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| ५ | मीरादेवी रामलाल यादव | ५ | ग्रिटा स्टिफन फेरो | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | अन्सेल्ला मेन्डोंसा परेरा | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसानी | ७ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ८ | शाह सिमा कमलेश | ८ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| १० | अरोरा दिपीका पंकज | १० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | पाटील वंदना विकास | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | पाटील सुनिता कैलास | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १५ | विराणी रेखा अनिल | |
| १६ | सुजाता रविकांत शिंदे | १६ | पुजारी कांचना शेखर | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | कासोदरिया अश्विन श्यामजी | २० | काझी रशीदा जमील | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | भट्ट दिप्ती शेखर | |

(60)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | निलम हरिश्चंद्र ढवण | २३ | इनामदार जुबेर | |
| २४ | तारा विनायक घरक | २४ | राजेश शंकर वेतोसकर | |
| २५ | शुभांगी महिन कोटियन | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | परमार अनिता भरत | २७ | सामंत प्रमोद जयराम | |
| २८ | संध्या प्रफुल्ल पाटील | २८ | रकवी सुहास माधवराव | |
| २९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २९ | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | |
| ३० | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३० | हंसुकुमार कमलकुमार पांडे | |
| ३१ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३१ | खण्डेलवाल सुरेश | |
| ३२ | ठाकुर अरविंद दत्ताराम | ३२ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३३ | शाह राकेश रतिशचंद्र | ३३ | स्टिवन जॉन मेन्डोंसा | |
| ३४ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३४ | नरेश तुकाराम पाटील | |
| ३५ | केळुसकर प्रशांत नारायण | ३५ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३६ | जाधव मोहन महादेव | | | |

**ठराव बहुमताने मंजुर.**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

(61)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/११/२०१४

**(दि.१५/११/२०१४ ची तहकूब सभा )**

**प्रकरण क्र. ३४ :-** छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग (Vehicular subway/Foot over Bridge) बांधणे कामासाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देणे.

**ठराव क्र. ४० :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८, काशिमिरा नाका ते वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा विकास योजनेतील ४५.०० मीटर रुंदीचा रस्ता आहे. सदर रस्ता हा मिरा-भाईंदर शहरात येण्यासाठी प्रमूख रस्ता आहे. सदर रस्त्यावर वाहतूकीची प्रचंड कोंडी होत असल्याने सदर रस्ता सिग्नल विरहीत करण्यासाठी सहा ठिकाणी उन्नत पूल/भुयारी मार्ग व दोन ठिकाणी पादचारी पूल बांधणे कामाच्या खर्चास मा. महासभा दि. १९/०७/२०१४ ठराव क्र. २९ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामासाठी फक्त रु. ५०.०० लक्ष रक्कमेची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु सदर कामासाठी सुमारे रु. ४०.०० कोटी निधिची आवश्यकता भासणार असून महानगरपालिकेच्या निधितून इतर तातडीची लोकोपयोगी कामे करणे अगत्याचे आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा निधी या प्रस्तावित कामासाठी उपलब्ध होऊ शकत नाही. तथापी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मार्फत MMR Region मधील इतर शहरांमध्ये अशा प्रकारची अंतर्गत कामे देखील केलेली असून सदरचे काम देखील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण च्या निधीतून करण्याची आवश्यकता आहे. तसेच मिरा भाईंदर मनपा हद्दीतील ५ गावांसाठी (उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तारोडी) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नियोजन प्राधिकरण आहे. या गावांना जोडणारा हा एकमेव व मुख्य रस्ता आहे. त्यामुळेही या रस्त्याचे उन्नतीकरणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ने त्यांच्या निधीतून खर्च करणे अभिप्रेत आहे. त्यामुळे आज ही महासभा असा ठराव करते की, प्रस्तावित कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ने त्यांच्या फंडातून करावीत. अन्यथा सदरील काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण च्या माध्यमातून न झाल्यास शासकीय/ निमशासकीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेऊन सदरचे काम हाती घेण्यास व शासनाकडे आवश्यक प्रस्ताव पाठविण्यास ही सभा मंजूरी देण्यात येत आहे. तसेच भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) यांना जोडणारा जैसलपार्क येथील सब-वे चे पोहोच रस्ते तयार करणे कामी सुमारे २५.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध होत नसल्यास त्यासाठी देखील शासकीय/ निमशासकीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्यास व शासनाकडे आवश्यक प्रस्ताव पाठविण्यास ही सभा मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. रोहिदास पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(६२)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि.१५.११.२०१४ ची
## तहकुब सभा दि.२५.११.२०१४

**प्रकरण क्र:-** (३५) चौथा महाराष्ट्र वित्त आयोगाची दि.०८.०७.२०१४ रोजीची कोकण महसुल विभाग ,कोकण विभाग ,बेलापूर,नवी मुंबई येथे आयोजित केलेल्या बैठकीबाबत.

**ठराव क्र : ४१**

वरील विषयासंदर्भात मा. अध्यक्ष, चौथा महाराष्ट्र वित्त आयोग महाराष्ट्र शासन यांनी दि.०८.०७.२०१४ रोजी नवी मुंबई, (ठाणे) येथे बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीत आयोगाकडील विवरणपत्र क्र.२ मुद्दे क्र.०१ ते १० यावर विचार विनिमय होऊन प्रशासनाने सादर केलेल्या ०१ ते १० मुद्यांबाबत मा.महासभेचे या व्यतिरीक्त काही अभिप्राय ,सुचना,दुरूस्त्या असल्यास मा.महासभेपुढे विषय ठेवणेबाबत मा. अध्यक्ष ,चौथा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग यांनी सुचित केलेले आहे.या करीता सर्व मुद्यांवर विचार विनिमय करून शासनाला मुद्दे निहाय माहिती पाठविण्यासाठी सर्व पक्षाचे गटनेत्यांची संयुक्त बैठक आयोजित करून बैठकीतील ०१ ते १० मुद्यांवरील अभिप्राय ,सुचना,दुरूस्त्या मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वित्त आयोग यांना पाठविण्यास आजची सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- प्रेमनाथ पाटील

अनुमोदक :- श्री. अनिल भोसले

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(63)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/११/२०१४
## ( दि. १५/११/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ३६ :- महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग पत्र क्र.याचिका/मिभाम-१४१३/ ११२६/प्र.क्र.११७/१३/नवि-२८ दि. २६/०३/२०१४ अन्वये प्राप्त निर्देशा नुसार महानगरपालिकेला आवश्यक असलेले सुरक्षा रक्षक हे सुरक्षा रक्षक मंडळाकडुन घ्यावेत कि अभिकर्ता निश्चित करुन घ्यावेत, याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

**ठराव क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा रक्षक सेवा उपलब्ध करून देणेकरीता स्पर्धात्मक निविदा मागवून त्यापैकी मे. सैनिक इंटेलिजन्स अँड सिक्युरिटी प्रा. लि. यांची वाजवी व सर्वात कमी दराची निविदा मा. स्थायी समिती सभा दि. १७/०७/२००९ ठराव क्र. २६ नूसार दि. १/८/२००९ ते दि. ३१/७/२०११ पर्यंत २ वर्षाच्या कालावधीकरीता मंजूर करण्यात आली होती. तद्नंतर मा. स्थायी समिती सभा दि. १६/७/२०११ ठराव क्र. ४१ अन्वये सदरच्या ठेक्यास दि. १/८/२०११ ते ३१/७/२०१२ या १ वर्ष कालावधी पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तद्नंतर याकामी नव्याने निविदा मागवून अभिकर्ता नियुक्त करण्याकरीता व अशी नियुक्ती करेपर्यंत विद्यमान निविदाधारकास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मा. महासभा दि. १४/१२/२०१२ (१/१२/२०१२ ची तहकुब सभा) मध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर सभेमध्ये ठराव क्र. ११ नूसार मे. सैनिक इंटेलिजन्स अँड सेक्युरिटी प्रा. लि. यांना पुढील ३ वर्षासाठी किमान वेतन कायदयानूसार मुदतवाढ देवून त्यानूसारचे देयकांच्या प्रदानास मंजूरी देण्यात आली आहे. मा. महासभेच्या सदर मंजूरीनूसार प्रशासनाकडून पुरवठादारास १ वर्षाची व तद्नंतर ३ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.एसजीए-१५०६/ प्र.क्र. ९२/काम-५, मंत्रालय, मुंबई-३२, दि.८ नोव्हेंबर, २००६ मधील तरतुदी नुसार सरकारी, निमसरकारी क्षेत्रे/उपक्रम/शासकीय मंडळे महामंडळे/महानगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/सहकारी संस्था/ शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी, सुरक्षा मंडळाकडुनच सुरक्षा रक्षक घेणे आवश्यक असल्याबाबत श्री. संजय नारायण पांगे यांनी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे दि. २१/३/२०१३ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.महासभा दि. १४/१२/२०१२ ठराव क्र.११ विखंडित करणेची व कलम ४५२ अन्वये महानगरपालिका विसर्जित करणेची मागणी केली. सदर निवेदनावर शासनाकडे निर्णय प्रलंबीत असताना, श्री. संजय नारायण पांगे, यांनी, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ६६/२०१३ दाखल केली होती. प्रस्तुत प्रकरणी याचिकाकर्त्याचे प्रलंबित निवेदनावर ३ महिन्यांचे आत निर्णय घेण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनास दिले. या अनुषंगाने महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे पत्र क्र. याचिका/मिभाम-१४१३/११२६/प्रक्र-११७/१३/नवि-२८, दि. २६/३/२०१४ अन्वये शासनाने खालीलप्रमाणे निर्णय महानगरपालिकेला कळविलेले आहे.

"महानगरपालिकेने सुरक्षा रक्षकांसाठी नव्याने मागणी केल्यास आवश्यक संख्येऐवढे सुरक्षा रक्षक पुरविता येतील, असे अभिप्राय सुरक्षा रक्षक मंडळाने दिलेले असल्याचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने कळविले आहे. त्या अनुषंगाने श्री.पांगे यांच्या दि.२१/०३/२०१३ च्या कलम ४५१ खालील अर्जाच्या अनुषंगाने संबंधित ठराव विखंडीत करण्याबाबत विचार न करता कामगार विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार , सुरक्षा अधिकारी/रक्षक यांच्या उपलब्धतेबाबत सुरक्षा मंडळाकडे विचारणा करुन त्याबाबतचे अभिप्राय दि.१५/०४/२०१४ पुर्वी प्राप्त करुन घ्यावेत व सुरक्षा रक्षक मंडळाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने महानगरपालिकेकरीता आवश्यक सुरक्षा अधिकारी/रक्षक यांच्या नेमणूकीच्या संदर्भात याबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे सादर करुन महानगरपालिकेने विद्यमान कंत्राटदारास दि.१०/०५/२०१३ च्या आदेशान्वये दिलेले १ वर्षाच्या कालावधी समाप्तीनंतर सुरक्षा अधिकारी/रक्षकांच्या नेमणूकीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना सुचना देण्यात याव्यात."

शासनाचा उपरोक्त निर्णय प्राप्त झाल्यावर महानगरपालिकेने दि.०९/०४/२०१४ रोजी सुरक्षा मंडळास पत्र पाठवून सुरक्षा अधिकारी/रक्षक यांच्या उपलब्धतेबाबत तसेच त्यांना द्यावयाच्या मासिक वेतन व भत्त्यांच्या दराबाबत लेखी माहिती मागितली होती. त्याप्रमाणे सुरक्षा रक्षक मंडळाकडुन माहिती प्राप्त झाली आहे.

(64)

मनपाने मागणी केल्यानुसार ३५० सुरक्षा रक्षकांचा पुरवठा करणे शक्य असल्याचे सुरक्षा रक्षक मंडळाने त्यांच्या दि.१२/०४/२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच मंडळातील सुरक्षा रक्षकांना सध्या लागू असलेले वेतन व लेव्ही दराचा तक्तासुध्दा पाठविला आहे. सुरक्षा रक्षक मंडळ आता सुरक्षा रक्षक पुरविण्यास तयार असले तरी, त्यांचेकडुन सुरक्षा रक्षक घेण्यात येऊ नये.

महाराष्ट्र राज्यात खाजगी सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ लागू करण्यात आला आहे.

तसेच सदर अधिनियमातील कलम १(४) नूसार सदरचा कायदा ज्या फॅक्टरी किंवा आस्थापनामध्ये (Establishment) सुरक्षा रक्षक म्हणून व्यक्ती काम करीत आहेत त्यांना कायदा लागू आहे. तथापि सदरचा कायदा सरळसेवेने फॅक्टरी किंवा आस्थापनेवर नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकास लागू होत नाही अशी तरतुद आहे.

सदर अधिनियमातील कलम २(४) मध्ये आस्थापना (Establishment) आणि २(५) मध्ये फॅक्टरी (Factory) ची व्याख्या देण्यात आलेली आहे.

सदरची व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

(4) establishment means an establishment as defined in clause (8) of Section 2 of the Bombay Shop and Establishments Act, 1948 (Bom.LXXIX of 1948)

Bombay Shop and Establishments Act, 1948 या कायदयातील Establishment ची व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

Establishment means a shop, commercial establishment, residential hotel, restaurant, eating house, theatre, or other place of public amusement or entertainment to which this Act applies and includes such other establishment as the [State] Government may by notification in the Official Gazette, declare to be an establishment for the purposes of this Act.

(5) Factories means a factory as defined in clause (m) of Section 2 of the Factories Act, 1948 (LXIII of 1948)

सदर व्याख्याचे वाचन केले असता "महानगरपालिका" उपरोक्त कलमात अंर्तभूत होत नाही. त्यामुळे सुरक्षा रक्षक मंडळाकडून महानगरपालिकेस सुरक्षा रक्षक पुरवठा करणे महानगरपालिकेस बंधनकारक नाही.

खाजगी अभिकर्ताद्वारे सुरक्षा रक्षक घेतल्यास त्या सुरक्षा रक्षकाकडुन काही चुका किंवा काम बद्दलची दिरंगाई इत्यादी झाल्यास थेट अभिकर्त्यावर कार्यवाही करणे शक्य होते. परंतु रक्षक मंडळाकडुन सुरक्षा रक्षक घेतल्यास अशी थेट कार्यवाही करता येणे शक्य होणार नाही. याबाबत सुरक्षा रक्षक मंडळाकडे प्रथम तक्रार द्यावी लागणार आहे. खाजगी अभिकर्ता यांचा ठेका रद्द करण्याची कार्यवाही महानगरपालिकेस त्वरीत करणे शक्य होणार आहे. परंतु सुरक्षा रक्षक मंडळाकडे अशी कार्यवाही करणे शक्य होणार नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा. महासभेस महानगरपालिकेच्या सार्वजनिक व आर्थिक हिताचे दृष्टीने निर्णय घेण्याचे अधिकाराची स्वायत्तता प्राप्त झालेली आहे.

सद्यस्थितीत मे. सैनिक इंटेलिजन्स ॲंड सिक्युरिटी प्रा. लि. यांची मुदत मा. महासभा दि.१४/१२/२०१२ ठराव क्र. ११ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या सुरक्षारक्षकासाठी अग्रिमे दिलेले आहेत. त्यांचे विमा देखील उतरविलेले आहेत. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगार मिळालेला आहे.

महानगरपालिकेला आवश्यक असलेले सुरक्षारक्षक हे जाहिर निविदेद्वारे अभिकर्ता निश्चित करुन घेण्यात यावे.

खाजगी अभिकर्ता यांचेकडील सुरक्षा रक्षक यांचे दर सुरक्षा रक्षक मंडळाकडील दरापेक्षा कमी असल्याने महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होत आहे. या बाबींचा विचार करता खाजगी अभिकर्त्यास ठेका मंजुर करण्यास संयुक्तीक ठरेल.

मा. महासभा दि. १४/१२/२०१२ ठराव क्र. ११ नुसार मे. सैनिक इंटेलिजन्स ॲंड सिक्युरिटी प्रा. लि. या अभिकर्त्यास पुढील ३ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सबब सदरची ठेक्याची ३ वर्षाची मुदतवाढ संपेपर्यंत त्यांचेकडुनच सुरक्षा रक्षक कार्यरत ठेवण्यात यावेत. तद्नंतर निविदा प्रक्रियाद्वारे अभिकर्ता नेमणेबाबत कार्यवाही करावी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(68)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/११/२०१४
## ( दि. १५/११/२०१४ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ३७ :-** <u>आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत</u>.

**ठराव क्र. ४३ :-**

मा. मंत्री जलसंपदा यांचे दालनात दि. १६/०३/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता ३० द.ल.ली. अतिरीक्त पाणी पुरवठा मंजूर केला होता. यापैकी २० द.ल.लि. पाणी पुरवठा तातडीने सुरू करणेबाबत मा. मंत्री उद्योग व बंदरे यांनी दि.१९/०३/२०१२ रोजीच्या झालेल्या बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास निर्देश दिलेले होते.

सदर बैठकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. ०४/१२/२०१२ रोजी जलजोडणी मंजुर आशयाचे पत्र दिले. साकेत ठाणे येथून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांच्या जलवाहिनी वरुन २० द.ल.ली. प्रतिदिन पाणी प्रायोगिक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात १ महिन्याच्या कालावधीकरिता जलजोडणी देण्याचे अंतर्भुत होते. त्यानुसार २० द.ल.ली. पाणी पुरवठा प्रायोगिक तत्वावर घेणेकरीता साकेत (ठाणे) येथे तात्पुरत्या स्वरूपात बुस्टींग पंपगृह बांधण्यात आले असून सदर पंपीग स्टेशन ऑगस्ट -२०१४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आले, तेव्हापासून मिरा भाईंदर शहराच्या पाणी पुरवठयात २० द.ल.ली. वाढ झाली आहे. तसेच सदरची यंत्रणा सुरळीत कार्यान्वीत असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाणी पुरवठा अखंडीत सुरु ठेवलेला आहे.

मा. आयुक्त व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची संयुक्तीक बैठक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात दि. २६/०८/२०१४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीस मिरा भाईंदर महानगरपालिकेस अतिरिक्त पाणी पुरवठा होणेबाबत चर्चा झाली सदर बैठकी दरम्यान मिरा भाईंदर महानगरपालिकेस तत्वतः ५० द.ल.ली. पाणी पुरवठा देण्याचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मान्य केले व तसे आशयाचे पत्र सुध्दा मिरा भाईदर महानगरपालिकेस दि. १२/०९/२०१४ रोजी देण्यात आलेले आहे.

सदरचे अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी घेणेकरिता खालील कामे हाती घेणे आवश्यक आहे.

अ) **<u>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या साकेत पंपगृहात ४० द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचा Stand by VFD Operated In line Booster पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..</u>**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने साकेत पंपीग स्टेशनचा पाणी पुरवठा तात्पुरत्या स्वरुपाचा दिला असल्यामुळे तेथे केवळ एकच् पंप बसविण्यांत आला. परंतु सदरची यंत्रणा सुरळीत कार्यान्वीत असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाणी पुरवठा अखंडीत सुरु ठेवलेला आहे. हा पंप २४x७ तास चालतो. त्यामुळे या पंपात काही बिघाड झाल्यास महानगरपालिकेस दररोज २० द.ल.ली. पाणी पुरवठा कमी होऊन पाणी पुरवठयाचे तास वाढून नागरीकांच्या तक्रारी वाढण्याची शक्यता आहे. करीता साकेत पंप गृहात एक नवीन Stand by पंप बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि.१२/०९/२०१४ रोजीच्या पत्राद्वारे मिरा भाईंदर महनगरपालिकेकरिता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याचे मान्य केले आहे वाढीव पाणी पुरवठा लक्षात घेता साकेत येथील Stand by पंप २० द.ल.ली. ऐवजी ४० द.ल.ली. एवढया क्षमतेचा प्रस्तावीत केला आहे, जेणे करुन वाढीव पाणी पुरवठा देखील या पंपाद्वारे केला जाऊ शकेल.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या साकेत पंपगृहात ४० द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचा Stand by VFD Operated In line Booster पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत | रु. ३,२४,७०,०३३/- |

ब) १३५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. १२/०९/२०१४ रोजीच्या पत्रांद्वारे मिरा भाईंदर महनगरपालिकेकरिता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याचे मान्य केले आहे. मिरा भाईंदर शहरास सद्यस्थितीत होत असलेल्या पाणी पुरवठा जलवाहिनीची अतिरिक्त पाणी वाहून नेण्याची क्षमता नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून उपलब्ध होणारे १०० द.ल.ली. पाणी मिरा भाईंदर शहरापर्यंत आणणेकरिता पाटलीपाडा ते हटकेश पर्यंत सद्याच्या जलवाहिनीस समांतर १३५० मि.मी. व्यासाची नवीन जलवाहिनी अंथरावी लागणार आहे व या अगोदर टप्पा १ मध्ये २० द.ल.ली. पाणी शहरात आणणेकरिता ओवळे ते काजूपाडा दरम्यान १३५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरण्यात आली असून ऑगस्ट २०१४ मध्ये कार्यान्वीत करण्यात येऊन मिरा भाईंदर शहराच्या पाणी पुरवठयात २० द.ल.ली. वाढ झालेली आहे. परिणामी मिरा भाईंदर शहराच्या पाणी वितरण व्यवस्थेत सुधारणा झालेली आहे. सद्या टप्पा २ मध्ये अतिरिक्त पाणी पुरवठा मिरा भाईंदर शहरात आणण्याकरिता खालीलप्रमाणे जलवाहिनी टाकावी लागणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | पाटलीपाडा ते ओवळेगाव पर्यंत १३५० मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. १८,३८,२६,०६४/- |

वरील वस्तुस्थिती पाहता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी घेणेकरिता वरील दोन्ही कामे हाती घेणे आवश्यक असून त्याकरिता एकूण रु. २१,६२,९६,०९७/- इतका खर्च अपेक्षीत असून सदर खर्चास व काम करुन घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी ही सभा देत आहे.

तसेच उपरोक्त कामांकरिता संबंधीत विभागाच्या आवश्यकत्या परवानगी घेणे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास तसेच निविदा मागविण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त १०० द.ल.ली. पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेली साकेत ते पाटलीपाडा व काजूपाडा ते हटकेश दरम्यान पाईप लाईन टाकणे, जलकुंभ बांधणे, जलकुंभाची पाईप लाईन टाकणे व वितरण व्यवस्था टाकणे इत्यादी कामी सविस्तर प्रकल्प अहवालास आर्थिक व प्रशासकिय मान्यता ही सभा देत आहे. तसेच राज्यशासनाच्या नगरोत्थान अभियाना अंतर्गत निधी उपलब्ध होणेकरीता हा प्रस्ताव शासनास सादर करण्यास ही सभा अनुमती देत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण नळ जोडणी किती आहेत. नागरीकांना किती पाणी पुरवठा केला जातो याची माहिती मिळावी. २० द.ल.ली. पाणी वाढल्याने नागरीकांना किती प्रमाणात वाढीव पाणी पुरवठा करण्यात आला याची सविस्तर विवरण देण्यात यावे. तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये अतिरिक्त पाणी पुरवठा मिरा भाईंदर शहरात प्राप्त होणार आहे. अतिरिक्त पाणी पुरवठा आल्यानंतर नविन नळ जोडणी देणेबाबत काय धोरण असावे याचाही अहवाल प्रशासनाने तयार करावा.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

(67)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २५/११/२०१४
(दि. १५/०११/२०१४ राजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ३८ :- ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांच्यावर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजुरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

(सदर विषयाचे अवलोकन करण्यात आले.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २५/११/२०१४
(दि. १५/०११/२०१४ राजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ३९ :- सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक ०५/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- अंध, अपंग, कर्णबधिर बालकांसाठी / महिलांसाठी वैद्यकिय उपचारास आर्थिक सहाय्य देणेबाबत.

(सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/११/२०१४
## ( दि. १५/११/२०१४ ची तहकुब सभा)

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड मधील "ज" अन्वये प्रस्ताव)**

**प्रकरण क्र. ४० :- मिरा भाईंदर शहरामध्ये होणारी अनधिकृत बांधकामे यावर कारवाई करण्यासंदर्भात.**

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ६ प्रभाग समित्या अस्तित्वात आहेत. शहरामध्ये होणारे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्याची व निष्काशीत करण्याची जबाबदारी पदनिश्चित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेली आहे. प्रभाग अधिकाऱ्यांचे प्रशासकीय कर्तव्य आहे की त्यांनी आपली जबाबदारी काटेकोरपणे व इमानेइतबाराने पार पाडावी. त्यांच्या कामकाजावर देखरेख व पत्रव्यवहार करण्यासाठी अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आस्थापनेवर मंजूर नसतानाही मा. आयुक्तांनी सदरचा विभाग स्थापित करुन द्वितीय श्रेणीच्या अधिकाऱ्याच्या कामकाजाची जबाबदारी तृतीय श्रेणीतील कर्मचाऱ्यांवर सोपवली. या धर्तीवर शहरामधील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम आटोक्यात येणे गरजेचे होते. लोकप्रतिनिधी, जागरुक नागरिक सातत्याने या विभागाकडे तसेच प्रभाग कार्यालयावर तक्रार करुनही कुठल्याच प्रकारची ठोक कारवाई करण्यात येत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. कोणतेही अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निदर्शनास आणुन दिल्याच्यानंतर विभागीय अधिकाऱ्यांनी त्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे मात्र असे न करता अशा नियमबाह्य कृतींना संरक्षण देण्याचे काम विभागीय अधिकारी करत असतात.

महापालिका आरक्षण क्र. १२२ दावा क्र.आर.सी.एस. क्र. १०५/२०१० श्री. रंगबहादूर यादव विरुध्द मिरा भाईंदर महानगरपालिका याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागल्याचे असूनही जा.क्र.मनपा/विधी/९६४/२०१३-१४ दि. २९/११/२०१३ रोजी विभाग प्रमुख अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण यांना पत्राद्वारे विधी विभागामार्फत सुचित केलेले होते. त्याला अनुसरुन विभागीय प्रमुखांनी त्यावर कारवाई करणे अनिवार्य होते. विभागीय प्रमुख व प्रभाग अधिकारी सदरच्या भुखंडावर आजुबाजुच्या क्षेत्रामधील गोर-गरिबांच्या झोपड्या हटविण्यासाठी नमूद ठिकाणी जात असतानाही सदरचा भूखंड ज्याचा दावा महापालिकेच्या बाजुने निकाल लागलेला असतानाही कारवाई जाणीवपुर्वक केलेली नाही व याची जाणीव वेळोवेळी पदाधिकाऱ्यांनी मा. आयुक्तांना लेखी व मा. महासभा सभागृहातही सुचित केलेले होते. अशा अनेक प्रभागांतर्गत विविध ठिकाणी अनधिकृत चाळी बांधणे, इंडस्ट्रीयल गाळे बांधणे व इमारती बांधणे व वाढीव बांधकाम करण्याचे कामदेखील सुरु आहे. सध्या झालेली भाईंदर (पुर्व) विभागातील जय अंबे इंडस्ट्रियल इस्टेट, प्रभाग ५ धनलक्ष्मी इस्टेट, आर.एन.पी. पार्क ओस्तवाल बगीच्या समोर, जैन नगर, शिवशक्ती नगर, आझाद नगर, गोडदेव गाव, हनुमान नगर, मिरा गावठण, काशी गाव, माशाचा पाडा, मांडवी पाडा, चेना ब्रिज चाळी बांधलेल्या आहेत या सर्वांवर कारवाई करणे व त्या संदर्भात विविध तक्रारी असतानाही त्यावर तोडक कारवाई केली जात नाही. या सर्व तक्रारींच्या आधारे दि. १९/०८/२०१४ मा. स्थायी समितीमध्ये प्रकरण क्र. ७४ ठराव क्र. ७१ अन्वये अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे प्रमुख श्री. श्रीकृष्ण मोहिते यांना निलंबन करण्याचा ठराव बहुमताने करण्यात आला. शहराचे हीत लक्षात घेता, ठरावाची अंमलबजावणी करणे मा. आयुक्तांकडे अपेक्षित होते मात्र आज दिनांकापर्यंत त्यावर कारवाई करण्यांत आलेली नाही. जेणेकरुन दोषी अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढत चाललेले आहे. यामुळे दिवसेंदिवस मिरा भाईंदर शहर हे बकाल होत चाललेले असून नागरीकांच्या समस्यादेखील तितक्याच वाढलेल्या आहे परिणामी गोर-गरिब, असुशिक्षित जनतेची फसवणुक होऊन बळी जाते.

मिरा भाईंदर शहरामध्ये वाढत असलेल्या व अस्तित्वात असलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम यांना संरक्षण देणाऱ्या व कर्तव्यामध्ये हयगय, कसुर करणाऱ्या प्रमुख अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग श्री. श्रीकृष्ण मोहिते तसेच सर्व प्रभाग अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२फ) अन्वये निलंबनाची कारवाई करण्यात यावी तसचे ३९७ अ (२) या अधिनियमाच्या तरतुदीच्या विरोधात सुरु असलेले अनधिकृत बांधकामाविरुध्द या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.

मागील चार महिन्यातील अनधिकृत बांधकामाची यादी खालीलप्रमाणे आहे. ती पूर्णतः तोडक कारवाई करावी.

**प्रभाग समिती क्र. ०४**

**वॉर्ड क्र. १०**

१) जय अंबे बालाजी इंडस्ट्रीज, दौलतसिंग भाटी रोड, बजरंग हॉटेलजवळ, गोडदेव नाका, भाईंदर पूर्व. २० ते २२ फूटाचे बांधकाम ४ गाळे बनवले आहेत.

**वॉर्ड क्र. १३**

१) गॅलेक्सी थरमोलेक्सच्या बाजूला, ज्योती हॉटेलच्या समोरील गल्ली, फाटक रोड, भाईंदर पूर्व. २२ ते २४ फूटाचे बांधकाम केले आहे.

२) शितल इंडस्ट्रीयल इस्टेट, फाटक रोड, श्री. रामनगरच्या समोरील गल्ली, भाईंदर (पूर्व) २२ ते २४ फूटाचे बांधकाम केले आहे.

३) एच.पी. गोडाऊनच्या बाजूला भाईंदर पूर्व २२ ते २४ फूटाचे बांधकाम केले आहे.

**वॉर्ड क्र. ४**

१) ओसवाल बागेसमोर गाला ४, आरंभी पार्क, भाईंदर पूर्व व बाजूला २

**वॉर्ड क्र. ५**

१) दळवी चाळीच्या मागे, पुष्पक इंडस्ट्रीज, नवघर रोड, युनीयन बँकेच्या समोर, भाईंदर पूर्व

२) धनलक्ष्मी इस्टेट, दळवी चाळीच्या मागे.

**प्रभाग क्र. ८ (जैन नगर)**

१) शिवशक्ती नगर आजूबाजूला चाळी बांधण्याचे काम चालू आहे.

२) गुरुद्वारा हॉल लागून त्यांचेच अनधिकृत बांधकाम १ + १

**प्रभाग समिती ६**

१) मिरागाव, मिरा गावठण, साईबाबा मंदिर डाचकूल पाडा, काशीगांव, माशाचा पाडा, मांडवी पाडा, चेना ब्रीज, एक्सप्रेस इन हॉटेलच्या मागे मोठ्या प्रमाणावर चाळी बांधलेल्या असून कामही चालू आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण          अनुमोदक :- सौ. तारा घरत**

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. शिल्पा भावसार यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्र. ०३ चे अधिकारी (नविन प्रभाग क्र. ६) यांनी खालील दिलेल्या आदेशपत्रान्वये, अनधिकृत बांधकामावर त्वरीत कार्यवाही करण्यात यावी अशी मी सुचना मांडत आहे.

१) मिभा/मनपा/प्र.क्र.०३/अवि/८५६/२०१२-१३ दि. २६/११/२०१२
२) मिभा/मनपा/प्र.क्र.०३/अवि/८५४/२०१२-१३ दि. २६/११/२०१२
३) मिभा/मनपा/प्र.क्र.०३/अवि/१०७५/२०१२-१३ दि. १८/०१/२०१३

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/११/२०१४

## ( दि. १५/११/२०१४ ची तहकुब सभा)

**दि. १५/११/२०१४ च्या मा. महासभेमध्ये "ज" खालील प्रस्ताव.**

**संदर्भ** :- शासनाचे रामक्रमांचे दि. २९/०९/२०१४ रोजीचे पत्र.

**प्रकरण क्र. ( ४१ ) :-** मा. पंतप्रधान यांनी घोषीत केलेले स्वच्छ भारत अभियान राबविण्याकरीता निधी उपलब्ध करणेबाबत..

**ठराव क्र. ( ४५ ) :-**

मा. पंतप्रधान यांनी घोषीत केलेल्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनाच्या अनुषंगाने सदर अभियान राज्यात पर्यायाने महापालिकेमध्ये प्रभावीपणे राबावयाचे आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाने कार्यनिती कशी असावी याबाबतच्या मार्गदर्शक सुचना महानगरपालिकेस दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिका प्रशासन स्वच्छता अभियान राबवित आहे.

स्वच्छ भारत अभियान महानगरपालिका क्षेत्रात राबविण्याचे असल्याने या कामी पुरेसा निधी उपलब्ध असणे आवश्यक आहे. मा. पंतप्रधान यांनी घोषीत केलेले स्वच्छ भारत अभियान मनपा क्षेत्रामध्ये प्रभावीपणे राबविण्याचे असल्यास निधीची सोय असणे आवश्यक आहे.

स्वच्छता अभियान राबविण्याकरीता मा. पंतप्रधान यांच्या बरोबर विविध क्षेत्रातील सामाजिक संस्था, अभिनेते, खेळाडू, राजकिय व्यक्ती यांचा सहभाग आहे. अभियान योग्य दिशेने व प्रभावीपणे राबवियाचे असल्यास नागरीकांचा प्रत्यक्ष सहभाग अभियानात असणे आवश्यक आहे.

या अभियानाकरीता रू.५०.०० लाखाचा निधी सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील शहर स्वच्छता आराखडा या लेखाशिर्षात असलेल्या तरतुदी मधून खर्च करण्यात यावा. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत येणाऱ्या खर्चाचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो., यांना या ठरावान्वये प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

सुचक :- शरद केशव पाटील

अनुमोदक :- प्रशांत केळुसकर

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/११/२०१४
## ( दि. १५/११/२०१४ ची तहकुब सभा)

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड मधील "ज" अन्वये प्रस्ताव)

**प्रकरण क्र. ४२ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रम ठेकेदाराने लागू केलेली अन्यायकारक तिकीट दरवाढ रद्द करुन ती कमी करणेबाबत.**

**ठराव क्र. ४६ :-**

मिरा भाईंदर महापालिकेने पी.पी.पी. तत्वावर बस पुरवठा करण्याचा ठेका मे. केस्ट्रल इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीस दि. ०९/१०/२०१० पासुन दिलेला आहे. सदर ठेकेदाराच्या कंपनीसोबत मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाचा करारनामा झालेला आहे. आता परिवहन उपक्रमाचा विचार करता ठेकेदाराकडून मिळणारी सेवा ही अत्यंत हलक्या दर्जाची आहे. याची कारणे अशी की, ठेकेदार चालवीत असलेल्या बसेसचे मेन्टेनन्स वेळेवर करीत नाही. यामुळे परिवहन विभागाच्या बसेस रस्त्याच्या कडेला नादुरुस्त अवस्थेत बऱ्याच वेळा उभ्या असतात. तसेच गेल्या अनेक वर्षापासुन करारनाम्याच्या कोणत्याही अटीशर्तीचे पालन सदर ठेकेदार करीत नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्या गंभीर बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार परिवहन ठेकेदाराने महापालिकेस पी.पी.पी. तत्वावर बस सेवा चालवताना १ रु. प्रति कि.मी. प्रमाणे प्रति बस प्रति दिवस १८०/- रु. प्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत ५० बसेसची नियमित रॉयल्टी स्वरुपात पैसे भरणे बंधनकारक असताना सदरच्या ठेकेदाराने महापालिकेची सन २०१० ते २०१४ पर्यंत लाखो रुपये रॉयल्टी थकवलेली आहे. त्याचा भरणा ठेकेदाराकडून महापालिकेने प्रथम दंड व व्याजासहित सदरची थकीत रक्कम वसुल करावी व त्यानंतरच काही अंशी तिकिट दरवाढ लागू करण्यास परवानगी द्यावी. परंतु, जोपर्यंत ठेकेदार मनपाची थकित रॉयल्टी भरणा करीत नाही तिकिट वाढ प्रशासनाने स्थगीत ठेवावी.

२) ठेकेदाराने बस सेवा देताना प्रत्येक बसचे इन्शुरन्स, आर.टी.ओ. टॅक्स, फिटनेस तपासणी इ. कागदपत्र चालु स्थितीत ठेवणे बंधनकारक असताना सुध्दा ठेकेदार हा बसेसचे इन्शुरन्स, फिटनेस व आर.टी.ओ. टॅक्स तसेच शासनाचा प्रवासीकर अधिभार भरीत नाही त्यामुळे ठेकेदाराने वरील सर्व रक्कमेचा भरणा करुन ती सर्व कागदपत्र महापालिकेस चालु स्थितीत असल्याचे सादर करावे व तद्नंतरच तिकीट दरवाढीस मनपाने मान्यता द्यावी तोपर्यंत दरवाढ रद्द करावी.

३) ठेकेदाराने परिवहन उपक्रमाच्या बसेसचे मेन्टेनन्स दररोज चांगल्या प्रकारे देखभाल करणे बंधनकारक असताना बऱ्याच बसेस यांत्रिक बिघाडामुळे तसेच अस्वच्छ सिट फाटलेल्या, काचा फुटलेल्या अशा स्थितीत बसेस सुरु आहेत त्या सर्व बसेसचे मेन्टनन्स व वरील नमुद कामे सुस्थितीत असल्याचे मनपास लेखी कळवावे व मनपाच्या संबंधित उपायुक्ताने प्रत्यक्ष बसेसची तपासणी करुन तसा सविस्तर अहवाल मा. आयुक्त व मा. महापौर यांना सादर करावा व समाधानकारक काम न आढळल्यास सदरची तिकिट दरवाढ रद्द करावी.

४) ठेकेदाराकडे बसेसवर कार्यरत असलेले वाहन चालक यांच्याकडे वैध स्वरुपाचे बस चालविण्याचे लायसन्स बऱ्याच चालकांकडे नाही तसेच बऱ्याच वाहकाकडे वैध स्वरुपाचा कंडक्टर बॅच नाही तरी मनपाने या सर्व आवश्यक गोष्टी तपासाव्या अन्यथा एखादा दुर्देवी अपघात घडल्यास मनपा या सर्व घटनांना दोष्टी राहील याची प्रशासनाने गंभीर नोंद घ्यावी.

५) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार ठेकेदाराने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याचा पी.एफ. व ई.एस.आय.सी. प्रत्येक महिन्यात शासनाच्या संबंधित खात्याकडे भरणा करावयाचा आहे. परंतु, सदर ठेकेदाराने कोणत्याही कर्मचाऱ्याचा पी.एफ. अथवा ई.एस.आय.सी. भरलेला दिसून येत नाही तरी मनपाने ठेकेदाराकडून वरील सर्व थकीत रक्कम भरणा करण्यास ठेकेदारास व पी.एफ.ई.एस.आय.सी. विभागास लेखी स्वरुपात नोटीस द्यावी व सदरची कर्मचाऱ्यांची रक्कम शासनास दंड व व्याजासहित भरणा केल्याचे प्रमाणपत्र ठेकेदाराने मनपास सादर केल्यानंतरच प्रशासनाने परिवहन उपक्रमाची तिकिट भाडेवाढ लागु करणेस परवानगी द्यावी तोपर्यंत सदरची बस भाडेवाढ त्वरीत रद्द करावी.

६) आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरल्याने मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एन.डी.ए. सरकारने पेट्रोल व डिझेलच्या भावामध्ये मागील महिन्यात दोन टप्प्यात डिझेलचे दर कमी करुन साधारणतः ६ रुपये ५० पैसे दरवाढ कमी केलेली आहे. ही बाब लक्षात घेऊन सदर ठेकेदाराने लागु केलेली अन्यायकारक तिकिट दरवाढ रद्द करावी.

तसेच दरवाढीचा प्रस्ताव मा. महासभेमध्ये मंजुरी घेणे आवश्यक होते. सदर दरवाढीचा प्रस्ताव महासभेमध्ये मंजूर न करता परिवहन विभागाने परस्पर दरवाढ केलेली आहे ही बाब नियमबाह्य आहे. त्याचप्रमाणे सदर ठेकेदार हा कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देत नाही.

वरील सर्व महत्वाच्या बाबी लक्षात घेता प्रशासनाने सदर ठेकेदारास थकबाकीदार असुनही पाठीशी घालण्याचे काम करित असल्याचे सिध्द होत आहे. तरी आजच्या महासभेमध्ये ठेकेदाराने प्रवाशावर लादलेली अन्यायकारक बस तिकिट भाडेवाढ त्वरीत रद्द करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- डॉ. नयना वसाणी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

(२५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २५/११/२०१४
(दि. १५/०११/२०१४ राजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ४३ :- सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे यांचा दिनांक ११/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- आरक्षण क्र. १०२ बगीचा व मैदान या जागेमध्ये वास्तुविशारद मे. तेजस कन्सल्टंट यांचा इमारत बांधकामाचा प्रस्ताव व मनपामार्फत प्राप्त झालेली बांधकाम परवानगी रद्द करणे व संबंधित वास्तुविशारद यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे.

(सदरचा विषय फेटाळण्यात आला.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २५/११/२०१४
### (दि. १५/०११/२०१४ राजीची तहकुब सभा)

**दुःखवठा ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खारीगाव येथील कृष्णा भाऊ पाटील ह्यांचे दि. १०/११/२०१४ रोजी दुःखद निधन झाले. भाईंदर पूर्व येथील भवननिर्माते चंदुभाई रावल ह्यांचेदेखील निधन झालेले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच श्री. मुरली देवरा यांचे दुःखद निधन झालेले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

तहकुब (४०)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. ०७/०२/२०१५

**ठराव क्र. (४८) :-**

महाराष्ट्र शासनाने दि.०७/०१/२०१५ रोजी मा. आयुक्त यांना अर्थसंकल्पा विषयी तातडीने सभा लावावी असे निर्देश दिलेले होते. या संदर्भात मा. आयुक्त सो., यांनी मा. महापौर यांना लेखी पत्र देवून अर्थसंकल्पाबाबत सभा लावावी असे कळविलेले होते. त्यानंतर मा. महापौर सो., यांनी अर्थसंकल्पा विषयी विशेष सभा न बोलवता सर्वसाधारण सभा दि. १५/०१/२०१५ रोजी आयोजित केलेली होती. या संदर्भात शासनाने दि.१४/०१/२०१५ रोजी मा. आयुक्त व महापौर यांना दि.१५/०१/२०१५ च्या सभेचे निलंबन करून मा. महासभेचे त्याच महिन्यात अर्थसंकल्पाविषयी विशेष सभेचे आयोजन करण्यांचे निर्देश दिलेले होते.

त्याप्रमाणे दि. २०/०१/२०१५ रोजी विशेष सभेचे आयोजन करून अंदाजपत्रकाला अंतिम मान्यता देऊन मा. आयुक्त सो., यांनी दि.२८/०१/२०१५ रोजी शासनाला कळविलेले आहे. व निलंबीत सभा लावण्याकरीता शासनाची मान्यता मागितलेली आहे.

निलंबित सभा लावणेबाबत शासनाची मान्यता आजपर्यंत प्राप्त झालेली नाही. आज दि. ०७/०२/२०१५ रोजी लावण्यात आलेली सभा हि कोणत्याही विशिष्ट किंवा आपतकालीन अशा परिस्थितीकरीता लावण्यात आलेली नाही. या सभेत घेण्यात आलेले अनुक्रमे ६४,६५,६६ हे विषय यापूर्वी दि.१५/०१/२०१५ रोजी आयोजित केलेल्या निलंबित करण्यात आलेल्या मा.महासभेच्या विषयपत्रिकेवरील निर्णयासाठी प्रलंबित आहे.

आजची सभा हि तहकुब करण्यांत येत असून, दि. १५/०१/२०१५ ची सर्वसाधारण सभेचे निलंबन शासनाकडून रद्द करून एकत्र आंजची तहकुब सभा दि.२/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करावी. याचे कारण आजच्या सभेचे विषय हे निलंबीत केलेल्या महासभेच्या विषयपत्रिकेवरील आहेत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :-**
श्री. नरेंद्र मेहता

**अनुमोदक :-**
A S. Kasodariya
श्री. अश्विन कासोदरिया

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

E/NM (VPN) /[illegible] 7/02/2015

(७८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. २०/०१/२०१५

**प्रकरण क्र. ६२:-** **सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मूळ अर्थसंकल्पास मंजूरी देणेबाबत.**

**ठराव क्र. ४८ :-**

**लेखाशिर्ष निहाय बदल करावयाचा रकमा** रू.लाखात

| अ.क्र | लेखाशिर्ष | मा.महासभा अंदाज (२०१४-१५) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक स्मशानभुमी व दफनभुमी दुरूस्ती | ६५.०० | ३३ |
| २ | मनपा सार्वजनिक इमारती दुरूस्ती व इतर कामे | ८०.०० | ३५ |
| ३ | सार्वजनिक रस्ते देखभाल / दुरूस्ती/पुर्नः पृष्ठीकरण | ३७००.०० | ३५ |
| ४ | सार्व.शौचालय व मुतारी दुरूस्ती | २३०.०० | ३५ |
| ५ | सर्वधर्मिय उत्सव मंडप / लाईट व इतर व्यवस्था | ३००.०० | ३५ |
| ६ | गटारे दुरूस्ती झाकणे बसविणे | ३५०.०० | ३५ |
| ७ | सार्वजनिक इमारती/ सिग्नल (विद्युत विजबिल) | १५०.०० | ३९ |
| ८ | मार्केट बांधकाम | १४०.०० | ४१ |
| ९ | नविन रस्ते बांधकाम | १५००.०० | ४२ |
| १० | नविन गटारे / नाले बांधकाम | ८५०.०० | ४२ |
| ११ | वाचनालय विकास | १५.०० | ४२ |
| १२ | जेसलपार्क सब-वे / पोच रस्ते | १८५०.०० | ४२ |
| १३ | त्रयस्थ लेखापरीक्षण फी | ५३.०० | ४२ |
| १४ | स्पोटर्स क्लब व इतर कामे | ७००.०० | ४२ |
| १५ | भाईंदर (पूर्व/प.),मिरारोड स्टेशन बाहेर सुशोभिकरण करणे | २५०.०० | ४३ |
| १६ | स्टेडीयम/ क्रीडा संकुल विकसित करणे | ७५.०० | ४४ |
| १७ | कम्युनिटी सेंटर | १००.०० | ४४ |
| १८ | भाईंदर (प) रुग्णालय बांधकाम (टेंबा हॉस्पिटल) | ३००.०० | ४१ |
| १९ | सिग्नल यंत्रणा / सी.सी.टी.व्ही.बसविणे (नविन विद्युत कामे) (रेल्वे स्टेशन /स्मशान भुमी/प्रभाग कार्यालय ) | ५०.०० | ४४ |
| २० | नविन स्ट्रीट लाईट/हायमस्ट (नविन विद्युत कामे) | २०.०० | ४४ |
| २१ | विजबिलाचा खर्च(पथदिवे)(विद्युत विजबिल) | १८००.०० | ३९ |
| २२ | सार्व. इमारती/ सिग्नल /जनरेटर/सी.सी.कॅमेरा दुरूस्ती (विद्युत दुरूस्ती) | ३५.०० | ३९ |
| २३ | सार्वजनिक इमारती (नविन विद्युत कामे) | २५.०० | ४४ |
| २४ | ऐतिहासिक स्मारके | २५.०० | ४२ |
| २५ | सभापती स्वेच्छा निर्णय निधी | १००.०० | ३७ |
| २६ | दशक्रीया विधी व इतर शेड बांधणे | १७५.०० | ४३ |
| २७ | वॉर्ड साफसफाई | ४९२०.०० | ३१ |
| २८ | वैद्यकीय अस्थायी आस्थापना | १५०.०० | ३२ |
| २९ | रुग्णालय फर्निचर / उपकरणे खरेदी करणे | ४००.०० | ४१ |
| ३० | एकात्मिक डास निर्मुलन योजना | २३०.०० | ३१ |
| ३१ | पाणी बील | ३७८०.०० | ४९ |
| ३२ | पंपींग व संपगृह विज देयक बिल | ४७०.०० | ५० |
| ३३ | टॅंकर भाडे | २८०.०० | ५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | मलनिःसारण विज देयक | ४००.०० | ५० |
| ३५ | पा.पु. साहित्य खरेदी | १७०.०० | ५१ |
| ३६ | नविन जलवाहिनी टाकणे | ११००.०० | ५१ |
| ३७ | नविन अतिरीक्त पाणी पुरवठा | ४३५०.०० | ५१ |
| ३८ | रस्ता नुकसान भरपाई (जमा) | ४२००.०० | १८ |
| ३९ | शाळा इमारत दुरूस्ती,निगा (शिक्षण) | १२०.०० | ५ |
| ४० | संगणक प्रशिक्षण (शिक्षण) | ४४.०० | ५ |
| ४१ | वर्ग सुरू करणे /शैक्षणिक साहित्य (शिक्षण) | १.०० | ५ |

## आर्थिक व प्रशासकिय मंजुरी

| अ. क्र. | कामाचे | मुळ मान्यता | सुधारीत मान्यता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | गायमुख ते चेणा दरम्यान सध्यांच्या जलवाहिनीस समांतर १३५० मि.मी. व्यासाची एम.एस. पाईप लाईन टाकणे. | रू. १७,८०,५४,६७५/- | रू. २२,०२,२८,७१२/- | मंजूर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा व भाववाढ |
| २ | हटकेश ते शामराव विठ्ठल बँकेपर्यंत १०६७ मि.मी. व्यासाची एम.एस. पाईप लाईन टाकणे | रू. ६,०३,६७,२१६/- | रू. ७,००,०२,६८८/- | मंजूर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा व भाववाढ |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका वाढीव पाणी पुरवठा योजना (एम.आय.डी.सी. स्त्रोत) | रू. २६९,६२,००,०००/- | - | |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करून मालमत्तेची मलःनिस्सारण जोडणी करणे | रू. २२,४५,००,०००/- | रू. ५४,४०,६३,७१५/- | सदरच्या कामाची निविदा ही सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे दरापेक्षा १४५% जास्त दराची आहे. |

अ.क्र. १,२,३ करीता वार्षिक अंदाजपत्रक सन २०१४-१५ पृ. क्र. ५१, बाब क्र. ०६ नवीन अति. पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षकाखाली तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी अ.क्र. १ व २ या कामांना सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अ.क्र. ३ वाढीव पाणी पुरवठा योजना एकूण खर्च रू. २६९.६२ कोटी खर्चास सदर योजना शासनाच्या नगरोत्थान अभियांनातंर्गत मंजुरीसाठी शासनास पाठविणेसाठी, तसेच या योजनेंतर्गत ५० टक्के रक्कम शासकीय अनुदान आहे व ५० टक्के रक्कम मनपा हिस्सा आहे. मनपा हिस्सापैकी ८० टक्के कर्ज स्वरूपात निधी उभा राहवयाचा आहे व २० टक्के मनपाच्या खर्चातून करावयाचा आहे.

महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात सन २०१४-१५ पृ.क्र. ६१ अ.क्र. ०१ जेएनएनयुआरएम मनपा हिस्सा या लेखाशिर्षखाली अ.क्र. ०४ मधील कामास सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

## कामाची यादी

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्ता ते कनकिया रस्ता जोडणारा ३०.०० मीटर डी.पी रस्ता तयार करणे व गटारे बांधणे (तिवारी कॉलेज समोरील) | रु. ७,००,५०,६००/- |
| २ | हटकेश येथील श्री. ॲव्हेन्यु ते वेस्टर्न पार्क (स.क्र. ९० ते १३२, घोडबंदर) पर्यतचा रस्ता तयार करणे व गटारे बांधणे | रु. ५,८१,५८,०००/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १० मधील ओम पुष्पक ते मणीभद्र इमारती पर्यत | रु. ४०,२५,५५५/- |

| | | |
|---|---|---|
| | नाल्याची पुर्नबांधणी करणे | |
| ४ | भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल इमारत बांधणे. मुळ सुधारीत अंदाजपत्रक<br>सुधारीत अंदाजपत्रक<br>(सदर सुधारीत अंदाजपत्रकानुसार काम मुळ कंत्राटदाराकडुन काम करुन घेण्यात यावे. सदर काम तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने मुळ कंत्राटदारास काम सब लेट करण्यास परवानगी देण्यात येत आहे.) | रु. १३,८१,८५,५७५/-<br>रु. २२,७८,२५,५००/- |
| ५ | टेंबा हॉस्पीटल मध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणे, हाऊसकिपींग, लॉन्ड्री, वैद्यकिय यंत्र सामुग्री खरेदी करणे इत्यादीसाठी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणे | रु.२,००,००,०००/- |

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक मा.आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मा. स्थायी समितीने मंजूर केलेले सुधारीत व मुळ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. महासभा सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ च्या मुळ अंदाजपत्रकास ही सभा मंजुरी देत आहे.

| तपशिल | २०१३-१४ (सुधारित अंदाज) | २०१४-१५ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" = एकूण जमा | 1227.31 | 5707.64 |
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" = एकूण खर्च | 827.21 | 5692.16 |
| अखेरची शिल्लक | 400.10 | 15.48 |

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मा. आयुक्त सो. यांनी सादर केलेल्या मुळ अंदाजपत्रकात काही दुरूस्त्या करून मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकात सुधारित व मूळ अंदाजपत्रकामध्ये वरीलप्रमाणे सुधारणा करून सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

## सन २०१३-१४ चे सुधारित अंदाज व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक

(आकडे लाखात)

| तपशिल | २०१३-१४ (सुधारित अंदाज) | २०१४-१५ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | ९१००४.२७ | १२५४५०.७३ |
| एकूण खर्च | ७९६०७.१२ | १२५४२५.७८ |
| अखेरची शिल्लक | ११३९७.१५ | २४.९५ |

**सूचक - श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन - श्री. प्रशांत दळवी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | | |
| २ | शरद केशव पाटील | | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | | |
| ४ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | | |
| ६ | भानुशाली वर्षा गिरीधर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | मीरादेवी रामलाल यादव | निरंक | निरंक |
| ८ | कोठारी सुमन रमेश | | |
| ९ | डॉ. नयना मनोज वसानी | | |
| १० | सिमा कमलेश शहा | | |
| ११ | जैन गिता भरत | | |
| १२ | अरोरा दिपिका पंकज | | |
| १३ | रावल भगवती जयशंकर | | |
| १४ | मेहता डिंपल विनोद | | |
| १५ | मेघना दिपक रावल | | |
| १६ | शर्मा सुनिला सत्येंद्र | | |
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | | |
| १८ | सुजाता रविकांत शिंदे | | |
| १९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | |
| २० | सिंग मदन उदितनारायण | | |
| २१ | कांगणे यशवंत ठकाजी | | |
| २२ | अनिल बाबुराव भोसले | | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | | |
| २४ | जैन दिनेश तेजराज | | |
| २५ | जैन रमेश धरमचंद | | |
| २६ | डॉ. राजेंद्र जैन | | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | | |
| २८ | तारा विनायक घरत | | |
| २९ | शुभांगी महिन कोटियन | | |
| ३० | जयमाला किशोर पाटील | | |
| ३१ | परमार अनिता भरत | | |
| ३२ | पाटील प्रणाली संदिप | | |
| ३३ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | |
| ३४ | संध्या प्रफुल्ल पाटील | | |
| ३५ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ३७ | हरिश्चंद्र आमगावकर | | |
| ३८ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| ३९ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | |
| ४० | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ४१ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ४२ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ४३ | भोईर राजू यशवंत | | |
| ४४ | जाधव मोहन महादेव | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(81)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०२/०३/२०१५

(दि. १५/०१/२०१५ रोजीची ~~तहकूब~~ तहकूब सभा)

प्रकरण क्र. ४४ :- दि. १९/०७/२०१४ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ५२ :-

दि. १९/०७/२०१४ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटिल

अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

(८२)

# मिरा-भाईदर महानगरपालिका
# मा. महासभा सभा दि. ०२-०३-२०१५
(दि. १५-०१-२०१५ रोजीची तहकूब निलंबीत महासभा)

प्रकरण :- ४५ स्थायी समितीच्या एका सदस्यांने रजिनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये (१) सदस्याची नेमणूक करणे.

ठराव क्र. :- ५३

स्थायी समितीच्या एका सदस्यांने रजिनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये (१) सदस्याची नेमणूक करण्याचा विषय सादर केलेले आहे. परंतु १५-१-२०१५ नंतर मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या पक्षाच्या सदस्य संख्येत फेरबदल झालेला आहे. म्हणून मा. सचिव यांनी कोकण विभागीय आयुक्त व तांत्रिक बाबींची माहती घेवून तद्नंतर सदर विषय सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी

अनुमोदन :- श्री. प्रशांत केळूस्कर

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

(४३)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा सभा दि. ०२-०३-२०१५
(दि. १५-०१-२०१५ रोजीची तहकूब महासभा)

प्रकरण :- ४६ वृक्ष प्राधिकरण समितीच्या एका सदस्यांने रजिनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये (१) सदस्याची नेमणूक करणे.

ठराव क्र. :- ९४

वृक्ष प्राधिकरण एका सदस्यांने रजिनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये (१) सदस्याची नेमणूक करण्याचा विषय सादर केलेले आहे. परंतु १५-१-२०१५ नंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पक्षाच्या सदस्य संखेत फेरबदल झालेला आहे. म्हणून मा. सचिव यांनी कोकण विभागीय आयुक्त व तांत्रिक बाबींची माहती घेवून तद्नंतर सदर विषय सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी

अनुमोदन :- श्री. अनिल भोसले

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

OK

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०२/०३/२०१५
## (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबीत सभा)

**प्रकरण क्र. ४८ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८२ नुसार नगरपालिका निधी स्थापन करणे व त्यामध्ये अशासकीय संस्था, सामाजिक संस्था, धर्मादाय संस्था, लोकप्रतिनिधी, खाजगी विकासक किंवा अनिवासी भारतीय यांच्याकडून पैसा, वस्तू, साहित्य, इ. तसेच बांधकाम स्वरुपात व परकीय चलनात मिळणारी मदत, देणगी, भेट, इ. स्वीकारण्यास परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ५५:-**

मिरा भाईंदर शहर हे मुंबई लगत असून सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ८.१४ लाख असून सन २०१४ ची अंदाजित लोकसंख्या १२ लाख इतकी आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार या शहरातील नागरी सुविधांची सुध्दा मागणी वाढते आहे. त्याकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये लोकोपयोगी विविध योजना, कार्यक्रम, उपक्रम हाती घेतले जातात, जसे की, सार्व. इस्पितळे बांधणे व ती महानगरपालिकेने सुस्थितीत चालविणे, वैद्यकीय विभागाकरिता सर्व सोयींनी युक्त जीवनरक्षक रुग्णवाहिका, शववाहिनी, फिरता दवाखाना, वैद्यकीय उपकरणे व अद्ययावत यंत्रसामुग्री घेणे, अग्निशमन विभागाकरिता अत्याधुनिक वाहने खरेदी करणे, उदयाने विकसित करणे व उदयानांमध्ये खेळणी उपलब्ध करुन देणे, इत्यादी.

महानगरपालिकेचे उत्पादनाचे स्त्रोत मर्यादित असल्यामुळे उपरोक्त सर्वच लोकोपयोगी उपक्रम हाती घेता येत नाहीत. उपरोक्त लोकोपयोगी उपक्रमासाठी काही खाजगी संस्था, व्यक्ती, अशासकीय संस्थेमार्फत देणगी रुपात पैसे, साहित्य देण्याबाबत वारंवार विचारणा होते. उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ८२ नुसार नगरपालिका निधी स्थापन करण्याची तरतूद आहे. मा. उच्च न्यायालयाच्या दि. २८/०३/२०१४ च्या आदेशानुसार टेंबा रुग्णालय हे टप्पाटप्पाने कार्यरत करावयाचे आहे. तसेच त्यासाठी सामाजिक संस्था, व्यक्ती, खाजगी संस्था यांच्याकडून वस्तू, पैसा इ. स्वरुपात डोनेशन घेण्यास मा. उच्च न्यायालयाने परवानगी दिलेली आहे. टेंबा रुग्णालयासाठी लागणारे फर्निचर, बेडस्, एक्स-रे, सोनोग्राफी, डायलिसिस, सिटीस्कॅन, एम.आर.आइ इत्यादी अद्ययावत मशिन्स दानशूर व्यक्तींकडून घेतल्यास महानगरपालिकेची मोठया प्रमाणावर आर्थिक बचत होईल व रुग्णालय लवकरात लवकर चालू होण्यास मदत होईल.

तसेच जर खाजगी व्यक्ती, संस्था, अशासकीय संस्था, खाजगी विकसक, अनिवासी भारतीय रुग्णालयातील एखादा विभाग किंवा दालन त्यांचे नाव देण्याच्या बदल्यात तयार करुन देत असल्यास ते घेण्यास हरकत नसावी.

सदर नगरपालिका निधी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्यात स्वीकारण्यात येईल. सदर निधीचा विनियोग आयुक्त यांच्या परवानगीने होईल. तसेच नर्सिंग कॉलेज, मेडीकल कॉलेज व इतर संस्था, व्यक्ती, डॉक्टर्स, शिकाऊ परिचारिका आपली सेवा विनामूल्य महानगरपालिकेस देऊ इच्छित असल्यास अशाप्रकारे सेवा घेण्यास हरकत नसावी.

उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८२ नुसार कायमस्वरुपी नगरपालिका निधी स्थापन करण्यास व त्यामध्ये अशासकीय संस्था, सामाजिक संस्था, धर्मादाय संस्था, लोकप्रतिनिधी, खाजगी विकसक किंवा अनिवासी भारतीय यांच्याकडून पैसा, वस्तू, साहित्य, इ. तसेच बांधकाम स्वरुपात व परकीय चलनात मिळणारी मदत, देणगी, भेट, इ. वेळोवेळी स्वीकारण्यास तसेच आलेल्या निधीचा वापर किंवा काय त्याबाबतचा अहवाल अवलोकनार्थ वेळोवेळी मा. महासभेसमोर सादर करण्यात यावा. यात कोणतीही दिरंगाई करण्यात येवू नये, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर          अनुमोदक :- श्री. संदिप पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदक श्री. अशरफ शेख ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

- रु. १ लाख किंवा त्याहून अधिक रक्कमेची देणगी देणाऱ्याचे नाव रुग्णालयात देणगी फलकावर प्रदर्शित करण्यात येतील.

- रु. १ लाख किंवा त्याहून अधिक रक्कमेची मशिन्स देणगी रुपात देणाऱ्यांची नावे संबंधित मशीनवर प्रदर्शित करण्यात येतील. सदर मशीन्स कार्यरत असेपर्यंत सदर नावे ठेवण्यात येतील.
- एखादा कक्ष किंवा विभाग उभारणीचा संपूर्ण खर्च देणगीदार करत असल्यास त्याचे नाव संबंधित कक्षाला देण्यात येईल.
- रुग्णवाहिका किंवा शववाहिनी देणगी रुपात दिल्यास सदर वाहनावर देणगीदाराचे नाव प्रदर्शित करण्यात येईल.
- रुग्णालयाच्या आवारात रुग्ण किंवा नातेवाईकांना बसण्यासाठी आसने, पाणी पिण्याचे कुलर्स इ. देणगी रुपात देणाऱ्यांची नावे त्यावर प्रदर्शित करण्यात येतील.
- या व्यतिरिक्त रुग्णालयासाठी लागणारे इतर सामान, वस्तु, साहित्य इ. देणगी रुपात देऊ इच्छिनाऱ्यांकडून पैशांच्या स्वरुपात देणगी स्विकारुन महानगरपालिकेतर्फे सदर वस्तु, साहित्य खरेदी करण्यात येईल.
- अग्निशमन विभाग व महानगरपालिकेच्या उदयानामध्येही १ लाखाहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्योच नाव देणगी फलकावर लावण्यात येईल. अग्निशमन गाडया देणगी देणाऱ्याचे नाव त्या गाडया कार्यरत असेपर्यंत देणगी देणाऱ्याच्या नावाची प्रसिध्दी करण्यात यावी.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक श्री. शरद पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर विषयाचे धोरण मा. स्थायी समितीमध्ये निर्णय घेऊन मंजूर करण्यात यावे अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(४४)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.०२/०३/२०१५

(दि. १५/०१/२०१५ रोजीची तहकूब सभा)

**प्रकरण क्रमांक ( ४९ )**:- मिरा भाईंदर महानगरपालिकेस नव्याने प्राप्त होणाऱ्या बसेस पार्कींगसाठी तात्पूरत्या स्वरूपात व्यवस्था करणेबाबत...

**ठराव क्रमांक ( ५६ )**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत १०० बसेस मंजूर झालेल्या असून त्यापैकी ९० बसेस खरेदी करण्यासाठी पुरवठा आदेश दिले अहेत. या बसेस जानेवारी २०१५ च्या सुमारास महानगरपालिकेकडे येतील, अशी अपेक्षा आहे. सदर बसेसच्या दैनंदिन देखभाल दुरूस्तीसाठी घोडबंदर आरक्षण क्र. ३२६ अ व उत्तन घनकचरा प्रकल्पाच्या जागेत बस डेपो बांधण्यात येणार आहेत. घोडबंदर व उत्तन येथील डेपो पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत होई पर्यंत बसेस पार्कींगसाठी ४ साईटसची निवड केलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या आरक्षणाच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात सदर बसेस पार्कींग व देखभाल दुरुस्तीसाठी जागा उपलब्ध करून द्यावयाची आहे. तथापी तात्पुरत्या स्वरूपात पार्कींगची व्यवस्था करताना स्थानिक नागरीकांना त्रास होणार नाही व इतर आरक्षणाच्या जागेवर पार्कींग केल्याने सदर आरक्षणाच्या सोयी पासून नागरीक वंचित राहणार नाहीत या प्रमाणे आरक्षणे निवडावी लागतील. तरी याबाबत प्रशासनाने पुन्हा प्रस्ताव तयार करावा व सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे ठेवावा. ही महासभा पार्कींग व्यवस्था आरक्षणाच्या ठिकाणी करण्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यतेचे अधिकार मा. स्थायी समिती सभेस प्रदान करीत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी

अनुमोदन :- श्री. दिनेश जैन

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC2/14-15/DK/MT-10

O/C

(४९१)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.०३/०३/२०१५

(दि.१५/०१/२०१५ रोजीची तहकूब सभा)

प्रकरण क्र. ५० : कलम ४१ (२) अ, जल(प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व कलम १५ पर्यावरण (संरक्षण), कायदा, १९८६ याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० प्रमाणे निर्देश-भांडवली खर्चामधुन २५ टक्के तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत.

ठराव क्र.५७

वरील विषयान्वये नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्प उभारणेकरिता भांडवली खर्चामध्ये २५ टक्के तरतुद महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात करणेबाबत व तशा आशयाचा मा. महासभेचा ठराव सादर करणेबाबत, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांचे दि.०६/०६/२०१४ व दि.२६/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये (सोबत प्रत जोडलेली आहे) कळविले असुन त्याअनुषंगाने सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी खालील सुचना दिलेल्या आहेत.

अ) महानगरपालिकेचे सर्व सांडपाणी एकत्रित करुन, त्यावर योग्य ती परिपुर्ण प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसवुन, शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावावी.

ब) जो नागरी घनकचरा आपल्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होतो, त्यासाठी स्वतंत्र वर्गीकरण (जैविक विघटनशील/अविघटनशील (Biodegradable / Non-biodegradable) आणि पुर्ननिर्माण घनकचरा (Recoverable Waste) करुन त्यांची विल्हेवाट सांडपाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र.घकव्य-१००३/प्र.क्र.६७५/पापु-२२, दि.२६/०८/२००३ प्रमाणे योग्य ती भुभरण जागा मान्यता मिळालेल्या ठिकाणी, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० मधील तरतुदींप्रमाणे, मे.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठापुढे दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र.१७४०/१९९८ आणि इतर एकत्रित याचिका मधील दि.०२/०४/२०१३ च्या आदेशाप्रमाणे दिलेल्या विहित मुदतीत करणे आपणांवर बंधनकारक आहे.

क) त्यामुळे आपण परिपुर्ण सांडपाणी व्यवस्थापन व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकुण भांडवली खर्चापैकी २५ टक्के तरतुद करुन या प्रकल्पावर खर्च करावे, जेणेकरुन सदरहु यंत्रणा उभारण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतुद होऊन कायदेशीर पुर्तता पार पाडली जाईल.

उपरोक्त सुचनेनुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात सांडपाणी प्रकल्प उभारणेकरीता व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकुण भांडवली खर्चापैकी २५ टक्के तरतुद करण्यासाठी हि सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- Vasani

(Dr. Nayana Vasani)

अनुमोदन :- [signature]

सौ. कल्पना म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

ठराव वाचून कायम करण्यात आला

[signature]

मा. महापौर

महासभा

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

(९०)

मा. महासभा दि.०२/०३/२०१५.
(दि. २५/०२/२०१५ रोजीची तहकूब सभा)
॥ ठराव ॥

प्रकरण क्र (५७) :- आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.(पाणी पुरवठा विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका वाढीव पाणी पुरवठा योजना
(एम.आय.डी.सी. स्त्रोत).

ठराव क्र. (५८) :-

मिरा-भाईदर शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ८.१४ लक्ष इतकी असून सध्याची लोकसंख्या अंदाजे १० लक्ष असून पाण्याची मागणी १७२ द.ल.लि. प्रति दिन आहे. परंतु मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ५० द.ल.लि. असा एकूण सरासरी १३६ द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. सद्यस्थितीत होणारा पाणी पुरवठा आवश्यक असलेल्या पाणी पुरवठ्यापेक्षा ३६ द.ल.लि. कमी होत आहे व पाणी पुरवठ्याचे तास ३६ ते ४० तासांवर गेलेला आहे.

दि.२६/०८/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कोटयातून देण्याचे तत्वतः मान्य केले आहे. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास अतिरिक्त १०० द.ल.ली. पाण्याची मागणी केलेली होती. परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पुर्वी मंजुर केलेले ५० द.ल.ली. (३०+२०) व आता तत्वतः मान्यता दिलेले ५० द.ल.ली. असे एकूण १०० द.ल.ली. पाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेस देण्याचे दि. २६/०८/२०१४ च्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेस कळविले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. ३१/१०/२०१४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पहिले मंजूर केलेले ५० द.ल.ली. पाणी सोडून वाढीव अतिरिक्त १०० द.ल.ली. पाणी मंजूर करण्यात यावे असे कळविले आहे. त्यानुसार दि.२४/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत मिरा भाईंदर महानगरपालिकेस आणखी अतिरिक्त २५ द.ल.ली. प्रतिदिन पाणी देण्यास तत्वतः मान्यता दिलेली आहे. सारांशात, मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून एकूण ५० + ७५ = १२५ द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होणार आहे. म्हणजेच एकूण MIDC च्या कोटयातून ५० द.ल.ली. आस्तीत्वात असलेले पाणी व नवीन ७५ द.ल.ली. पाणी असे एकूण १२५ द.ल.ली. प्रतिदिन पाणी मंजूर आहे. तसेच सदरचा प्रकल्प अहवालाचे संकल्पचित्र व संकल्पन एकूण १०० द.ल.ली. पाण्याची गरज लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मिरा भाईंदर महानगरपालिकेस मंजुर करण्यात आलेले पाणी महामंडळाच्या शिळ येथील शुध्द पाण्याच्या संतुलन टाकीपासून घेण्यात यावे असे सुचविले आहे.

धानुसार प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून त्याची अंदाजपत्रकीय किंमत रु. २६९.६२ कोटी इतकी आहे. तसेच महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत हाती घ्यावयाच्या पायाभुत सुविधांशी निगडीत प्रकल्पासाठी ७० टक्के शासकिय अनुदान (रु.१८८.७१ कोटी) व उर्वरीत ३० टक्के (रु.८०.८८ कोटी) मंनपाचा हिस्सा त्यापैकी ८० टक्के कर्ज स्वरुपात निधी उभारणे व २० टक्के महानगरपालिकेचा हिस्सा असा वित्तिय आकृतीबंध आहे.

शिळ संतुलन टाकी ते मुकूंद कंपनी पर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने इन्फ्रास्ट्रक्चर विकसीत करुन त्याकरिता लागणाऱ्या भांडवली खर्चाचे समायोजन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाण्याच्या दरात करणे शक्य आहे. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरंभिक भांडवली खर्चात (Initial Capital Cost ) बचत होईल.

दि.२५/११/२०१४ रोजी मा. महासभेने तत्वत: मंजुर केलेल्या ठरावानुसार सदर प्रकल्पीय अहवाल आय.आय.टी. मुंबई यांचे कडून तांत्रिक छाननी करुन व तसा अभिप्राय घेऊन निधी उपलब्ध करणेकरिता राज्य शासनाच्या नगरोत्थान अभियांनातंर्गत मंजुरीसाठी प्रस्तावीत करण्यात आला आहे.

तसेच वित्तीय संस्थांकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०९ नुसार मान्यता घेण्यास व महाराष्ट्र सुवर्ण जंयती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत विहित केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्याबाबत, बंधनकारक व वैकल्पीक सुधारणा राबविण्याबाबत, स्वहिस्याचा निधी विहित केलेल्या वेळेत उपलब्ध करण्याबाबत तसेच सदर प्रकल्प यशस्वीरित्या व जबाबदारीने राबविण्याकरिता व मा. आयुक्त यांना वरील कामाकरिता समन्वय साधनेकरिता प्राधिकृत करण्यात येत असून त्यास हि सभा मंजुरी देत आहे, तसेच प्रकल्प अहवालास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी सुद्धा ही सभा देत आहे.

प्रमद पाटील

सुचक :-

अनुमोदन :- सुमन कोठारी

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

K

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०२/०३/२०१५

(दि. १५/०१/२०१५ रोजीची स्थगित सभा)

**प्रकरण क्रमांक ( ५२ ) :-** विविध विकास कामांच्या सुधारीत अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत...

**ठराव क्रमांक ( ५८ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करावयाच्या खालील विकास कामांना मा. महासभेने प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिल्या असून तद्नंतर सदर कामांसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामांच्या अंदाजपत्रकातील दर व काम मंजूर करतेवेळी असलेल्या चालू जिल्हा दरसुचीतील दरामधील फरक, कामाचे स्वरुप व त्यामुळे मा. मा. स्थायी समिती सभेने मंजूर केलेल्या निविदा वरील वाढीव दरामुळे प्रत्यक्षात कामांच्या खर्चात वाढ होत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | मा. स्थायी समितीने मंजूर केलेला दर | मंजूर दराने अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.) आरक्षण क्र. २१८ कम्युनिटी सेंटर बांधकाम करणे. | रु.४,८२,५८,६००/- | १८.००% जास्त दराने | रु. ५,६९,४५,१४८/- |
| २ | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चौपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे. | रु. ५६,५४,९८६/- | ८.००% जास्त दराने | रु. ६१,०७,३८४/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन बाहेरील परीसर सुशोभित करणे. | रु. ७,१०,९९,६००/- | १८.००% जास्त दराने | रु. ८,३८,९७,५२८/- |
| ४ | भाईंदर (पू.) आरक्षण क्र. २३१ मार्केट बांधकाम करणे. | रु. ३,७१,२२,०००/- | १८.००% जास्त दराने | रु. ४,३८,०३,९६०/- |
| ५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काजूपाडा येथील शाळेची पुर्नबांधणी करणे. | रु. २,२२,९४,१४९/- | १३.७३% जास्त दराने | रु. २,५३,५५,१३६/- |
| ६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोर्वा येथील शाळेची पुर्नबांधणी करणे. | रु. २,३३,४६,३१५/- | १३.९१% जास्त दराने | रु. २,६५,९३,७८७/- |
| ७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चौक येथील शाळेची पुर्नबांधणी करणे. | रु.२,८३,५३,५४७/- | १३.७४% जास्त दराने | रु. ३,२२,४९,३२४/- |

प्रशासनाच्या गोषवाऱ्यातील अनु. क्र. १ ते ७ ~~वरील~~ कामांच्या सुधारीत अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी

अनुमोदन :- श्री. प्रमोद सामंत

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC-5/14-15/DK/MT-9

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०२/०३/२०१५
## (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबीत सभा)

**प्रकरण क्र. ५३ :-** **महानगरपालिकेच्या मालमत्ता करधारकांना आकारण्यात आलेले व्याजदर कमी करणेबाबत.**

**ठराव क्र.६० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कर विभागाने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील बिलांचे वाटप केलेले आहे. काही मालमत्ताधारकांना सन २०१३-१४ या वर्षामधील घरपट्टी कराची रक्कम जमा करुन देखील सदर जमा केलेल्या रक्कमेच्या थकबाकीसह बिले बजावण्यात आलेली आहेत. यामुळे नागरीकांमध्ये मोठ्या प्रमाणात महापालिकेविषयी नाराजी व्यक्त होत आहे. याकरीता ज्या मालमत्ताधारकांना थकबाकी जमा करुन घरपट्टी कराची बिले बजावण्यात आलेली आहेत, अशा मालमत्ताधारकांना आलेले व्याज, नोटीस फी त्वरीत रद्द करण्याची कार्यवाही कर विभागाकडून तातडीने करावी व नागरीकांना होणाऱ्या मानसिक त्रासातून मुक्त करावे.

तसेच प्रशासनाने कर विभागाची कामे वेळेत होण्याकरीता आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा. उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेवून ज्या नागरीकांनी मागील मालमत्ता कराचा भरणा करुनही चालु आर्थिक वर्षामध्ये व्याज, नोटीस फी आकारण्यात आलेली आहे ती रद्द करण्यात यावी. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र ६ प्रभाग समित्यांमध्ये विभागलेले आहे. त्यात रहिवाशी व वाणिज्य असे ३,५५,०६८ मालमत्ताधारक अस्तित्वात आहेत. महापालिकेच्या कार्यपध्दती अनुसार वित्तीय वर्षाच्या सुरुवातीलाच आधी सहा महिन्याचे नंतरच्या सहा महिन्याचे मागणी देयके करधारकांना वितरीत केली जातात. प्रथम सहा महिन्याच्या मागणीवरच्या देयक रक्कम अदा करण्याची मुभा तीन महिन्यापर्यंत असते. उशिर झाल्यास १२ टक्के व्यात प्रती दिन प्रमाणे आकारला जातो. तद्नंतर पुढील सहा महिन्यांसाठीही तेच धोरण माहे मार्च अखेरपर्यंत अवलंबीले जाते.

महापालिका कर विभागाकडून मालमत्ता कर मागणी वित्तीय वर्षातील सहा, आठ महिने उलटूनही करधारकांकडे पोहचत नाही. याबाबतची तक्रार रहिवाशी व लोकप्रतिनिधी वारंवार करत असतात. महापालिकेच्या माध्यमातून करधारकांना उशिरा पोहचणाऱ्या देयकामुळे व्याज भरावा लागतो ही एक अन्यायकारक बाब आहे. तथापी द्वितीय वर्षाच्या ऑगस्ट अखेरपर्यंत तरी मालमत्ता देयक करधारकांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे, याची भविष्यात दक्षता घ्यावी व असे न झाल्यास संबंधीत कर निर्धारक अधिकारी यांना जबाबदार ठरवावे.

महानगरपालिका क्षेत्रात एकाच इमारतीमधील वेगवेगळ्या सदनिकांवर करयोग्य मुल्याप्रमाणे वेगवेगळे कर आकारण्यात आलेले आहेत. तरी अशा मालमत्तांच्या करामध्ये सुधारणा करुन समान कर आकारण्यात यावा. महानगरपालिका कर विभागाच्या माध्यमातून करधारकाने मालमत्ता देयक अदा करुनही वित्तीय वर्ष संपले तरीही भरलेले देयक खतवण्याचे काम विभागीय कर्मचाऱ्यांमार्फत नियमित होत नाही. किंबहूना कर निर्धारकांचा या विषयावर जातीने लक्ष असणे अत्यंत गरजेचे आहे. विभागीय कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे वित्तीय वर्षाच्या कर वसुलीच्या अर्थसंकल्पातील अंदाज विस्कळीत होतो. तरी विभागीय अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत आपली जबाबदारी पार पाडावी.

महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामावर तिप्पट शास्ती आकारली जात आहे. मालमत्ताधारक अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विकासकांच्या कृतीला बळी पडतात व सर्वसाधारण करधारकांना त्याचा भुर्दंड सोसावा लागत आहे. तरी शास्तीच्या रक्कमेवर व्याज आकारण्यात येऊ नये.

भिवंडी-निजामपुर महानगरपालिका व ठाणे महानगरपालिकेच धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातीलही करधारकांनी त्यांच्या मालमत्तेवर थकीत असलेली कराची मागणी मार्च अखेरपर्यंत अदा केल्यास त्यातुन व्याजाची रक्कम पुर्णतः माफ करुन केवळ कराची रक्कम स्विकारण्यात यावी, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रतिभा तांगडे** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(९५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०२.०३.२०१५

(दि.२५/०२/२०१५ रोजीची तहकूब सभा)

**प्रकरण क्र. (५४)** : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम -१०७ - अ अन्वये स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचेकडील सन २०११-१२ च्या लेखापरिक्षा अहवालाबाबत

ठराव क्र. ( ६७)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०११-१२ च्या वार्षिक लेख्यांचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षा विभागाकडुन पूर्ण झाले असून संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचेकडून सन २०११-१२ चा अहवाल त्याचेकडील पत्र स्था.१८/ब/मिरा भाईंदर लेप/१२-१३/६७३ दि. ३१.०७.२०१४ अन्वये दि. ८ ऑगस्ट २०१४ रोजी आयुक्ताकडे सादर करण्यात आला आहे.

स्थानिक निधी व लेखापरिक्षा विभागाने सन २०११-१२ च्या लेखापरिक्षण अहवालात निदर्शनास आणुन दिलेले लेखा आक्षेपांबाबत आयुक्तांनी सुधारणा व अधिक स्पष्टीकरणासह सुधारित अनुपालन स्थानिक निधी व लेखापरीक्षा विभागास सादर करून अहवालाबाबत स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : श्रीम.सुनिता शर्मा

अनुमोदक : श्रीम.दिपिका अरोरा

ठराव सर्वानुमताने मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(८५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.०२/०३/२०१५

(दि. १५/०१/२०१५ रोजीची विलंबित सभा)

**प्रकरण क्र. ५५ :** **मा. उच्च न्यायालयाच्या दि. २८/०३/२०१४ च्या आदेशानुसार "भारतरत्न पंडित भीमसेन जोशी" रुग्णालय महानगरपालिकेतर्फे चालविणे व त्यासाठी आवश्यक बांधकाम विषयक कामे, औषधे व उपकरणे खरेदी, हाऊसकिपिंग, लॉंड्री, इ. विविध बाबींसाठी निविदा मागविण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे भाईंदर (प.) येथे २०० खाटांच्या "भारतरत्न पंडित भीमसेन जोशी" रुग्णालयाची इमारत बांधून तयार आहे. सदर ठिकाणी रुग्णालय स्थापित करुन ते चालविण्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग नेमणे व उपकरणे, यंत्रसामुग्री, फर्निचर व इतर आवश्यक बाबी पाहता महानगरपालिकेंवर खूप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे ही बाब लक्षात घेऊन मा. महासभा दि. १४/१२/२०१२ ठराव क्र. १२ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे महानगरपालिकेच्या वतीने जनहित याचिका क्र. ३८/२००६ यात Civil application क्र. १६६/२०१३ दाखल करुन टेंबा रुग्णालय महानगरपालिका ऐवजी राज्य शासन अथवा सेवाभावी संस्था, धर्मादाय संस्था यांना चालविण्यासाठी परवानगी अपेक्षिली होती. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनास "भारतरत्न पंडित भीमसेन जोशी" रुग्णालय हस्तांतरणाबाबत विनंती केली होती.

मात्र मा. उच्च न्यायालयाने दि. २८/०३/२०१४ रोजीच्या निर्णयाद्वारे "भारतरत्न पंडित भीमसेन जोशी" रुग्णालय हे महानगरपालिकेने स्वतःच्या निधीतून टप्प्याटप्प्याने चालू करावे, असे आदेश पारित केले आहेत. त्याविरुध्द महानगरपालिकेने मा. सर्वोच्च न्यायालयात केलेली ध्ङ्कङत्ङ्म खङ्कङ्घङ्क घङ्कद्यत्यत्तृद दि. १९/०९/२०१४ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून उच्च न्यायालयाचे आदेश कायम ठेवले आहेत.

मा. उच्च न्यायालयाच्या दि. २८/०३/२०१४ च्या आदेशानुसार "भारतरत्न पंडित भीमसेन जोशी" रुग्णालय महानगरपालिकेस टप्प्याटप्प्याने चालू करावयाचे आहे. दरवर्षी ५० खाटा याप्रमाणे सन २०१८ पर्यंत २०० खाटा कार्यरत करावयाच्या आहेत. मा. उच्च न्यायालयाने कालमर्यादा घालून दिलेली असल्यामुळे न्यायालयीन अवमान होऊ नये यासाठी "भारतरत्न पंडित भीमसेन जोशी" रुग्णालय चालू करण्यासाठी खालील आवश्यक बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) रुग्णालयाचे अपूर्ण असलेले बांधकाम पूर्ण करणे, अग्निशमन व्यवस्था पुरविणे व परिसर विकासाच्या इतर आवश्यक बाबी पूर्ण करणे.

२) रुग्णालयातील प्लंबिंग, इलेक्ट्रिकल्स, टायलिंग, फर्निचर इ. कामे करणे.

३) रुग्णालयाच्या दैनंदिन साफ सफाईसाठी आऊटसोर्सिंगद्वारे हाऊसकिपिंगची व्यवस्था पुरविणे.

४) रुग्णालयातील रुग्णांच्या व इतर आवश्यक कपडयांच्या धुलाईसाठी आऊटसोर्सिंगद्वारे लॉंड्रीची व्यवस्था पुरविणे, तसेच रुग्णांसाठी आऊटसोर्सिंगद्वारे डाएटची व्यवस्था पुरविणे.

५) रुग्णालयासाठी मानद तत्वावर तज्ज्ञ डॉक्टर्सची सेवा घेणे, मा. महासभा दि. २२/१०/२०१०, ठराव क्र. ६९ नुसार मानद तज्ज्ञांचे मानधन व विविध वैद्यकीय सुविधांचे दर आकारणे, तसेच भविष्यात रुग्णालयात उपलब्ध होणाऱ्या सेवा सुविधांचे दर ठरविण्याचे, मानद तज्ज्ञांच्या

मानधनात वाढ करण्याचे व वेळोवेळी येणाऱ्या अडचणींवर निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्तांना देणे.

६) रुग्णालयासाठी आवश्यक औषधे, उपकरणे, सर्जिकल्स, प्रयोगशाळा साहित्य, केमिकल्स, रिअजन्ट, इ. खरेदी करणे.

उपरोक्तप्रमाणे नमूद रुग्णालयाच्या उर्वरित बांधकामासाठी व इलेक्ट्रिकल, प्लंबिंग, टायलिंग, इ. साठी अंदाजित रु. ६.२७ कोटी खर्च अपेक्षित आहे. तसेच रुग्णालयासाठी आवश्यक औषधे, उपकरणे, साहित्य, सर्जिकल व लॅब मटेरियल, इ. साठी रुग्णालय सल्लागार आर्थिक अंदाज सादर करतील त्यानुसार खर्च करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे "भारतरत्न पंडित भीमसेन जोशी" रुग्णालय चालू करण्यासाठी मानद तत्वावर तज्ज्ञांची सेवा घेणे, मा. महासभा दि. २२/१०/२०१०, ठराव क्र. ६९ नुसार मानद तज्ज्ञांना मानधन देणे व विविध वैद्यकीय सुविधांचे दर आकारणे, भविष्यात रुग्णालयात उपलब्ध होणाऱ्या सेवा सुविधांचे दर ठरविणे, मानद तज्ज्ञांच्या मानधनात वाढ करणे व वेळोवेळी येणाऱ्या अडचणींवर निर्णय घेण्याचे आयुक्तांना अधिकार देणे, रुग्णालयासाठी आवश्यक औषधे, उपकरणे, सर्जिकल्स, प्रयोगशाळा साहित्य, केमिकल्स, रिअजन्ट, इ. खरेदी साठी निविदा मागविणे, डाएट, हाऊसकिपिंग व लॉंड्री सेवा पुरविण्यासाठी निविदा मागविणे, रुग्णालयाचे उर्वरित बांधकाम, इलेक्ट्रिक, प्लंबिंग, टाईलिंग, फर्निचर, अग्निशमन व्यवस्था, इ. कामे करण्यासाठी निविदा मागविणे व त्यासाठी उपलब्ध शिल्लक तरतुदीतून खर्च करणे, रुग्णालय सल्लागार यांच्या अहवालाप्रमाणे आवश्यक ती कामे निविदा मागवून करणे, इ. बाबी आवश्यक आहेत.

परंतु या विषयाचा गोषवारा दिलेला नाही. म्हणून अभ्यास न करता सदरचा विषय मंजूर करणे योग्य नाही. शहराचा व गोरगरीब नागरीकांच्या हिताचा विचार करुन हॉस्पीटल सुरु करणे आवश्यक आहे. म्हणून संबंधित विभागाने या विषयाचा अहवाल, गोषवारा व माहिती मा. स्थायी समिती समोर सादर करावी. या हॉस्पीटलचा आर्थिक व प्रशासकीय निर्णय घेणेसाठी ही सभा हे सर्व अधिकार मा. स्थायी समितीस देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सूचक :- श्री. अनिल भोसले

अनूमोदक :- A S. Kasodariya
श्री. आसिफ कासोदरिया

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. ०२-०३-२०१५

(दि. १५-०१-२०१५ रोजीची ~~तहकूब~~ महासभा)

**प्रकरण :- ५६** **मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरू करण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करणे बाबत.**

**ठराव क्र. :- ६३**

सदर विषयाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती सादर करण्यात आलेली नाही. याबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात यावी व त्यांनतर सदरचा विषय पुढील मा. महासभेमध्ये फेरसादर करण्यात यावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :-** श्रीमती वर्षा भानुशाली

**अनुमोदन :-** श्रीम. सुष्मिता शर्मा

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(k)

אזלבמ:

(९२४)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२/०३/२०१५

### (दि. १५/०१/२०१५ ची निलंबित सभा )

**"अनुसूची 'ड' प्रकरण २ नियम 'ज' अन्वये प्रस्ताव"**

**प्रकरण क्र. ५७ :-** **सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मार्केट व खेळाचे मैदान असे आरक्षण करण्याबाबत.**

**ठराव क्र. ६४ :-**

महानगरपालिका शहराचा विकास आराखडा सन १९९७ साली मंजूर आहे. मंजुर आराखड्यात मिरा भाईंदर नगरपरिषदेची स्थापना सन १९८५ साली असून, सन २००२ पासून महानगरपालिका अस्तित्वात आली.

परंतु त्यावेळी शहराची व लोकसंख्येचा अंदाज व माहिती पूर्णपणे न घेता आरक्षणे रेखांकित केलेली आहे. आजमितीस मिरारोड सिल्व्हर पार्क ते एन.एच. हायस्कुलच्या परिसरात मोठ्या प्रमाणात लोकसंख्येत वाढ झालेली आहे. त्यामुळे तेथिल नागरीकांना सुखसोयींपासून वंचित रहावे लागत आहे.

तरी मिरारोड पूर्व येथील मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ४७४,४७७,४८१,४८७ या जागा वेटलॅन्ड आहेत. तेथे जर आरक्षण टाकल्यास नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रासापासून सुटका मिळेल. त्यामुळे सदर जागेचे क्षेत्र खुप मोठे असल्याकारणाने तसेच मिरारोड शहरातील सिल्व्हर पार्क ते एन.एच. हायस्कुलपर्यंत बऱ्याच प्रमाणात फेरिवाले रस्त्यावर बसत असल्याने रहदारीस देखील अडचण होत आहे. ज्याप्रकारे शासकीय कार्यालय भाड्याने उपलब्ध करुन देत आहोत. उदा. दुय्यम निबंधक, जिल्हा उपनिबंधक, शिधावाटप कार्यालय वगैरे यांना स्वतंत्र अशी इमारत आरक्षणास बांधल्यास सोयीस्कर होईल. त्याचप्रमाणे मार्केटचे बांधकाम झाल्यास नागरीकांचे प्रश्न मार्गी लागतील. तसेच सदर जागेत अस्तित्वात असलेला नाल्याचे आखणी करुन नाला विकसित करण्यात यावा व मिरारोड पूर्व येथील मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ४७४,४७७,४८१,४८७ या जागेत प्रस्तावित नकाशाप्रमाणे शहरातील गरजेप्रमाणे शासकीय इमारत प्ले ग्राऊंड, मार्केट या प्रकारचे आरक्षणासाठी राखीव करावे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्याचे अधिकार व त्याकरीता सदर जागेतील प्रत्येक आरक्षणाचे क्षेत्र निश्चित करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहे.

तसेच भाईंदर पूर्व येथे कोणत्याही प्रकारचे आरक्षण किंवा खेळाचे मैदान नाही. त्यामुळे तेथिल रहिवाश्यांना व वरिष्ठ नागरीकांना तसेच मुलांना खेळण्यासाठी व फिरण्यासाठी म्हणून मौजे गोडदेव सर्व्हे क्र. १०८,१०९ व ११८ या जागेत ६ हजार ते ८ हजार चौ.मी. इतके गार्डन व खेळाचे मैदान प्रस्तावित नकाशे असे आरक्षण टाकण्यासाठी राखीव करावे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वेय फेरबदल करण्याचे अधिकार व त्याकरीता सदर जागेतील प्रस्तावित नकाशाप्रमाणे प्रत्येक आरक्षणाचे क्षेत्र निश्चित करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२/०३/२०१५

## (दि. १५/०१/२०१५ ची निलंबित सभा )

**"अनुसूची 'ड' प्रकरण २ नियम 'ज' अन्वये प्रस्ताव"**

**प्रकरण क्र. ५८ :-** सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- आरक्षण क्र. २१४ ही जागा मार्केट आरक्षणाखाली घेणेबाबत.

**ठराव क्र. ६५ :-**

महानगरपालिका शहराचा विकास आराखडा सन १९९७ साली मंजूर आहे. मंजुर आराखड्यात मिरा भाईंदर नगरपरिषदेची स्थापना सन १९८५ साली असून, सन २००२ पासून महानगरपालिका अस्तित्वात आली.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहराचा विकास आराखडा सन १९९७ साली मंजूर आहे. मंजुर आराखड्यात मौजे गोडदेव येथे आरक्षण क्र. २१४ हे गार्डन आणि आरक्षण करण्यात आले आहे. या शहरात गोडदेव नाका ते हटकेश पर्यंतचा भाग मोठ्या झपाट्याने विकसीत होत आहे. बऱ्याच मोठ्या प्रमाणात या परिसरात नागरी संकुल इमारती अस्तित्वात येत आहेत. सद्यपरिस्थितीत या परिसरातील मुख्य रस्त्यांवर फेरिवाल्यांची संख्या फार वाढली आहे. सदर परिसरात सर्व नागरिकांच्या सुविधेकडे पाहता सदर फेरिवाले त्यांना उपयुक्त पडत आहेत. परंतु सदर फेरिवाल्यांमुळे सदर परिसरात वाहतुकीस फार मोठी अडचण होऊन रहदारीस त्रास होत आहे.

सदर मौजे गोडदेव येथिल आरक्षण क्र. २१४ गार्डन या साठी असले तरी सदर परिसरात मोठी लोकवस्ती असल्याने, तसेच आरक्षण क्र. ११२ प्ले ग्राऊंड आणि सोशल फॉरेस्ट्री तसेच त्याचे पुढचे आरक्षण क्र. ११९,१२० प्ले ग्राऊंड गार्डन अशी दोन आरक्षणे आहेत, आरक्षण क्र. २४२ गार्डन असे आरक्षण आहे.

सोशल फॉरेस्ट्री व आजुबाजूला असलेले आरक्षण क्र. २१४ बगीचाने आरक्षित आहेत. सदर गोल्डन नेस्ट ते हटकेश या परिसरातील लोकसंख्या व रस्त्यावरील फेरिवाल्यांचे अतिक्रमण व लोकसंख्येच्या आवश्यकतेनुसार आरक्षण क्र. २१४ येथे जर मार्केट विकसीत केल्यास सदर परिसरातील नागरीकांच्या समस्येचे निराकरण व फेरिवाल्यांच्या रस्त्यांवरील अतिक्रमण दूर होईल. याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर आरक्षण क्र. २१४ (गार्डन) येथे आरक्षण क्र. २१४ (मार्केट) असा फेरबदल करण्याच्या ठरावास हि सभा मंजुरी देत असून पुढील संपूर्ण कारवाई करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देत आहेत असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२/०३/२०१५

## (दि. १५/०१/२०१५ ची निलंबित सभा )

**"अनुसूची 'ड' प्रकरण २ नियम 'ज' अन्वये प्रस्ताव"**

**प्रकरण क्र. ६० :-** **सन्मा. सदस्य श्री. शरद केशव पाटील यांचा दिनांक ०८/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- शहरातील आरक्षण विकसित करण्याचे धोरण ठरविणे बाबत.**

**ठराव क्र. ६६ :-**

मिरा-भाईंदर शहराचा विकास आराखडा सन १९९७ साली मंजुर झालेले आहे. मंजुर आराखड्यात शहरातील नागरीकांच्या सोयीसुविधा व हिताच्या दृष्टीने वेगवेगळी विनाबांधकाम (नॉन्‌बिल्डेबल), बांधकाम योग्य (बिल्डेबल) अशी एकूण ३२६ आरक्षणे दाखविण्यात आलेली आहेत.

मिरा भाईंदर शहराच्या आरक्षणाखाली जागा नगररचना विभागाव्दारे विकास हक्क प्रमाणपत्र देऊन आरक्षणे ताब्यात घेण्यात येतात. मिरा भाईंदर महानगरपालिका व्दारे ताब्यात घेतलेल्या अशा बऱ्याच आरक्षित जागेत अतिक्रमणे होत चाललेली आहे. भविष्यात अतिक्रमणामुळे मोठी अडचण व त्रास उद्‌भवणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आरक्षणापैकी (नॉन्‌बिल्डेबल) उदा. (खेळाचे मैदान व बगीचा) आरक्षणे विकसीत करण्याचा संपूर्ण अधिकार मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आहे. तसेच बांधकाम योग्य म्हणजेच (बिल्डेबल) आरक्षणे उदा. (शाळा, हॉस्पीटल, तरणतलाव, मार्केट कम्युनिटी हॉल, पार्कींग वगैरे) ही आरक्षणे विकसीत करण्याचा प्रथम अधिकार महानगरपालिकेचा आहे. तद्‌नंतर विकासकाचा आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या व लोकहीत पाहता अशी बिल्डेबल आरक्षणे विकसीत करणे फारच गरजेचे आहे. मनपाव्दारे अशा प्रकारच्या आरक्षणात यापूर्वी विकासकांना परवानग्या देऊन आरक्षणे विकसीत करण्यात आलेली आहेत. तरी यापुढे प्रस्तावित अर्ज व्यतिरिक्त बिल्डेबल आरक्षणे ही नागरीकांच्या व शहराच्या हिताची असल्याने खाजगी विकासकांना विकसीत करण्यासाठी आजपासून मा. महासभेच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येऊ नये असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक:- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

(स्वाक्षरी)
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१५

(दि. १५/०१/२०१५ रोजीची तहकूब सभा)

"महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण दोन (१) (अ) अन्वये प्रस्ताव"

**प्रकरण क्रमांक ( ६७ )** :- नामकरण प्रस्तावाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक ( ६७ )**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०३ व फेज-३ येथील चौकास तत्कालिन नगरपरिषद असताना मा.स्थायी समिती सभा दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ अन्वये संत गुरु गोविंद सिंह चौक असे नामकरण करण्यात आले होते. तथापी सदर ठराव होण्यापुर्वी पासुन सदर चौकास उमाकांत मिश्रा चौक असे नाव परिचित होते. त्यामुळे तत्कालिन नगरपरिषदेच्या काळापासुन सदर चौकाचे नामकरण होऊ शकले नाही. सदर चौकास उमाकांत मिश्रा चौक असे नाव देण्याबाबत सर्व पक्षीय नगरसेवक, लोकप्रतिनिधी मार्फत मागणी करण्यात आली .

दरम्यान च्या काळात सदर चौकात श्री. गुरुगोविंद सिंह चौक असे नामकरण करावे याबाबत सिख वेलफेअर असासिएशन यांनी मागणी केली. तथापी सदर संस्थेच्या पदाधिकाऱ्याशी केलेल्या चर्चेनुसार त्यांनी मिरारोड (पूर्व) कनकिया येथील सिनेमॅक्स समोरील चौकास "श्री गुरुगोविंद सिंह चौक" असे नामकरण करावे अशी विनंती केली आहे.

तरी वरील सर्व परिस्थिती पाहता खालील प्रमाणे नामकरण करणे योग्य होईल.

| | | |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ३ येथील चौक | उमाकांत मिश्रा चौक |
| २ | मिरारोड (पूर्व) कनकिया सिनेमॅक्स समोरील चौक | संत गुरुगोविंद सिंह चौक |
| ३ | भाईंदर (पूर्व) आर.एन.पी. पार्क ते बांगासांगा मंदिराकडे जाणारा रस्ता | खाटु शामजी मंदिर मार्ग |
| ४ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १०२ बगीचा | प्रमोद महाजन उद्यान |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड मधील प्रकरण ११(२) नुसार नामकरणाचे अधिकार महानगरपालिकेचे आहेत. वरील नामकरण करण्याच्या प्रस्तावाना मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर

अनुमोदन :- (Dr. Nayana N. Vasani) 2.3.2015

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

[illegible]

[illegible]

[illegible]

(२०१)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. ०२/०३/२०१५

६३ (दि. ०१/२/२०१५ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ( ) - मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) या आरक्षणाचे ट्रक टर्मिनल व बस डेपो याप्रमाणे नावामध्ये बदल करणेबाबत.

ठराव क्र. (६८) -

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेमध्ये आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) हे आरक्षण मौजे घोडबंदर, स.क्र. १६पै., १७पै., १८पै., १९पै., २०पै., ३१पै. या जागेमध्ये दर्शविलेले असून सदर जागेपैकी १२१४५ चौ.मी. क्षेत्र संक्रमण शिबीर (Transit Camp) साठी आरक्षित ठेवणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारच्या फेरबदलासाठी शासनाने जा.क्र. टिपीएस-१२११/२४८/प्र.क्र.२९४/११/नवि-१२, दि.२७/०३/२०१२ अन्वये मंजूरी दिलेली असून सदर आरक्षणासाठी आ.क्र. ३२६-बी दिलेला आहे.

त्याप्रमाणे सदरच्या दोन्ही आरक्षणाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | मंजूर विकास योजनेप्रमाणे आरक्षणाचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | ३२६बी | संक्रमण शिबीर | १२१४५ | ९८९० |
| २ | ३२६ | ट्रक टर्मिनल | २२७५५ | १२२६० |

यापैकी संक्रमण शिबीराच्या इमारतीसाठी यापूर्वी रेखांकन नकाशे मंजूरी दिलेली असून जागेवर प्रत्यक्ष इमारतींचे बांधकाम सुरु झालेली नाही.

सदरचे संक्रमण शिबीराच्या जागेची हद्द मंजूरीप्रमाणे आयताकृती नसल्यामुळे उर्वरीत क्षेत्रही आयताकृती शिल्लक राहत नव्हते. यास्तव संक्रमण शिबीराच्या भूखंडाची आखणी आयताकृती ठेवल्यास संक्रमण शिबीराच्या इमारतीसाठी व उर्वरीत ट्रक टर्मिनलच्या आरक्षणाच्या जागेमधील बांधकामासाठी व्यवस्थित जागा उपलब्ध होऊ शकत असल्यामुळे सदरप्रमाणेच्या फेरबदलासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. १०(४) प्रमाणे दि.२७/११/२०१४ रोजी मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे ट्रक टर्मिनल या आरक्षणासाठी २२७५५ चौ.मी. क्षेत्र उपलब्ध होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीच्या बसेसच्या दुरुस्तीसाठी, बसेस ठेवणेसाठी आवश्यक जागा सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे उपलब्ध नसून बस डेपोच्या कामासाठी जागतीक बँकेकडून अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे.

यास्तव सदरच्या आ.क्र. ३२६ (ट्रक टर्मिनल) या आरक्षणाचे आ.क्र. ३२६ (ट्रक व बस डेपो / टर्मिनल) याप्रमाणेच्या नावामध्ये बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस, फेरबदलाच्या सुचना / हरकती घेणे, सुनावणी घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच बस डेपोसाठी जागतीक बँकेचे अर्थसहाय्य उपलब्ध होत असून अल्पावधीतच नवीन बसेस उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सदर ठरावानुसार बस डेपोचे बांधकाम करणेस तसेच सदर ट्रक टर्मिनल व बगीचा या आरक्षणाच्या हद्दीवर घोडबंदर गावच्या रस्त्यापासून ६०.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्यापर्यंत १२.०० मी. रुंदीचा रस्ता तयार करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक - श्री. प्रशांत केळूसकर

अनुमोदक - सुमन कोठारी

ठराव मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २३/०३/२०१५

**प्रकरण क्र. ६९ :-** दि.१५/११/२०१४ व दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र.१०० :-**

दि. १५/११/२०१४ व दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** **अनुमोदक :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.२३/०३/२०१५

**प्रकरण क्र. (७१) :-** **<u>मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबत विशेष सवलत मोहीम राबविणेकरिता मंजूरी मिळणेबाबत.</u>**

**ठराव क्र. (७२) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम परवानगी घेऊन बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये बऱ्याच इमारतीत वापर सुरु असून वापर परवाना घेण्यात आलेला नाही. याबाबतची सर्वसाधारणपणे कारणे खालीलप्रमाणे दिसून येतात.

१) परवानगीमधील अटींची पुर्तता न झाल्यामुळे

२) वास्तुविशारद व विकासक ह्यामध्ये झालेल्या वादामुळे

३) विकासकाने इमारतीचे बांधकाम विहीत वेळेत पूर्ण न केल्यामुळे सदनिका खरेदीदारांनी परस्पर घेतलेल्या ताब्यामुळे

४) इमारतीमध्ये काही भागात मंजूरी व्यतिरिक्त झालेल्या बांधकामामुळे

सद्यस्थितीत वापर परवाना अदा करणेची कार्यवाही महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ६(७)(८) मधील तरतूदीनुसार खालीलप्रमाणे केली जाते.

वास्तुविशारद वापर परवाना मिळण्यासाठी अर्ज सादर करतात. अर्जासोबत बांधकाम परवानगीप्रमाणे काम पुर्ण झाल्याबाबत व संरचनात्मकदृष्ट्या बांधकाम सक्षम असल्याबाबत मान्यता प्राप्त संरचना अभियंता यांचे प्रमाणपत्र (च्यद्धद्वड़द्यद्वद्धड्ढ च्यद्दडत्थ्द्यत्र क्ड्ढद्धद्यत्ढत्ड़ड्ढद्यड्ढ) सादर करतात. परवानगीमधील अटीशर्तीची पूर्तता झाल्यावर विना वापरपरवाना वापर सुरु असल्यास रु.२००/- प्रती चौ.मी. प्रमाणे दंड वसूल करुन वापर परवाना देण्याबाबत धोरण आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत ब-याच जुन्या इमारती अश्या आहेत कि, वापर सुरु असून वापर परवाना घेतलेला नाही अथवा वापर परवाना दिलेला नाही. अश्या इमारतींना वापर परवाना देणेबाबत खालीलप्रमाणे विशेष मोहिम लागु करता येईल.

**<u>विशेष मोहिमेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे.</u>**

१) फक्त बांधकाम परवानगी घेतलेल्या व मंजूर नकाशा नुसार बांधकाम करण्यात आलेल्या इमारतींना सदर विशेष मोहिम लागू होईल.

२) बांधकाम परवानगी वेळी अस्तित्वात असलेल्या तत्कालीन नियमानुसार अग्निशमन व्यवस्थेबाबत नाहरकत दाखला आवश्यक राहील.

३) अर्जदार यांनी विहीत नमुन्यातील अर्जासोबत नोंदणीकृत संरचना अभियंता यांचे स्ट्रक्चरल स्टॅबॅलिटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४) अर्जदार गृहनिर्माण संस्थेची नोंदणी पाच वर्षापूर्वी झालेली असावी.

५) गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत नसल्यास भोगवटा इमारत पाच वर्षापूर्वीची असल्याचे पुरावे सादर करावे. म्हणजेच पाच वर्षापेक्षा कमी कालावधी करीता वापर असलेल्या व गृहनिर्माण संस्था नोंदणी नसलेल्या इमारतीना विशेष मोहिम लागू होणार नाही.

(०८)

६) सदर विशेष मोहिमेनुसार दंडनिय शुल्क रू. २००/- प्रति चौ.मी. आकारण्यात येईल.

७) सदर विशेष मोहिम एक वर्षासाठी म्हणजेच दि. १/०४/२०१५ ते दि. ३१/०३/२०१६ या कालावधीसाठी लागू राहील.

उपरोक्त विशेष मोहिम पाच वर्षापूर्वीच्या गृहनिर्माण संस्था/भोगवटादार यांचे मर्यादीत असून विकासकास सदर विशेष मोहिम लागू होणार नाही. विकासकांकडून प्राप्त होणाऱ्या भोगवटा दाखला प्रस्तावात यापूर्वी घेण्यात येणारे विना वापर परवाना दंडनिय शुल्कात वाढ करून ते यापुढे रू. ४००/- प्रति चौ.मी. आकारण्यात यावे.

वरील अटीसह विशेष मोहिम लागू करण्यास व सदर विशेष मोहिमेत प्राप्त होणारे अर्ज मा. आयुक्त यांच्या स्तरावर निकाली काढणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक** - श्री. रोहिदास पाटील                **अनुमोदक** - श्री. शरद पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(105)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि. २३/०३/२०१५

**प्रकरण क्र. ७२ :-** **अपंग व्यक्तींना स्वयं रोजगारासाठी बँकेमार्फत आर्थिक मदत देणेबाबत.**

**ठराव क्र. ७३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अपंग कल्याण योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत प्रदान करणे यासाठी लेखाशिर्षकामध्ये दरवर्षी तरतुद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णयानुसार अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल उपलब्ध करुन देणे या योजने अंतर्गत जे अपंग लाभार्थी छोटया उदयोजकातील स्वयंरोजगार करण्यासाठी मान्यता प्राप्त बँकेकडुन प्रकल्प खर्चाची मर्यादा रु.१,५०,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा घेतल्यास कर्जाच्या २०% रक्कम हि अनुदान म्हणुन देण्यात यावी असा प्रस्ताव आहे. त्यासाठी लागणाऱ्या अटीशर्ती खालीलप्रमाणे.

१) कुंटूबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.

३) ४० % अपंग असल्याचा ठाणे सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला.

४) रहिवासी दाखला (किमान सात वर्ष)

तरी अपंग कल्याण योजने अंतर्गत अपंग व्यक्तींनी रु.१,५०,०००/- लाखापर्यंत बँकेकडुन जर कर्ज मंजुर करुन घेतले तर त्यांना मंजुर कर्जाच्या २०% रक्कम अनुदान प्रदान करण्यास सदरची योजना यापुढे राबविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस हि सभा मंजुरी देत आहे. या योजनेची मुदत दोन वर्षाकरीता म्हणजेच दि. १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१७ पर्यंत राहील. या योजनेतील लाभ घेणाऱ्या लाभार्थीकरीता ठेवणाऱ्या अटी व शर्थीचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१०६)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. २३/०३/२०१५

**प्रकरण क्र. ७३ :-** **मिरा भाईंदर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.** ७४:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळा असुन दि.३० सप्टेंबर २०१४ च्या पटसंख्येनुसार इ. १ली ते इ.८वी पर्यंत एकुण ९२६२ विद्यार्थी-विदयार्थीनी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात १०% संभाव्य वाढ लक्षात घेवून एकुण अंदाजे १०,१८८ पर्यंत पटसंख्या अपेक्षित आहे. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये विदयार्थी-विदयार्थीनींना शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश-टाय सह (प्रत्येकी-२), बुट-मोजे, वह्या, बॅग, पाण्याच्या बाटल्या इत्यादी पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे. शिक्षण विभागानी साहित्य पुरवठा कामी असलेल्या सर्व प्रशासकीय मान्यता दि. २० एप्रिल २०१५ पूर्वी घ्याव्यात व तद्नंतर सदरचा विषय मान्यतेसाठी मा. स्थायी समिती पुढे ठेवावा. ठेकेदाराने विहित मुदतीत शैक्षणिक साहित्य पुरवठा केला नाही तर ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. तसेच शैक्षणिक साहित्य शाळा सुरू झाल्यानंतर १५ दिवसांत वितरित करण्यात यावे. असे न केल्यास दोषी अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना सदर धोरणानुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक तरतुद सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. सबब साहित्य खरेदी करण्याकरिता ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**सदर ठरावामध्ये सुचक सौ. वर्षा भानुशाली व अनुमोदक सौ. कल्पना म्हात्रे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत शालेय गेणवेष व शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना वाटप करतेवेळी संबंधित प्रभागातील स्थानिक नगरसेवक/नगरसेविका यांना याबाबत कळवून त्यांच्यासमोर सदर गणवेष व इतर शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात यावे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

इयता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना कंपासपेटी देण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. २३/०३/२०१५

**प्रकरण क्र. ७४ :-** **टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्ती बाबत.**

**ठराव क्र. ७५ :-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये टेंबा इस्पितळाकरीता आवश्यक असलेले अधिकारी/कर्मचारी पद भरतीची मोहिम राबविण्यांत आली. घेण्यात आलेल्या थेट मुलाखती व मुलाखती अंती निवडण्यात आलेले विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची निवड यादी व प्रतिक्षा यादी मुलाखत घेतलेल्या दिवशी प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत-त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल" आणि उक्त अधिनियमाच्या कलम ५३(३) नुसार, त्या व्यतीरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असो किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल. त्या अनुषंगाने सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा संवर्गातील उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी ची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

### निवड यादी

| अ. क्र. | संवर्ग | निवडलेला उमेदवार | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) | १. डॉ.सरीता अरुण चन्नावर | खुला |
| २. | वैद्यकीय अधिकारी | १. डॉ. दिनेश पुनमचंद प्रजापती<br>२. डॉ. वंदना सत्यनारायण गुंडला<br>३. डॉ. संजय दशरथ गईवाले<br>४. डॉ. प्रणिल राजेंद्र पढयार<br><br>५. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी<br>६. डॉ. संदिप प्रधान<br>७. डॉ. मोहन गोविंदा गायकवाड<br>८. डॉ. तानाजी दशरथ म्हारनूर<br>९. डॉ. प्रणव नरेश शिरभाते | खुला-१<br>खुला-२<br>खुला-३<br>खुला-४<br>(अपंग)<br>अ.जा.१<br>अ.जा.२<br>अ.ज.१<br>भ.ज.(क)१<br>इ.मा.व.१ |

### प्रतिक्षा यादी

(जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. १२/०२/२०१५ ची प्रत्यक्ष यादी खालील प्रमाणे.)

| अ.क्र. | संवर्ग | प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमे उमेदवार | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र) | १. डॉ. आशिष विद्याधर श्यामकुल | खुला |
| २. | वैद्यकीय अधिकारी | १. डॉ. प्रशांत मारुती बोडके<br>२. शिल्पा व्ही. नाईक<br>३. डॉ. मनाली प्रमोद राउत<br>४. डॉ. विजय कारभारी कवर<br>५. डॉ. राजु बी. सुळे | खुला<br>खुला<br>खुला<br>अ.ज.<br>भ.ज.(क) |

वर नमूद केलेल्या संवर्गासाठी महासभा नियुक्ती प्राधिकारी आहे. त्यामुळे प्रस्तुत निवड यादीस व प्रतिक्षा यादीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार महासभेची मान्यता आवश्यक आहे. सबब निवडलेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या नियुक्तीस ही महासभा मंजूरी देत आहे. तथापि इस्पितळ सुरू झाले नसल्यामुळे इस्पितळ सुरू होण्यापूर्वी नजदीकच्या महासभेमध्ये प्रस्तुत वैद्यकिय उमेदवारांची नियुक्ती आदेश देण्याच्या मान्यतेच्या प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करावा. तथापी आरोग्य केंद्र व इंदिरा गांधी हॉस्पीटल येथील वैद्यकिय अधिकारी ३, नर्स १२, फार्मासिस्ट ३ यांचे नियुक्तीस ही सभा मंजूरी देत आहे. व त्यांचे नियुक्ती आदेश देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

इंदिरा गांधी आणि राजीव गांधी हॉस्पीटलमध्ये २-३ वर्षापासून डॉक्टर, नर्सेसचे काम करतात त्यांना कायम करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. त्यामध्ये सुचना आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जे १० इंजिनिअर भरती केलेले आहेत. त्यापैकी ३ सोडून गेलेले आहेत आणि ७ कार्यरत आहेत. तर त्या ७ इंजिनियर्सना कायम करावे अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१०९)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि. २३/०३/२०१५

**प्रकरण क्र. ७५ :-** **श्री. स्वप्नील सावंत (सहा. आयुक्त) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ निलंबन कायम करणेबाबत.**

**ठराव क्र.७६:-**

श्री. स्वप्निल सावंत हे प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.०१ येथे कार्यरत होते. महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्याची व नव्याने कोणतीही अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण होऊ न देण्याची जबाबदारी प्रभाग अधिकारी यांची आहे. सदर जबाबदारी सक्षमतेने पार पाडता यावी यासाठी प्रभाग अधिकारी यांना पदर्निदेशित अधिकारी म्हणून शासन राजपत्र क्रमांक मिभा/मनपा/आयुक्त/४३/२०१४ दि.१० सप्टेंबर, २०१३ नुसार घोषित करण्यांत आले आहे. अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणांस आळा न घालणारे प्रभाग अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहेत.

प्रभाग क्र.१ मधील कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे उभी राहीली असून निष्कासित करण्यात आलेली बांधकामे सुध्दा पुन्हा नव्याने उभी राहीली आहेत. श्री. स्वप्निल सावंत, प्रभाग अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसुर केली असून अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण यास एक प्रकारे संरक्षण दिले आहे. त्याअनुषंगाने जा.क्र.मिभामपा/सा.प्र./३५८/२०१४ दि.१०/११/२०१४ रोजी त्यांचे निलंबन केले आहे.

